सोलापूर

# तरुण भारत

Solapur Tarun Bharat

न मे कर्मफले स्पृहा

छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | बुधवार, दि. १८ मार्च २०२६ | वर्ष – ३ रे | अंक ३३८ | पाने : ८ | किंमत रु. ६/– | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com


# इराणनं भल्याभल्यांचे अंदाज चुकवले!

## युद्ध पेटलेलं असताना ट्रम्प यांची प्रथमच जाहीर कबुली

**वॉशिंग्टन/वृत्तसंस्था :** अमेरिका आणि इराण यांच्यात गेल्या १८ दिवसांपासून संघर्ष आहे. दोन्ही बाजूंनी एकमेकांवर जोरदार हल्ले सुरु आहेत. या दरम्यान अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी युद्ध लवकरच संपवण्यासंदर्भात भाष्य केलं आहे. पण या आठवड्यात युद्ध थांबणार नाही, ही बाबदेखील ट्रम्प यांनी स्पष्ट केली आहे.

डोनाल्ड ट्रम्प यांनी व्हाईट हाऊसमध्ये पत्रकारांशी संवाद साधला. युद्ध कधी संपणार, असा प्रश्न ट्रम्प यांना विचारण्यात आला. त्यावर युद्ध नक्कीच संपेल. पण याच आठवड्यात संपेल असं वाटत नाही. पण युद्ध लवकरच संपेल. जास्त वेळ लागणार नाही, असं उत्तर ट्रम्प यांनी दिलं. अमेरिका, इस्रायलनं २८ फेब्रुवारीपासून इराण–वर हवाई हल्ले सुरु केले. यानंतर इराणनं जोरदार पलटवार सुरु केला. इराणनं कतार, सौदी अरेबिया, यूएई, बहरिन, कुवेत यासारख्या आखाती देशांमधील अमेरिकेच्या हवाई आणि नौदल तळांवर हल्ले चढवले. क्षेपणास्त्र आणि ड्रोन्सचा मारा करत अमेरिकेचं प्रचंड नुकसान केलं. यावरही ट्रम्प यांनी भाष्य केलं. गुप्तचर यंत्रणेतील अधिकाऱ्यांना या हल्ल्यांची अपेक्षा नव्हती, अशा शब्दांत ट्रम्प यांनी अमेरिकेच्या अपयशाची अप्रत्यक्ष कबुली दिली.

'इराण आखाती देशांवर हल्ले चढवले, हा अंदाज मोठमोठ्या तज्ज्ञांनादेखील नव्हता. हा विचार कोणीही केला नव्हता. इराणनं होर्मुझ सामुद्रधुनीतून होणारी वाह–



तूक रोखली. ज्या देशांना या मार्गानं खनिज तेलाचा आणि नैसर्गिक वायूचा पुरवठा होतो, तेदेखील अमेरिकेच्या मदतीला येण्यास तयार नाहीत. याबद्दल मला आश्चर्य वाटतं,' असं ट्रम्प म्हणाले.

इराणच्या जोरदार प्रतिहल्ल्यानं अमेरिकेचं मोठं नुकसान झालं आहे. अमेरिकेची लढाऊ विमानं, टँकर विमानं उद्ध्वस्त झाली आ–हेत. अमेरिकेची जगप्रसिद्ध थाड यंत्रणा, जगातील सर्वाधिक महागडं रडार इराणनं नष्ट केलं आहे. २८ फेब्रुवारीपासून सुरु झालेल्या संघर्षात आतापर्यंत अमेरिकेचे जवळपास २०० सैनिक जखमी झाले. यातील अनेकांच्या दुखापती किरकोळ होत्या. त्यामुळे १८० सैनिक उपचारांनंतर पुन्हा कर्तव्यावर परतले आहेत. इराण विरूद्धच्या युद्धात आतापर्यंत अमेरिकेचे १३ जवान शहीद झाले आहेत.

## थोडक्यात...

### पाचपट वेगाने होणार डिलिव्हरी

**नवी दिल्ली :** मेझॉन एअरची ईशान्य भारतात सेवा विस्तारत असल्याची घोषणा करण्यात आली. या अंतर्गत नवीन कार्गो मार्ग हे कोलकाता आणि गुवाहटी दरम्यान सुरु करण्यात येत असून यामुळे आता या भागातील वाहतूक सुविधा आणि जोडणी अधिक सक्षम होणार आहे. त्याच बरोबर विशेष अशा हवाई क्षमते मुळे डिलिव्हरी करण्याचा वेग आणि विश्र्वसनीयता वाढू शकेल, ज्यामुळे ईशान्य भारतातील मेझॉनची मोठ्या प्रमाणावरील उत्पादने संपूर्ण भार–तातील ग्राहकांपर्यंत वेगाने आणि अधिक सातत्याने प्राप्त होऊ शकतील. या सेवेमुळे सेव्हन सिस्टर्स राज्ये म्हणजेच अरुणाचल प्रदेश, आसाम, मणिपूर, मेघालय, मिझोराम, नागालँड आणि त्रिपुरा या राज्यांना एकात्मिक अशा हवाई आणि रस्ते वाहतूकीच्या नेटवर्कने जोडून या राज्यांतील डिलिव्हरीजना सहकार्य प्राप्त होईल.

### विधिमंडळात घुमला धर्मांतर विरोधी आवाज

**मुंबई:** महाराष्ट्रात प्रलोभन किंवा बळजबरीने होणाऱ्या धर्मांतराच्या समस्येला आळा घालण्यासाठी आज विधान परिषदेत एक अत्यंत महत्त्वाचे विधेयक मांडण्यात आले. या विधेयकाच्या निमित्ताने राजकारणातील दोन दशकांपूर्वीचा एक महत्त्वाचा अध्याय पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. २००४ च्या हिवाळी अधिवेशनात डॉ. नीलम गोऱ्हे यांनी मेळघाटातील आदिवासींच्या धर्मांतराचा प्रश्र्न अत्यंत आक्रमकपणे मांडला होता. आज मांडण्यात आलेल्या या शासकीय विधेयकात डॉ. गोऱ्हे यांनी तेव्हा मांडलेल्या ज्वलंत भूमिकेचा आणि तत्कालीन गृहमंत्री आर. आर. पाटील यांनी दिलेल्या आश्र्वासनांचा खोलवर संदर्भ पाहायला मिळाला.

### नाटकाच्या गाडीला अपघात

**खेड :** मुंबई–गोवा महामार्गावरील भोस–ते घाटात मंगळवारी सकाळी 'अलबत्या गलबत्या' नाट्यसंघाच्या गाडीला अपघात झाला. या अपघातात गाडीत असलेल्या दोघांना दुखापत झाली असून त्यांच्यावर कळंबनी उपजिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत. बसमधील इतर सर्व जण सुरक्षित आहेत.'अलबत्या गलबत्या' नाटकाचा गोव्यातील प्रयोग आटपून संपूर्ण टीम मुंबईच्या दिशेने परतत होती. यावेळी भोस्ते घाट उतरत असताना त्यांच्या बसने समोर चाललेल्या ट्रकला पाठीमागून जोरदार धडक दिली. प्राथमिक माहितीनुसार, घाट उतरताना अचानक बसच्या ब्रेकमध्ये बिघाड झाल्याने हा अपघात घडल्याची शक्यता वर्तवली जात आहे.

### सांगली मनपाचा अर्थसंकल्प सादर

सांगली : सांगली, मिरज आणि कुपवाड महानगरपालिकेचा प्रशासकीय अर्थसंकल्प आज स्थायी समितीमध्ये सादर झाला आहे. महापालिका आयुक्त सत्यम गांधी यांनी स्थायी समितीकडे हा अर्थसंकल्प सुपूर्द केला आहे. १ हजार ६५ कोटींचा आणि ५० लाख शिलकीचा असणाऱ्या अर्थसंकल्पांमध्ये कोणत्याही प्रकारची कर वाढ करण्यात आली नाही. त्यामुळे सांगलीकरांना मोठा दिलासा मिळाला आहे,या अर्थसंकल्पाच्या माध्यमातून वीज बचतीच्या दृष्टीने महापालिका प्रशासकीय कार्यालयात सोलर प्रकल्प बसवण्याबरोबर सोलर विज निर्मितीचा प्रकल्प देखील उभारण्यात येणार आहे, त्याचबरोबर महापालिकेच्या मालकीचा पेट्रोल डिझेल व सीएनजी पंप उभारण्याबरोबर ५० ई बसेस खरेदी करण्याची तरतूद अर्थसंकल्पामध्ये करण्यात आली आहे.

### ऑनलाईन खरेदीत फसवणूक

**मुंबई :** मुंबईत ऑनलाइन शॉपिंगचा मोह एका महिलेला महागात पडला. नामांकित ब्रँडवरून कुर्ती ऑर्डर केल्यानंतर 'पेमेंट फेल'चा बहाणा करत सायबर भामट्यांनी रिफंडच्या नावाखाली तिच्या खात्यातून तब्बल ९८ हजार रुपये लंपास केले. कस्टमर केअर असल्याचे भासवून फोन करणाऱ्या आरोपींनी काही मिनिटांतच अनेक व्यवहार करत ही फसवणूक केली. या घटनेनंतर पोलिसांनी गुन्हा दाखल करत नागरिकांना सतर्क राहण्याचा इशारा दिला आहे.

### इथेनॉलचा टँकर पलटी

**कोल्हापूर :** कोकण–कोल्हापूर जोडणाऱ्या कारूळ घाटात येथे इथेनॉल भरलेल्या टँकरचा मोठा अपघात झाला आहे. सुदैवाने यामध्ये कोणतीही जीवितहानी झाली नसून टँकरचालक थोडक्यात बचावला आहे. इथेनॉलने भरलेला टँकर करूळ घाटात पलटी झाला. या अपघातात केबिनमध्ये अडकलेल्या चालकास क्रेनच्या साहाय्याने वैभववाडी पोलिसांनी बाहेर काढले. त्याच्या पायाला व हाताला गंभीर दुखापत झाली आहे. त्याच्यावर येथील ग्रामीण रुग्णालयात उपचार सुरु आहेत. या अपघाताची नोंद वैभववाडी पोलीस ठाण्यात करण्यात आली

# राज्यातील कालबाह्य ८० कायदे रद्द

## विधेयक मंजूर; मुंबई फटक्यांची शिक्षा रद्द करण्याचा अधिनियम रद्द

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई, दि. १७ मार्च :** महाराष्ट्रातील कालबाह्य झालेले ८० अधिनियम आणि कायदे रद्द करणारे विधेयक मंगळवारी विधानसभेत मंजूर करण्यात आले असून सुशासन व सुलभ प्रशासकीय कामकाजासाठी हे कायदे रद्द करण्यात आले आहेत.

महाराष्ट्र राज्यातील विवक्षित अधिनियमांचे निरसन करण्यासाठीचे विधेयक विधानसभेत सामान्य प्रशासन विभागाचे अँड आशिष शेलार यांनी मांडले. चर्चेअंती हे विधेयक मंजूर करण्यात आले. याबाबत शासनाची भूमिका मांडताना मंत्री शेलार यांनी सांगितले की, संवैधानिक बदल, राज्याची पुनर्रचना, आणि नवीन कायद्यांची अधिनियमिती यामुळे महाराष्ट्रातील अनेक अधिनियम कालबाह्य झाले आहेत. त्यांचे संदर्भ टिकून



राहिल्यामुळे संदिग्धता निर्माण होत आहे. म्हणून, राज्य शासनाने, महाराष्ट्र राज्यात अमलात असलेल्या सर्व राज्य कायद्यांचे परीक्षण करण्याचे काम हाती घेतले आहे आणि जे वापरात नाहीत असे मुंबई अधिनियम, मुंबई विनियम, बंगाल विनियम, मध्य प्रांत व वऱ्हाड अधिनियम, हैद्राबाद अधिनियम आणि मध्य प्रदेश अधिनियम निरसित करण्याचे ठरविले आहे.

रद्द केलेले कायदे / अधिनियम

मुंबई अधिनियम २४, मध्य प्रांत वऱ्हाड अधिनियम ८, हैदराबाद अधिनियम १८ आणि मध्य प्रदेश ३ यांसह विनियोग अधिनियम २४ अशा एकूण ८० अधिनियमांचा यामध्ये समावेश आहे. बंगाल जल–ोढ व गाळ विनियमन १८२५, ऋण व्याज गहाण अभिसिकृती विनियमन १८२७, भडोच व खेडा यातील भार असलेल्या भूसंपत्तीबाबत अधिनियम १८७७, मुंबई अबकारी अधिनियम १८७८, बोस्टल शाळा अधिनियम १९२९, महाराष्ट्र अफू ओढण्याबाबत अधिनियम, मुंबई वैरण व धान्य नियंत्रण अधिनियम १९३९, मुंबई कापूस नियंत्रण अधिनियम १९४२, मुंबईचा फटक्याची शिक्षा रद्द करण्याबाबत अधिनियम १९५७ अशा विविध कालबाह्य अधिनियमांचा यामध्ये समावेश आहे.

# उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी घेतली पंतप्रधान मोदींची भेट

नवी दिल्ली : राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मंगळवारी दि. १७ मार्च रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेत विविध राष्ट्रीय आणि राज्यस्तरीय मुद्द्यांवर सविस्तर चर्चा केली. या बैठकीत इराण–इस्रायल तणाव, देशांतर्गत परिस्थिती तसेच महाराष्ट्रातील प्रलंबित प्रश्र्नांवर विचारविनिमय झाला.

युद्धजन्य परिस्थितीत 'एनडीए'चा घटक पक्ष म्हणून शिवसेना पंतप्रधानांच्या भूमिकेसोबत ठामपणे उभी असल्याचे शिंदे यांनी स्पष्ट केले. देश प्रथम हीच भूमिका कायम ठेवत आम्ही केंद्र सरकारला पूर्ण पाठिंबा देत असल्याचे त्यांनी सांगितले.

बैठकीनंतर माध्यमांशी बोल–ताना शिंदे यांनी विरोधकांवर जोरदार टीका केली. आंतरराष्ट्रीय तणावाच्या पार्श्र्वभूमीवर दे–शात खोटा प्रचार करून राजकारण



करणे हे दुर्दैवी असल्याचे त्यांनी म्हटले. काही नेते पाकिस्तानमध्ये प्रसिद्धी मिळवण्यासाठी वक्तव्य करत असल्याचा टोला त्यांनी लगावला.

युद्धस्थितीमुळे आखाती देशांत अडकलेल्या महाराष्ट्रातील नागरिकांना सुरक्षित परत आणल्याची माहिती शिंदे यांनी पंतप्रधानांना दिली. तसेच होर्मुज सामुद्रधुनीतून भारताची तेल–वाहतूक सुरक्षितपणे पार पडण्यासाठी केंद्राने केलेल्या प्रयत्नांबद्दल त्यांनी आभार मानले.

# रब्बी हंगामातील 'ई–पीक पाहणी'ला ३१ मार्चपर्यंत मुदतवाढ

**– ४५ टक्के शेतकरी अजूनही प्रक्रियेबाहेर; महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची घोषणा**



**तभा वृत्तसेवा**

**मुंबई, दि. १७ मार्च :** राज्यातील रब्बी हंगाम २०२५–२६ मधील 'ई–पीक पाहणी' करण्याची मुदत आता ३१ मार्च २०२६ पर्यंत वाढवण्यात येत असल्याची घोषणा महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मंगळवारी विधानसभेत केली.

बावनकुळे म्हणाले की, २५ जानेवारी २०२६ पासून सहाय्यक स्तरावर ई–पीक पाहणीची नोंदणी सुरू करण्यात आली आहे. मात्र, आतापर्यंत रब्बी हंगामातील पिकांची केवळ ५५.६९ टक्के नोंदणी पूर्ण झाली आहे. सुमारे ४५ टक्के शेतकरी या नोंदणी प्रक्रियेपासून लांब आहेत. ही नोंदणी १०० टक्के पूर्ण व्हावी, या हेतूने सरकारने मुदत वाढवण्याचा निर्णय घेतला आहे.पीक विम्यासह सरकारी योजनांचा लाभ मिळवण्यासाठी ई–पीक पाहणी अत्यंत महत्त्वाची आहे.

जमाबंदी आयुक्त आणि कृषी आयुक्त यांनी समन्वयाने काम करून 'ग्री स्टॅक' मधील डेटाची नोंदणी तातडीने पूर्ण करावी, अशी सूचना प्रशासनाला केली असल्याचे सांगून बावनकुळे म्हणाले की, पीक पाहणीची पडताळणी अचूक आणि वेळेत व्हावी, यासाठी विशेष लक्ष दिले जाणार आहे.

# महाविद्यालयांमध्ये तब्बल ५०१२ प्राध्यापकांची भरती

## उच्च शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटलांची मोठी घोषणा!

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई, दि. १७ मार्च :** राज्यातील उच्च शिक्षण विभागातर्फे मोठी घो–षणा करण्यात आली आहे. गेल्या अनेक दिवसांपासून प्रलंबित अस–लेला प्राध्यापक भरतीचा मार्ग आता मोकळा झाला असून, अनुदानित महाविद्यालयांमध्ये ५०१२ सहाय्यक प्राध्यापकांची (–ीौळीींरपीं झीेषशी–ीी) पदे भरली जाणार आहेत. उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी विधानसभेत या मेगाभरतीला राज्य सरकारने मंजुरी दिल्याची अधिकृत माहिती दिली. या निर्णयामुळे राज्यातील हजारो पात्र उमेदवारांना मोठा दिलासा मिळणार आहे.

राज्यातील उच्च शिक्षण क्षेत्राचा दर्जा उंचावण्यासाठी राज्य सरकारने कंबर कसली आहे. २०२६–२७ च्या अर्थसंकल्पीय चर्चेदरम्यान उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी मोठी घोषणा केली. राज्याची आर्थिक स्थिती पाहता सध्या नवीन अनुदानित महाविद्यालयांना परव–ानगी देणे शक्य नसले, तरी विद्यमान महाविद्यालयांमधील रिक्त पदे प्राधान्याने भरली जाणार आ–हेत. यानुसार, राज्यातील सुमारे १२०० अनुदानित महाविद्यालयांमध्ये ५४०० प्राध्यापक आणि विविध विद्यापीठांमध्ये ७०० प्राध्यापक अशा एकूण ६१०० पेक्षा जास्त पदांची भरती प्रक्रिया लवकरच सुरू होणार आहे.



राज्यातील महाविद्यालयीन अनुदानाबाबत बोलताना उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी सरकारची भूमिका स्पष्ट केली आहे. त्यांनी सांगितले की, २००१ पासून नवीन महाविद्यालयांना 'विना–अनुदानित' तत्त्वावर परवानगी देण्याचे धोरण राज्यात लागू आहे. जरी ही महाविद्यालये विना–अनुदानित असली, तरी सरकार विविध प्रवर्गांतील विद्यार्थ्यांच्या शुल्काचा भार स्वतः उचलते, ज्यामुळे शैक्षणिक संस्थांवरील आर्थिक ताण कमी होण्यास मदत हो–ते. याअंतर्गत अनुसूचित जाती–जमातीच्या (डउ/डढ) विद्यार्थ्यांना १००% शुल्क माफी, तर ओबीसी (जइउ) विद्यार्थ्यांना ५०% शुल्क सवलत दिली जाते. विशेष म्हणजे, मुलींना पूर्ण शिक्षण मोफत मिळावे यासाठी त्यांना १००% शुल्क सवलत लागू करण्यात आली आहे. दरम्यान, २००१ पूर्वी स्थापन झालेल्या ७८ महाविद्यालयांना अन–ुदान देण्याबाबतचा प्रस्ताव सध्या वित्त विभागाकडे पाठवण्यात आला असून, त्यावर अद्याप अंतिम निर्णय होणे बाकी आहे.

राज्यात नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धो–रणाची (छएझ) प्रभावी अंमलबजावणी आणि प्राध्यापक भरतीबाबत उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी विधानसभेत महत्त्वाची माहिती दिली. २०२२ पासून महाराष्ट्रात छएझ लागू करण्यासाठी वेगाने पावले उचल–ली जात असून, विद्यार्थ्यांमध्ये या धोरणाबद्दल जनजागृती करण्यासाठी जाहिरातींवर खर्च करणे आवश्यक होते, असे त्यांनी स्पष्ट केले. याचवेळी राज्यातील उमेदवारांसाठी सर्वात मोठी आनंदाची बातमी म्हणजे, अनुदानित महाविद्यालयांमधील रिक्त असलेल्या एकूण ११,९१८ सहाय्यक प्राध्यापक पदांपैकी ५,०१२ पदांच्या भरतीला सरकारने अधिकृत मंजुरी दिली आहे. यामुळे राज्यातील उच्च शिक्षण क्षेत्रा–तील रिक्त जागांचा प्रश्र्न सुटण्यास मदत होणार असून पात्र उमेदवारांसाठी रोजगाराची मोठी संधी निर्माण झाली आहे.

# संघ शताब्दीत पश्चिम महाराष्ट्रात दहा लाखांहून अधिक कुटुंबाशी संवाद

## समाजातर्फे आयोजित तीन हजार 'सकल हिंदू संमेलनांचे' संघाचाही सहभाग

**तभा वृत्तसेवा**

**पुणे, दि. १७ मार्च :** राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी वर्षानिमित्त पश्र्चिम महाराष्ट्रात व्यापक जनसंवाद आणि सामाजिक एकात्मतेवर केंद्रित विविध उपक्रम राबविण्यात येत असून, सात शासकीय जिल्ह्यांमध्ये तीन हजारांहून अधिक सकल हिंदू संमेलनांचे आयोजन करण्यात आले आहे. या संमेलनांत सुमारे १२ लाख नागरिक आणि स्वयंसेवक



सहभागी होत असल्याची माहिती पश्र्चिम महाराष्ट्र प्रांताचे संघचालक प्रा. सुरेश (नाना) जाधव यांनी पत्रकार परिषदेत दिली.

शताब्दी निमित्त राबविण्यात आलेल्या गृहसंवाद अभियानाद्वारे १० लाख ८५ हजार कुटुंबांशी संवाद साधण्यात आला. त्यासाठी ४५ हजारांहून अधिक स्वयंसेवकांनी सहभाग घेतला. पुणे महानगरातील ५१२ वस्त्यांमधील ३ लाख ४९ हजार ५३ घरांपर्यंत १० हजार ८७९ कार्यकर्ते पोहा–ेचले. एप्रिलअखेरपर्यंत प्रांतात तीन हजार तर पुणे महानगरात ४५० संमेलने आयोजित केली जाणार आहेत.

हरियाणा येथे १३ ते १५ मार्चदरम्यान झालेल्या अखिल भारतीय प्रतिनिधी सभेला सरसंघचालक डॉ. मोहन भागवत, सरकार्यवाह दत्तात्रेय होसबाळे यांच्या उपस्थितीत देशभरातील १४३८ प्रतिनिधी सहभागी झाले होते.

प्रांत कार्यवाह डॉ. प्रवीण दबडघाव यांनी सांगितले की, संघटनात्मक विस्तारासोबत समाजगुणवत्ता वाढविण्यासाठी 'पंच परिवर्तन' संकल्पनेवर भर दिला जात आहे. देशभरातील शाखांची संख्या आता ५५,६८३ ठिकाणी ८८,९४९ इतकी झाली आहे.

या पत्रकार परिषदेला पुणे महानगर कार्यवाह सचिन भोसले आणि विश्व संवाद केंद्राचे अध्यक्ष अभय कुलकर्णी उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# थोडक्यात...

## न्यायालयाचा मनाई हुकूम मिळवला

**नाशिक :** जेएसडब्ल्यू स्टीलची पूर्ण मालकीची उपकंपनी आणि भारतातील आघाडीच्या स्टील उत्पादकांपैकी एक असलेल्या जेएसडब्ल्यू स्टील कोटेड प्रॉडक्ट्स लिमिटेडने, आपल्या नोंदणीकृत ट्रेडमार्कचा अनधिकृत वापर करणाऱ्या अनेक कंपन्यांविरुद्ध माननीय मुंबई उच्च न्यायालयाच्या (व्यावसायिक विभाग) कडून दिनांक ५ फेब्रुवारी, २०२६ रोजी यशस्वीरित्या एकतर्फी अंतरिम मनाई हुकूम मिळवला आहे.हा मनाई हुकूम रामलाल लखाजी देवासी, मेसर्स पार्वती स्टील ट्रेडर्स आणि मेसर्स चामुंडा स्टीलचे मालक; हितेश देवासी, मेसर्स पार्वती स्टील ट्रेडर्सचे मालक; बागदाराम लखारामजी देवासी, मेसर्स चामुंडा स्टील आणि आकाश स्टील पॉईंटचे मालक यांच्याविरुद्ध देण्यात आला आहे. हे सर्व महाराष्ट्रातील नाशिक जिल्ह्याच्या लासलगाव आणि मनमाड परिसरातून कार्यरत आहेत.

## एविस इंडियाने 'टूल्स फॉर ट्रेड' उपक्रम सुरू केला

**छत्रपती संभाजीनगर :** एविस इंडिया ने आपल्या 'टूल्स फॉर ट्रेड' सेवेच्या मोठ्या प्रमाणावरील शुभारंभाची घोषणा केली आहे. कृषी-आधारित उद्योग आणि ग्रामीण उद्योगांच्या वेगाने बदलणाऱ्या गरजा अधिक चांगल्या प्रकारे पूर्ण करण्यासाठी, भारतातील कृषी आणि ग्रामीण क्षेत्रांमध्ये आपल्या व्यवस्थापित गतिशीलता सेवांचा विस्तार करणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे. 'टूल्स फॉर ट्रेड' विशेषतः शहरे, लहान शहरे आणि ग्रामीण भागांमध्ये कार्यरत असलेल्या संस्थांसाठी तयार करण्यात आले आहे. यामध्ये कृषी-आदान कंपन्या, शेती यंत्रसामग्री उत्पादक, बियाणे आणि खत कंपन्या, रासायनिक कंपन्या, तसेच क्षेत्रीय विक्री आणि सेवा पथकांचा समावेश आहे. ही सेवा प्रत्यक्ष काम करणाऱ्या टीम्सच्या सुरळीत, विश्र्वसनीय आणि अखंड हालचाली सुनिश्र्चित करण्यासाठी व्यावसायिकरित्या व्यवस्थापित वाहने पुरवते.

## एक्सएलआरआयने एग्जीक्यूटिव डेवलपमेंट प्रोग्राम लॉन्च केला

**नवी दिल्ली:** एक्सएलआरआय-झेवियर स्कूल ऑफ मॅनेजमेंटचा एक भाग असलेल्या एक्सएलआरआय लीडरशिप एज्युकेशन अँड डेव्हलपमेंटने, पॅरिस (फ्रान्स) येथील सोरबोन बिझनेस स्कूलच्या सहकार्याने आरोग्यसेवा व्यावसायिकांसाठी 'जागतिक रणनीती आणि नेतृत्व' या विषयावरील कार्यकारी विकास कार्यक्रमाची पहिली तुकडी सुरू केली आहे. हा कार्यक्रम रुग्णालये, आरोग्यसेवा कंपन्या आणि संबंधित सेवांमधील वरिष्ठ नेत्यांसाठी तंत्रज्ञान, नावीन्य, क्लिनिकल-बिझनेस इंटरफेस आणि संघटनात्मक प्रक्रियांमध्ये परिवर्तनाचे नेतृत्व करण्यासाठी तयार करण्यात आला आहे.

## चिकाटीने प्रत्येक संकटात कुटुंब एकत्र

**छत्रपती संभाजीनगर :** सोनी सब वरील पुष्पा इम्पॉसिबल आपल्या हृदयस्पर्शी कथाकथनामुळे आणि घट्ट कौटुंबिक नात्यांमुळे प्रेक्षकांच्या मनात घर करते. या कथानकाच्या केंद्रस्थानी आहे पुष्पा (करुणा पांडे), जी आपल्या ताकदीने, ऊबदार स्वभावाने आणि चिकाटीने प्रत्येक संकटात कुटुंबाला एकत्र ठेवते. या कथेला आणखी भावनिक रंग देत आहे मुस्कान बामने, जी शानाया मेहता ही भूमिका साकारते एक हट्टी, हक्क गाजवणारी मुलगी जी पुष्पाच्या मूल्यांना आणि विश्र्वासांना सतत आव्हान देते. करुणा पांडे यांच्यासोबत पुन्हा स्क्रीन शेअर करणे मुस्कानसाठी खास अनुभव ठरला आहे.

## हायड्रेशन, प्रोटेक्शन आणि साधी काळजी

या उन्हाळ्यात सोनी सब कलाकार श्रेणू पारिख, दीक्षा जोशी, अक्षया हिंदळकर, ऋषी सक्सेना आणि नितीन बाबू यांनी त्यांच्या स्किनकेअर टिप्स आणि वैयक्तिक सवयी शेअर केल्या आहेत, ज्यामुळे व्यस्त शूटिंग शेड्यूलमध्येही त्यांची त्वचा ताजीतवानी आणि निरोगी राहते.उन्हाळा म्हणजे तेजस्वी दिवस, वाढते तापमान आणि त्वचेची जरा जास्त काळजी घेण्याची गरज. कलाकारांना लांब वेळा तेजस्वी लाईट्सखाली आणि बाहेरच्या सेटवर काम करावे लागते, त्यामुळे त्वचा ताजीतवानी आणि सुरक्षित ठेवणे त्यांच्या रोजच्या दिनचर्येचा महत्त्वाचा भाग बनतो.

## मेडिकोव्हर हॉस्पिटल्स, छत्रपती संभाजीनगर येथे डिप्लोमेट ऑफ नॅशनल बोर्ड मेडिसिन व ॲनेस्थेशिया अभ्यासक्रमास सुरुवात

**छत्रपती संभाजीनगर :** महाराष्ट्र - मेडिकोव्हर हॉस्पिटल्स येथे मान्यताप्राप्त डिप्लोमेट ऑफ नॅशनल बोर्ड (ऊछइ) मेडिसिन व ॲनेस्थेशिया या पदव्युत्तर अभ्यासक्रमांची सुरुवात करण्यात आली आहे. यामुळे रुग्णालयाची वैद्यकीय उत्कृष्टतेप्रती असलेली बांधिलकी पुन्हा अधोरेखित झाली आहे. हा टप्पा प्रगत क्लिनिकल प्रशिक्षण, शैक्षणिक उत्कृष्टता आणि उच्च दर्जाच्या रुग्णसेवेबद्दलच्या वचनबद्धतेचे प्रतीक मानला जात आहे.

डिप्लोमेट ऑफ नॅशनल बोर्ड (ऊछइ) हा कार्यक्रम नॅशनल बोर्ड ऑफ एक्झामिनेशन्स इन मेडिकल सायन्सेस यांच्या मार्गदर्शनाखाली चालवला जातो आणि भारतातील एक प्रतिष्ठित पदव्युत्तर वैद्यकीय पात्रता म्हणून ओळखला जातो. डिप्लोमेट ऑफ नॅशनल बोर्ड प्रशिक्षण उपलब्ध करून देत मेडिकोव्हर हॉस्पिटल्स मराठवाडा प्रदेशातील शैक्षणिक उत्कृष्टता आणि विशेष आरोग्यसेवेचे केंद्र म्हणून आपली भूमिका अधिक मजबूत करत आहे. रुग्णालयाच्या नेतृत्वाने तरुण वैद्यकीय व्यावसायिकांना तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली प्रत्यक्ष क्लिनिकल अनुभव मिळावता येईल .मेडिकोव्हर हॉस्पिटल्समधील ऊछइ कार्यक्रमामध्ये संरचित प्रशिक्षण, आधुनिक सुविधा आणि विविध क्लिनिकल प्रकरणांचा अनुभव देऊन सर्वांगीण शिक्षण व व्यावसायिक प्रगती सुनिश्र्चित केली जाते.

DNB कार्यक्रमाचा भाग होणे म्हणजे केवळ रुग्णसेवेप्रती नव्हे, तर भावी वैद्यकीय तज्ज्ञ घडवण्याप्रती आमची बांधिलकी दर्शवते, असे मेडिकोव्हर हॉस्पिटल्स, छत्रपती संभाजीनगर सेंटर हेड डॉ विशाल कुटे यांनी सांगितले. शिक्षण आणि आरोग्यसेवा या दोन्ही क्षेत्रांत उच्चतम मानके राखण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. अत्याधुनिक सुविधा, अनुभवी तज्ज्ञ डॉक्टर आणि रुग्णकेंद्री दृष्टिकोन यांच्या जोरावर मेडिकोव्हर हॉस्पिटल्स मराठवाड्यातील आरोग्यसेवा आणि वैद्यकीय शिक्षण क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान देत आहे.

# एमजीएममध्ये सायबर सुरक्षा जनजागृतीपर कार्यक्रम संपन्न





**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर, दि. १७ मार्च :** महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या डॉ.जी.वाय.पाथ्रीकर संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालयाच्या वतीने 'सायबर सुरक्षा आणि सायबर गुन्ह्यांविषयी जागरूकता' या विषयावर आईनस्टाईन सभागृहात विशेष जनजागृतीपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास पोलिस उपअधीक्षक गौतम पातारे, कुलसचिव डॉ.आशिष गाडेकर, प्राचार्या डॉ.प्राप्ती देशमुख, हेड कॉन्स्टेबल संतोष तांदळे, हेड कॉन्स्टेबल गणेश घोरपडे, सविता जायभाये, प्राध्यापक, विद्यार्थी व सर्व संबंधित उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना पोलिस उपअधीक्षक गौतम पातारे म्हणाले की, तंत्रज्ञान हे मुळात मानवाच्या प्रगतीसाठी आहे; मात्र त्याचा वापर कसा केला जातो यावर त्याचे फायदे-तोटे ठरतात. भारतात प्रत्येक ३९ सेकंदाला सायबर हल्ला होतो, त्यामुळे 'ग्रीड' पासून दूर राहणे आवश्यक आहे. महिलांनी डिजिटल सुरक्षेबाबत खबरदारी घेत वैयक्तिक माहिती शेअर न करणे, अवघड पासवर्ड वापरणे, सोशल मीडियाचे प्रायव्हसी सेटिंग्ज सुरक्षित ठेवणे आणि ऑनलाईन त्रासाला तोंड देताना योग्य तक्रार नोंदवणे गरजेचे आहे. आभासी जगात कोणावरही सहज विश्र्वास ठेवू नये, प्रत्येक माहिती अनेक वेळा तपासूनच पुढे जाणे सध्याच्या काळात आवश्यक आहे. महिलांसाठी 'डक्श डे' आणि 'पिंक बूथ' यांसारख्या उपक्रमांची माहिती त्यांनी दिली.

कुलसचिव डॉ.आशिष गाडेकर यांनी सांगितले की, आजच्या डिजिटल युगात कितीही सुशिक्षित व्यक्ती असली तरी सायबर गुन्ह्यांची शिकार होऊ शकते. त्यामुळे प्रत्येकाने व्यवहार करताना सतर्कता बाळगणे आणि समाजात जनजागृती करणे ही काळाची गरज आहे.

हेड कॉन्स्टेबल गणेश घोरपडे यांनी विविध सायबर गुन्ह्यांचे प्रकार स्पष्ट करताना ऑनलाइन फ्रॉड (जॉब, बँकिंग, इन्व्हेस्टमेंट), सोशल मीडिया गुन्हे (फेक प्रोफाइल), कम्युनिकेशन फ्रॉड (ई-मेल हॅकिंग), रिलेशनशिप फ्रॉड (मॅट्रिमोनियल), ई-कॉमर्स फसवणूक होते. फिशिंगद्वारे ई-मेल, मेसेज किंवा कॉलच्या माध्यमातून संवेदनशील माहिती मिळवून फसवणूक केली जाते. हॅकिंगपासून बचावासाठी मजबूत पासवर्ड, टू-फॅक्टर ऑथेंटिकेशन वापरणे आवश्यक आहे.

या वेळी विविध उपयुक्त डिजिटल साधनांची माहिती देण्यात आली. 'डिजिलॉकर'मध्ये कागदपत्रे सुरक्षित ठेवणे, 'एम आधार' ॲपद्वारे आधार लॉक करणे, आपल्या नावावर असलेले सिम कार्ड तपासणे, तसेच 'चक्षु' आणि "https://cybercrime.gov.in/" पोर्टलवर तक्रार नोंदवणे याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. आपत्कालीन परिस्थितीत १९३० या हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क साधता येतो, याचीही माहिती देण्यात आली.

सविता जायभाये यांनी अपुऱ्या माहितीद्वारे लोक सायबर गुन्ह्यांच्या जाळ्यात अडकतात, त्यामुळे योग्य माहिती आणि सतर्कता अत्यंत आवश्यक असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्या डॉ. प्राप्ती देशमुख यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी डॉ.संजय आझादे, डॉ.सतीश संकाये, डॉ. सारिका शेळके आणि डॉ.रिता पाटील यांनी विशेष परिश्रम घेतले.

# शहाजी महाराज जयंती व छत्रपती संभाजी महाराज पुण्यतिथीनिमित्त कार्यक्रम





**तभा वृत्तसेवा**

**खुलताबाद, दि. १७ मार्च :** वेरूळ येथे दरवर्षी हजारो शिवभक्तांच्या उपस्थितीमध्ये मोठ्या उत्साहात संपन्न होणारी दोन दिवसीय स्वराज्य संकल्पक शहाजी महाराज भोसले ४३२ वी जयंती यावर्षी आपण साधेपणाने अभिवादन करण्याचे ठरविले आहे कारण दिनांक १८ मार्च रोजी युवराज छत्रपती संभाजी राजे यांची (तिथीप्रमाणे) पुण्यतिथी ३३७ वा मुख्य बलिदान दिवस ( फाल्गुन अमावस्या) १८ मार्च रोजी येत आहे.

या ऐतिहासिक प्रसंगी जयंती महोत्सव समिती वेरूळ गाव व छत्रपती संभाजी नगर जिल्ह्यातील शिवभक्तांच्या वतीने महाबली महापराक्रमी स्वराज्य संकल्पक शहाजीराजे भोसले व छत्रपती संभाजी महाराज यांना एकाच वेळी अभिवादन व आदरांजली कार्यक्रमाचे आयोजन केले आहे या सोहळ्यासाठी . संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील, जगद्गुरु स्वामी शांतिगिरी महाराज, आक्काताई महाराज ,अभयानंद महाराज यासह अनेक संत महंत त्याचबरोबर खुलताबाद तालुक्यातील सर्व आजी-माजी लोकप्रतिनिधी, विविध क्षेत्रातील मान्यवर छावा संघटनेतील सर्व पदाधिकारी व सर्व शिवभक्तांच्या उपस्थितीमध्ये दिनांक १८ मार्च २०२६ रोजी सकाळी ९ (नऊ) वाजता शहाजी महाराजांना अभिवादन व छत्रपती संभाजी महाराजांना आदरांजली सर्वांच्या उपस्थितीमध्ये वाहणार आहोत. जयंती पूर्वसंध्येला म्हणजे दिनांक १७ तारखेला दरवर्षी आपण जयंती महोत्सव समिती वेरूळ गावच्या वतीने ५००० दिव्याचा दीपोत्सव साजरा करीत होतो पण यावर्षी वरील महत्त्वपूर्ण कारणाने उद्या फक्त शहाजीराजे भोसले व छत्रपती संभाजी महाराज यांच्या चरणी ५ (पाच) दिवे जयंती महोत्सव समितीच्या वतीने दिनांक १७ तारखेला सायंकाळी सात वाजता लावण्यात येईल. दि १८ तारखेला स्वराज्य संकल्पक शहाजी राजे भोसले महाराज ४३२ वि जयंती व छत्रपती संभाजी महाराज ३३७ पुण्यतिथी कुठलाही गाजा वाजा न करता या भोसले घराण्यातील दोन युगप्रवर्तकांना अभिवादन व आदरांजली कार्यक्रम सकाळी नऊ वाजता संपन्न होईल तरी छत्रपती संभाजी नगर जिल्ह्यातील सर्व शिवभक्तांनी भोसले घराण्याचे उगमस्थान असलेल्या पितृ तीर्थ मालोजीराजे भोसले गडी श्री क्षेत्र वेरूळ येथे ,मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आव्हान स्वराज्य संकल्पक शहाजीराजे भोसले प्रतिष्ठान व जयंती महोत्सव समिती वेरूळ गाव यांच्या वतीने राजेंद्र पवार व प्रकाश पाटील मिसाळ सरपंच वेरूळ यांनी केले आहे

## हिंदू नववर्ष स्वागत समिती आणि शिवस्मारक समिती बजाजनगर वाळूज तर्फे नवीन वर्ष स्वागत व गुढीपूजन कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर, दि. १७ मार्च :** युगाब्द ५१२८ गुरुवार दिनांक १९ मार्च २०२६ रोजी गुढीपाडवा म्हणजेच वर्षप्रतिपदेला आपल्या नवीन वर्षाचा प्रारंभ होत आहे.नवीन वर्षाच्या स्वागताची जोरदार तयारी हिंदू नववर्ष स्वागत समिती बजाजनगर वाळूज छत्रपती संभाजीनगर यांनी केली असून गुढीपाडव्याच्या दिवशी १९ मार्चला सकाळी ८.३० वाजता शिवस्मारक बजाजनगर येथे भव्य गुढी उभारून भगवे ध्वज लावून नवीन वर्षाचे स्वागत करण्यात येणार असून या कार्यक्रमाला प्रमुख वक्ते म्हणून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे देवगिरी प्रांत कार्यवाह धनंजयजी धामणे उपस्थित राहणार आहेत.नवीन वर्षाच्या स्वागताला आणि गुढीपूजनाला सर्व हिंदू बंधू भगिनींनी मोठ्या संख्येत उपस्थित राहावे असे आवाहन हिंदू नववर्ष स्वागत समिती बजाजनगरचे अध्यक्ष श्री.प्रशांत पाथरीकर उपाध्यक्ष श्री.दामोदरजी घुगे उपाध्यक्ष श्री अनिलजी पाटील सचिव श्री.विजय सरकटे सहसचिव श्री. कैलास चव्हाण आणि अमित देशमुख संजीव तायडे आणि शिवस्मारक समितीच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

# मॅट्रिक्स कंपनीकडुन बोडखे यांची दिलगिरी

**तभा वृत्तसेवा**

**पैठण, दि. १७ मार्च :** काही वर्षांपूर्वी मॅट्रिक्स कंपनीला शेतकरी नेते विष्णू आसाराम बोडखे हे खंडणी मागत असल्याचा गुन्हा पैठण एम.आय.डि.सी. पोलिसांत दाखल करण्यात आला होता. हे प्रकरण न्यायप्रवीष्ठ असतांना आता कंपनी उप व्यवस्थापक व्यास यांनी प्रेस निवेदन काढून वरील प्रकार गैरसमजीतून घडल्याने आम्ही विष्णू बोडखे यांची दिलगिरी व्यक्त करतो असे पत्रकार परिषदेत स्पष्ट केले आहे.

पैठण एम.आय.डि.सी येथे मॅट्रिक्स लाईफ सायन्स रासायनिक द्रव्य उत्पादक कंपनी असून कंपनीतून हवेत तसेच परिसरात केमिकल युक्त पाणी सोडण्यात येत असल्याने जमिनीतील पिकाचे मोठे नुकसान झाले असून मातीची गुणवंता खालावली असल्याची तक्रार २०२३ मध्ये विष्णू बोडखे यांनी प्रदूषण महामंडळ व ईतर ठिकाणी केली होती. नेमक्या याच वेळी मॅट्रिक्स कंपनी व्यवस्थापक यांनी बोडखे हे कंपनीला खंडणी मागत असल्याची तक्रार पोलिसांत दाखल केली होती. याप्रकारणी एम.आय.डि.सी पोलीस ठाण्यात बोडखे यांच्याविरोधात विविध कलमान्वये गुन्हा दाखल करून त्यांना ताब्यात घेतले होते. पुढे बोडखे यांना या गुन्ह्यात जमीन मिळाला. आता हे प्रकरण सध्या न्यायालयात सुरु आहे.आता तीन वर्षानंतर मॅट्रिक्स कंपनीला जाग येत झालेला प्रकार गैरमजीतून घडला असून कंपनी बोडखे यांना झालेल्या शारीरिक.मानसिक. त्रासाबद्दल दिलगिरी व्यक्त करत असल्याचे उप व्यवस्थापक व्यास यांनी स्पष्ट केले. सदरील प्रकरण न्यायप्रविष्ठ असतांना कंपनीने घेतलेली ही पत्रकार परिषद न्यायालयाच्या न्यायदानावर प्रश्र्न उपस्थित करणारी आहे. अभिनंदन मंगल कार्यालय याठिकाणी झालेल्या या पत्रकार परिषदेला मॅट्रिक्स कंपनीचे उप व्यवस्थापक नितीन व्यास, शेतकरी नेते माऊली मुळे, विष्णू बोडखे उपस्थित होते.

# 'गांधी टॉक्स' चित्रपटाच्या विशेष प्रदर्शनास रसिक प्रेक्षकांचा प्रतिसाद



**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर, दि. १७ मार्च :** मराठवाडा आर्ट कल्चर अँड फिल्म फाऊंडेशन आयोजित अजिंठा वेरूळ आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव राऊंड द इयर कार्यक्रमांतर्गत एमजीएम स्कूल ऑफ फिल्म आर्ट्स येथील व्ही. शांताराम प्रेक्षागृहात 'गांधी टॉक्स' हा चित्रपट रसिक प्रेक्षकांच्या उदंड प्रतिसादात दाखविण्यात आला.

यावेळी चित्रपटाचे दिग्दर्शक किशोर बेळेकर, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे मानद कार्यक्रम व्यवस्थापक दत्ता बाळसराफ, यशवंतराव चव्हाण सेंटरच्या जिल्हा केंद्राचे सचिव नीलेश राऊत, डॉ. शिव कदम आणि डॉ. आनंद निकाळजे, रसिक प्रेक्षक व सर्व संबंधित मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना दिग्दर्शक किशोर बेळेकर म्हणाले, मी १५ वर्षे या चित्रपटाच्या कथेवर काम केले आहे. या चित्रपटाच्या एकंदरीतच निर्मिती प्रक्रियेला सुमारे २५ वर्षे लागली मात्र, मी या दरम्यान कोणत्याही गोष्टीत तडजोड केली नाही. मला ज्या प्रकारचा चित्रपट बनवायाचा होता आणि ज्या कलाकारांना यामध्ये घ्यायचे होते, त्या सर्वांना घेऊन मी हा चित्रपट बनवला आहे. मुकपट बनवणे आव्हान होते मात्र, तो आलेल्या अनेक अडचणींवर मात करून यशस्वीपणे बनवता आला. या चित्रपटातील प्रत्येक फ्रेममधून मला काहीतरी सांगायचे होते आणि मी ते सांगितले आहे.

'गांधी टॉक्स' ही कलाकृति खूप सुंदर असून मनाला भावते. दिग्दर्शक किशोर बेळेकर यांनी प्रचंड मेहनत घेत, आपल्या कलेप्रति ज्या श्रद्धेने हे सगळं मांडलं आहे, ते शब्दातीत आहे. हे पाहून महात्मा गांधी आणि गौतम बुद्ध यांच्याशिवाय जगाला पर्याय नाही, हा विचार मनामध्ये येतो, असे दत्ता बाळसराफ यांनी सांगितले.

नीलेश राऊत यावेळी बोलताना म्हणाले, संवादाशिवाय फक्त मुक अभिनय आणि पार्श्र्वसंगीतावर 'गांधी टॉक्स'चित्रपटाची संपूर्ण कथा सांगितली जाते. दिग्दर्शक किशोर बेळेकर आजच्या या विशेष प्रदर्शनासाठी स्वत: उपस्थित राहिले, ही आम्हा सर्व रसिक प्रेक्षकांसाठी एक पर्वणीच होती. या चित्रपटात त्यांनी महात्मा गांधींच्या विचारांचा आधुनिक काळाशी असलेला संबंध आणि त्याची उपयुक्तता यावर अत्यंत संवेदनशील पद्धतीने भाष्य केले आहे. समाजातील बदलते मूल्य, नैतिकता आणि मानवी वर्तन यावर सूक्ष्म निरीक्षण करणारा हा चित्रपट प्रेक्षकांना विचार करायला भाग पाडणारा आहे.

'गांधी टॉक्स'हा चित्रपट वेगळ्या शैलीत मांडलेला समकालीन प्रयोगशील चित्रपट आहे. हा एक सायलेंट (संवादविरहित) चित्रपट असून संपूर्ण कथानक दृश्यभाषा, अभिनय, देहबोली आणि संगीताच्या माध्यमातून उलगडत जाते. चित्रपटाला प्रसिद्ध संगीतकार ए. आर. रहमान यांनी संगीत दिले आहे. या चित्रपटात आंतरराष्ट्रीय ख्यातीचे अभिनेते विजय सेतुपती, अरविंद स्वामी, अदिती राव हैदरी आणि मराठीतील लोकप्रिय अभिनेते सिद्धार्थ जाधव यांनी प्रमुख भूमिका साकारल्या आहेत. याशिवाय महेश मांजरेकर, उषा नाडकर्णी, गोविंद नामदेव आणि प्रियदर्शिनी इंदलकर यांच्याही महत्त्वाच्या भूमिका आहेत.


### पाहिजेत

सूचित करण्यात येते की, राष्ट्रीय महामार्ग ५२ वरील हतनूर टोलनाका येथे माजी सैनिकांची भरती चालू आहे. गरजू माजी सैनिकांनी आवश्यक कागदपत्रांसह खालील ठिकाणी संपर्क साधावा.

**टोल व्यवस्थापक**
**तुकाराम राकडे**
**मोबाईल नंबर: ९०८२७८०८७१**
**पत्ताः हतनूर टोल प्लाजा, कन्नड छत्रपती संभाजीनगर, महाराष्ट्र, राष्ट्रीय महामार्ग ५२ वर**
**छत्रपती संभाजीनगर विभाग**

### पाहिजेत

सूचित करण्यात येते की, राष्ट्रीय महामार्ग ५२ वरील करोडी टोलनाका येथे माजी सैनिकांची भरती चालू आहे. गरजू माजी सैनिकांनी आवश्यक कागदपत्रांसह खालील ठिकाणी संपर्क साधावा.

**टोल व्यवस्थापक**
**सुभाष चन्द्र**
**मोबाईल नंबर: ९४६२२६१५८७**
**पत्ताः करोडी टोल प्लाजा, छत्रपती संभाजीनगर, फ्महाराष्ट्र, राष्ट्रीय महामार्ग ५२ वर छत्रपती**
**संभाजीनगर विभाग**


**मा.व्ही.डी. पाटील दिवाणी न्यायाधीश साहेब, क स्तर, कन्नड, यांचे न्यायालयात.**

दि.कि. अर्ज न. ३१/२०२६
पुढील तारीख २७/०२/२०२६
अर्जदार १) सुनिता भ्र. दिगंबर जाधव वयः ४० वर्ष, धंदाः घरकाम, रा. हिवरखेडा रोड पांडव नगरी कन्नड ता. कन्नड जि. औरंगाबाद २) मयंक पि. दिगंबर जाधव वयः १७ वर्ष, धंदाः, रा. हिवरखेडा रोड गजराज विहार कन्नड ता. कन्नड जि. औरंगाबाद (अ.पा.क जन्मदात्री आई अर्जदार क्र. १)
३) दिक्षांत पि. दिगंबर जाधव वयः ११ वर्ष, धंदाः शिक्षण रा. हिवरखेडा रोड गजराज विहार कन्नड ता. कन्नड जि. औरंगाबाद (अ.पा.क जन्मदात्री आई अर्जदार क्र. १)

विरुध्द

गैरअर्जदार ; निरंक

अर्ज : अर्जदार क्र. १ ते ३ हे मयत नामे दिगंबर धनराज जाधव यांचे कायदेशीर वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत. ज्याआर्थी अर्जदारांनी त्यांचे विधिज्ञ ॲड. व्ही. बी. काळे यांच्या मार्फत मा. न्यायालयात अर्ज सादर केला आहे की. अर्जदार क्र, १ ते ३ हे वारस असुन अर्जदार क्र. १ हि मयताची पत्नी असुन अर्जदार क्र. २ व ३ हे मुलं आहे. तसेच मयत दिगंबर धनराज जाधव हे दि. १९/०८/२०२५ रोजी मयत झाले असुन त्यांना अर्जदार क्र. १ ते ३ हे कायदेशीर वारस असुन अर्जदार क्र. १ ते ३ व्यतीरीक्त इतर कोणीही वारस नाहीत. मयत दिगंबर धनराज जाधव यांचा अंत्यसंस्कार हा वाडी सुतांठा, ता. सोयगाव येथे करण्यात आलेला आहे. तसेच मयत दिगंबर धनराज जाधव यांचे वडील व अर्जदार क्र. १ चे सासरे तसेच अर्जदार क्र. २ व ३ चे आजोबा हे देखील दिः ०८/११/२०१९ रोजी मयत झालेले आहे. मयत दिगंबर धनराज जाधव व धनराज चिंधा जाधव यांना अर्जदारांशिवाय कोणतेही कायदेशीर वारस नाहीत. मयत दिगंबर धनराज जाधव व धनराज चिंधा जाधव यांना मिळणारा शासकीय निमशासकीय योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्जदार यांना वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. तसेच संबधित तलाठी यांनी मयताच्या नावे असलेल्या स्थावर तसेच जंगम मिळकतीमध्ये वारसाची नोंद घेण्यासाठी मा. न्यायालयातुन वारस प्रमाणपत्र आणायचे सांगितले त्यामुळे सदर अर्ज दाखल करण्यास कारण घडले. अर्जदार यांनी सदर अर्जाव्यतिरीक्त इतर कोणत्याही मा. न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केलेला नाही. त्याआर्थी सदर जाहीर प्रगटन व्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार यांनी अर्ज केल्या नुसार वारसा प्रमाणपत्रासाठी परवानगी देण्या बाबत ज्या कुणास, कुठल्याही स्वरुपाचा उजर आक्षेप वगैर असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन तीस (३०) दिवसांच्या आंत आपला उजेर, आक्षेप मा. न्यायालयात नोंदवावा मुदतीत उजेर आक्षेप न आल्यास अर्जदाराच्या नावे वारसा प्रमाणपत्र देण्यात येईल. त्यानंतर आलेला उजर आक्षेप ग्राह धरला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.
दिः २४/०२/२०२६
**कनिष्ट लिपीक**
**व्ही. एम.पाखरे**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी न्यायाधिश क. स्तर, कन्नड**

### जाहिर सुचना/आव्हान

सदर सुचनेद्वारे जाहीर आव्हाण करण्यात येते की श्री.बाबु लक्ष्मण गाडेकर रा.सोयगाव ता.सोयगाव जि.छत्रपती संभाजीनगर यांचा मृत्यु दि.२८/०४/२०२५ सोमवार रोजी झालेला असून जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम१९६९(सुधारणा २०२३)नुसार एका वर्षाच्या आतील कालावधीत नोंद करण्यासाठी तहसिल कार्यालय यांचे आदेशानुसार नोंदणी करण्यासाठी कोणाची हरकत असल्यास १५ दिवसाच्या आत लेखी स्वरुपात कळवावे विहित मुदत नंतर आलेल्या उक्त दर्शविलेली तारीख बरोबर आहे का चूक आहे व विहित मुदतीत हरकत व आक्षेप प्राप्त न झाल्यास नंतर विचार केला जाणार नाही.

**संपर्क साधा**
**संदिप बाबु गाडेकर**
**रा.सोयगाव,तालुका सोयगाव जिल्हा - छत्रपती संभाजीनगर -४३११२०**
**मो. न. ८४५९३८०७२४**

### जाहिर सुचना/आव्हान

सदर सुचनेद्वारे जाहीर आव्हाण करण्यात येते की लीलाबाई दगडू चौधरी(जावळे)रा.सोयगाव ता.सोयगाव जि.छत्रपती संभाजीनगर यांचा मृत्यु दि.१५/०४/२०२५ मंगळवार रोजी झालेला असून जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम१९६९(सुधारणा २०२३)नुसार एका वर्षाच्या आतील कालावधीत नोंद करण्यासाठी तहसिल कार्यालय यांचे आदेशानुसार नोंदणी करण्यासाठी कोणाची हरकत असल्यास १५ दिवसाच्या आत लेखी स्वरुपात कळवावे विहित मुदत नंतर आलेल्या उक्त दर्शविलेली तारीख बरोबर आहे का चूक आहे व विहित मुदतीत हरकत व आक्षेप प्राप्त न झाल्यास नंतर विचार केला जाणार नाही.

**संपर्क साधा...**
**नारायण दगडू चौधरी ( जावळे)**
**रा.सोयगाव,तालुका सोयगाव**
**जिल्हा - छत्रपती संभाजीनगर -४३११२०**
**मो. न. ९३५६११८४०८**

**मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) सोयगांव यांचे न्यायालयात, जि. छत्रपती संभाजीनगर**

### जाहीर प्रगटन

दिवाणी किरकोळ अर्ज क्रं. - ५०/२०२६
नि. क्रं.

**१/-** युवराज तुकाराम तेलंग्रे, वय-४८ वर्ष, धंदा-शेती, रा. नवनाथ नगर गारखेडा, ता. जि. छ. संभाजीनगर.
**२/-** धनराज तुकाराम तेलंग्रे, वय-४६ वर्ष, धंदा-शेती, रा. आमखेडा, ता. सोयगाव, जि. छ. संभाजीनगर.
**३/-** मंगला मुरलीधर बारी, वय-५० वर्षे, धंदा-घरकाम, रा. महाबळ, ता. व जि. जळगाव.
**४/-** लताबाई सुभाष बारी, वय-४९ वर्षे, धंदा-घरकाम, रा. विठ्ठल पेठ, ता. व जि. जळगाव.

**विरुद्ध**
**निल**

**प्रकरण :- वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत.**

सर्व संबंधितास जाहिर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारसप्रमाणपत्र मिळणेसाठी **ॲड, सचिन सुनिल गिरी,** रा.सोयगांव, ता. सोयगांव, जि. औरंगाचाद यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. **मयत तुकाराम त्रंबक तेलंग्रे** यांचा दिनांक **०८.०१.२०२६** रोजी मौजे आमखेडा, ता. सोयगाव, **जि. छ. संभाजीनगर,** येथे मृत्यु झालेला असुन त्याच्या पश्चात वरील **अर्जदार क्र. १ ते ४ हे वारस आहे,** असा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे, **अर्जदार क्र. १ ते ४** हे मयत तुकाराम त्रंबक तेलंग्रे यांचे वारस असुन त्यांना शासकिय/निमशासकिय वारसप्रमाणपत्रासाठी आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार यांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल

आजरोजी दिनांक १७.०३.२०२६ रोजी सही व न्यायालयाच्या शिवक्यासह दिले असे.

**पु. ता. २९/४/२६**

**सही/-**
**क. लिपीक**

शिक्का

**आदेशावरून**
**सही/-**
**सहाय्यक अधीक्षक**

**दिवाणी व फौजदारी न्यायालय क-स्तर सोयगाव**

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## संक्षिप्त वृत्त...

### राजगोपालचारी उद्यानाची महापौर सय्यद इकबाल यांनी केली पाहणी

**परभणी,दि.१६(प्रतिनिधी) :** महानगरपालिकेच्या राजगोपालचारी उद्यानाची महापौर सय्यद इकबाल यांनी सोमवारी (दि.१६) पहाटे ६ वाजता भेट देऊन पाहणी केली. यावेळी उद्यानात सकाळच्या व्यायामासाठी व मॉर्निंग वॉकसाठी आलेल्या ज्येष्ठ नागरिक, महिला तसेच युवक-युवतींशी संवाद साधत त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या आणि त्या तात्काळ सोडविण्याचे आश्वासन दिले.

महापौर सय्यद इकबाल यांनी यापूर्वीही उद्यानाची पाहणी केली होती. सोमवारी पुन्हा पहाटेच उद्यानात जाऊन त्यांनी विविध सोयी-सुविधांचा आढावा घेतला. लहान मुलांसाठी असलेल्या खेळण्यांचीही त्यांनी तपासणी केली. काही खेळण्यांच्या दुरुस्तीचे काम सुरू असल्याची माहिती यावेळी देण्यात आली. पालकांनी आपल्या लहान मुलांना खेळण्यांकडे नेताना त्यांना दुखापत होणार नाही याची विशेष काळजी घ्यावी, असे आवाहनही महापौरांनी केले. उद्यानात येणाऱ्या नागरिकांनी स्वच्छतेची काळजी घ्यावी, असे सांगत महापालिकेच्या वतीने राजगोपालचारी उद्यानात स्वच्छता मोहीम युद्धपातळीवर सुरू असल्याचे त्यांनी नमूद केले. यावेळी उद्यान निरीक्षक मोहम्मद अथर यांना उद्यानाच्या वेळांबाबतही महत्त्वाच्या सूचना देण्यात आल्या. सकाळी वॉकसाठी येणाऱ्या ज्येष्ठ नागरिक, महिला तसेच युवक-युवतींची संख्या लक्षात घेऊन उद्यानाची तीनही मुख्य प्रवेशद्वारे सकाळी ५.३० वाजता उघडण्यात यावीत व सकाळी ९.०० वाजता बंद करण्यात यावीत. तसेच सायंकाळी ४.०० वाजता उद्यान पुन्हा खुले करून रात्री ९.०० वाजता बंद करण्यात यावे, असे आदेश महापौरांनी दिले. या निर्णयामुळे आता राजगोपालचारी उद्यान सकाळी ५.३० ते ९.०० आणि सायंकाळी ४.०० ते रात्री ९.०० या वेळेत नागरिकांसाठी खुले राहणार आहे. त्यामुळे लहान मुले, ज्येष्ठ नागरिक तसेच युवक-युवतींना फिरण्यासाठी व मॉर्निंग वॉकसाठी उद्यानाचा अधिक चांगल्या प्रकारे लाभ घेता येईल, असे महापौर सय्यद इकबाल यांनी यावेळी सांगितले.

### महानगरपालिकेच्या स्विकृत सदस्यपदासाठी तीन अर्ज दाखल

**परभणी,/प्रतिनिधी :** महानगरपालिकेच्या नामनिर्देशित सदस्यांच्या नियुक्तीसाठी सोमवार १६ मार्चपर्यंत महानगरपालिका आयुक्त नितीन नार्वेकर यांच्याकडे एकूण तीन अर्ज दाखल करण्यात आले आहेत.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमांतर्गत विशेष समिती व नामनिर्देशित सदस्यांची नियुक्ती करण्याबाबत राज्य शासनाने २३ मार्च २०२३ रोजी जारी केलेल्या राज्यपत्रातील अधिसूचनेनुसार या नियुक्त्या करण्यात येणार आहेत. या अनुषंगाने भारतीय जनता पक्षाच्या वतीने गटनेत्या सौ. तिरूमला मुकुंद खिल्लारे यांच्या नेतृत्वाखाली शिवाजी शेषेराव भरोसे यांचा नामनिर्देशित सदस्य म्हणून अर्ज आयुक्तांकडे दाखल करण्यात आला. यावेळी गटनेत्या तिरूमला मुकुंद खिल्लारे, शिवाजी भरोसे, मुकुंद खिल्लारे, पप्पू गायकवाड आदी उपस्थित होते.

तसेच राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने गटनेते विजयराव जामकर यांनी शेख फहाद शेख हमीद यांचा नामनिर्देशित सदस्य म्हणून अर्ज सादर केला. यावेळी विजयराव जामकर, शेख फहाद शेख हमीद, बाळासाहेब बुलबुले, अक्षय देशमुख, आकाश लहाणे, अब्दुल कमील, अब्दुल रहीम, अर्जुन सामाले, शेख वसीम, आखिल काजी आदी उपस्थित होते.

याशिवाय राहुल मुरकुटे यांनीही नामनिर्देशित सदस्यपदासाठी स्वतंत्र अर्ज दाखल केला. या वेळी सागर गंगाळे, मोहम्मद फारुख, बबलू टाक, मिलिंद बामणीकर, रितेश जैन आदी उपस्थित होते. अर्ज सादर करताना महानगरपालिकेचे माहिती व जनसंपर्क अधिकारी राजकुमार जाधव हेही उपस्थित होते.

### महापालिकेच्या पथकाद्वारे मोकाट श्वान पकडण्याची मोहिम : पथकाची स्थापना

**परभणी,/प्रतिनिधी :** महानगरपालिकेच्या वतीने शहरातील मोकाट श्वानांचा वाढता त्रास लक्षात घेऊन श्वान पकडण्याच्या मोहिम सुरु करण्यात आली असून त्याकरीता विशेष पथकाची स्थापना करण्यात आली आहे. या पथकाचे उद्घाटन सोमवार १६ मार्च रोजी दुपारी ३ वाजता महापौर सय्यद इकबाल, उपमहापौर गणेश देशमुख आणि आयुक्त नितीन नार्वेकर यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून करण्यात आले.

यावेळी बोलताना महापौर सय्यद इकबाल यांनी सांगितले की, शहरात मोकाट श्वानांची संख्या वाढत असल्यामुळे नागरिकांकडून वारंवार निवेदने येत होती. या पार्श्वभूमीवर महानगरपालिकेच्या वतीने पाच सदस्यांचे विशेष श्वान पकड पथक तयार करण्यात आले आहे. हे पथक शहरातील विविध भागात फिरून मोकाट श्वानांना पकडेल आणि त्यांची नसबंदी करण्याची प्रक्रिया राबविण्यात येईल, अशी माहिती त्यांनी दिली.

उपमहापौर गणेश देशमुख यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की, शहरात मोकाट श्वानांचा सुळसुळाट वाढल्यामुळे लहान मुले तसेच नागरिकांना चावा घेण्याच्या घटना वाढल्या असून त्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या समस्येवर नियंत्रण मिळवण्यासाठी श्वान पकड पथकाची स्थापना महत्त्वाची ठरणार असल्याचे त्यांनी नमूद केले.

महानगरपालिका आयुक्त नितीन नार्वेकर यांनीही पथकातील सदस्यांना आवश्यक सूचना दिल्या. शहरातील प्रत्येक कॉलनीमध्ये जाऊन मोकाट श्वानांना पकडावे, तसेच नागरिकांकडून ज्या भागातून तक्रारी किंवा कॉल प्राप्त होतील त्या ठिकाणी तात्काळ जाऊन कारवाई करावी. पकडलेल्या श्वानांची नसबंदी करून त्यावर नियंत्रण ठेवण्याचे निर्देश त्यांनी दिले.

या उद्घाटन प्रसंगी शेख वसीम, आमोल जाधव, माहिती व जनसंपर्क अधिकारी राजकुमार जाधव, पथक प्रमुख विनय ठाकूर, शंकर भागवत तसेच महानगरपालिकेचे इतर कर्मचारी उपस्थित होते.

### अबोल जीवांच्या संरक्षणासाठी वर्धमान संस्कार धाम सदैव ठाम - राजूभाई शाह :

**परभणी,/प्रतिनिधी :** अबोल जीवांची रक्षा आणि जीवदयेच्या सन्मानासाठी वर्धमान संस्कार धाम, मुंबई सदैव ठामपणे उभे राहील, असे प्रतिपादन संस्थेचे प्रमुख राजूभाई शाह यांनी केले.

गंगाखेड तालुक्यातील राणीसावरगांव येथील छत्रपती शिवाजी महाराज गोशाळेत रविवार १५ मार्च २०२६ रोजी गोरक्षक व गोशाळा संचालकांचा भव्य मेळावा आयोजित करण्यात आला होता. या वेळी विविध जिल्ह्यांतून आलेल्या गोरक्षक, गोसेवक आणि गोशाळा संचालकांनी गोशाळेमध्ये उभारण्यात आलेल्या गो-आधारित कृषी मॉडेलचे अवलोकन केले.

कार्यक्रमाची सुरुवात गोमाता पूजन व गोग्रास अर्पण करून भक्तिभावाने करण्यात आली. त्यानंतर मंचीय कार्यक्रम पार पडला. या प्रसंगी वर्धमान संस्कार धामचे प्रमुख राजूभाई शाह, गोभक्त विकास भाऊ गुंजाळ, कार्यक्रमाचे आयोजक शिवप्रसाद कोरे, हरिभक्त परायण अंभोरे महाराज, संदीपभाई शर्मा महाराज, गो कथाकार सागर महाराज, शिवसांब कोरे, ओंकार कोरे, मारुती कोरे तसेच किरण बिच्चेवार उपस्थित होते.

# अवकाळीच्या धास्तीने गहू काढणीची लगबग सुरू; हवामान खात्याचा पाऊस, वारा व गारांचा इशारा

**सोनपेठ ,/प्रतिनिधी-** शासकीय हवामान वेधशाळा व हवामान अभ्यासक पंजाब डख यांच्या अंदाजानुसार मराठवाड्यात अवकाळी पाऊस, वारा व गारांचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचा रब्बी गहू, ज्वारी व हरभरा काढणीला वेग आला असून अनेक शेतकरी अर्धवट हिरवा असलेला गहू कापून झाकून ठेवत आहेत. तर काहीजण तसाच मळणी यंत्रातून काढून घेत असल्याची लगबग सर्वत्र सोनपेठ तालुक्यात दिसून येत आहे.

गतवर्षीच्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्याचे खरीपाची पिके जमीन उध्वस्त झाली. त्यानंतर सोनपेठ तालुक्यातील शेतकऱ्यांनी रब्बी हंगामामध्ये हरभरा ज्वारी व गहू या पिकाची मोठ्या प्रमाणात पेरणी केली. लवकर पेरणी केलेले शेतकऱ्यांचा हरभरा व ज्वारीचे पीक काढून झाले असले तरी उशिराने पेरणी झालेल्या शेतकऱ्यांचा गहू, ज्वारी व हरभरा अजूनही शेतावरच उभा आहे. गेली आठवडाभरापासून हवामान अभ्यासक पंजाब व शासकीय हवामान वेध शाळेकडून दिनांक १७ ते २२ मार्च दरम्यान महाराष्ट्रासह मराठवाड्यातील बहुतांश जिल्ह्यामध्ये मेघगर्जनेसह अवकाळी पाऊस, सोसाट्याचा वारा येणार असल्याचा अंदाज वर्तविण्यात येत आहे. तसेच काही ठिकाणी गारा पडणार असल्याचेही भाकीत करण्यात आले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी शेतीमाल काढण्याची एकच लगबग सुरू केली आहे. पावसाच्या धास्तीने ज्वारी हरभरा व गहू काढून झाकून ठेवण्यासाठी शेतकरी धडपडत असताना दिसून येत आहेत, तर काही ठिकाणी ज्वारी गहू व हरभरा या पिकांची



काढणी करून त्याची मळणी करण्यासाठी धावपळ करताना दिसत आहेत. अशातच अनेकांना वेळेत मळणी यंत्र व मजूर मिळत नसल्यामुळे शेतकऱ्यांची धांदल उडाली आहे.

अवकाळीच्या धास्तीने मळणीचे भाव वाढले

अवकाळी पाऊस येणार असल्याने, हाता तोंडाशी आलेला घास निसर्गाने हिरावून घेऊ नये यासाठी जो तो शेतकरी धडपडताना दिसत आहे. यावेळी काढलेल्या पिकांची मळणी करण्यासाठी मळणी यंत्रासाठी धावाधाव सुरू असून मळणी यंत्र चालकांनी आपले भाव वाढविले आहेत. एक कट्टा गहू काढण्यासाठी १०० ते १५० रुपये, ज्वारी साठी १०० ते १५० रुपये तर हरभरा मळणी साठी १५० रुपये दराने पैसे घेतले जात आहेत. एवढे पैसे देऊनही वेळेत मळणी यंत्र मिळत नसल्यामुळे शेतकऱ्यांची मळणी यंत्राच्या शोधार्थ धावपळ सुरू आहे.

मजुरांचेही भाव वाढले

रब्बीचे ज्वारी, गहू, हरभरा पीक काढण्यासाठी मजुरांची टंचाई भासत असून तालुक्यातील अनेक मजूर ऊस तोडणीसाठी इतरत्र साखर कारखान्याकडे गेलेले आहेत. ऊस तोडणीच्या टोळ्या गावाकडे परतल्या नसल्यामुळे ठिकठिकाणी मजुरांची टंचाई भासत आहे. अशातच गहू काढण्यासाठी प्रति एक्कर २ ते ३ कट्टे (६० किलो प्रती कट्टा),एक एक्कर ज्वारी काढण्यासाठी दोन ते आडीच कट्टा ज्वारी, एक एक्कर हारभरा काढणीसाठी ४००० रुपये याप्रमाणे मजुरी द्यावी लागत आहे. एवढे देऊनही वेळेत मजूर मिळत नसल्याने शेतकऱ्यांची धांदल उडाली आहे. अवकाळी पाऊस येणार आहे या धास्तीने शेतमजुरांचे व मळणी यंत्र चालकांचे भाव दीडपट ते दुप्पट वाढले आहेत. तालुक्यातील कमी शेत जमीन असलेले लहान शेतकरी हे स्वतः घरच्या घरी पीक काढण्यासाठी शेतावर राबताना दिसत आहेत. तर जास्त शेती असलेल्या मोठ्या बागायतदार शेतकऱ्यांना मात्र मजूर वेळेत मिळत नसल्यामुळे मोठी कसरत करावी लागत आहे. उत्पादन काढण्यासाठी आजपर्यंत केलेला खर्च व बाजारातील मिळणारा शेतमालाचा भाव पाहता शेतकऱ्यांचे जमा-खर्चाचे गणित जुळणे कठीण झाले आहे.

### मराठवाडा हायस्कूलचा ठसा; सई चिटणीस हिला रौप्यपदक



**परभणी,/प्रतिनिधी-** मुंबई येथे १० मार्च रोजी पार पडलेल्या राज्यस्तरीय बालनाट्य स्पर्धेच्या अंतिम फेरीत परभणीच्या मराठवाडा हायस्कूलने उल्लेखनीय कामगिरी करत आपला ठसा उमटवला. इयत्ता आठवी 'ब' वर्गातील कु. सई आशिष चिटणीस हिने उत्कृष्ट अभिनय सादर करत वैयक्तिक मुली गटात रौप्य पदक पटकावले.

या स्पर्धेत राज्यभरातून एकूण ४२ नाटकांचे सादरीकरण करण्यात आले होते. त्यामध्ये मराठवाडा हायस्कूलने सादर केलेल्या 'मोतीचूर' या नाटकाने प्रभावी सादरीकरण करत तृतीय क्रमांक मिळवला. या यशाबरोबरच संघाला ८० हजार रुपयांचे रोख पारितोषिकही मिळाले. विद्यार्थ्यांच्या या यशामुळे शाळेचा लौकिक राज्यस्तरावर अधिक उंचावला आहे. या नाटकात कु. सई चिटणीस, सर्वेश चिटणीस, स्वरा कुलकर्णी, साईराज गायकवाड आणि शौर्य गायकवाड यांनी आपल्या भूमिका प्रभावीपणे साकारत प्रेक्षकांची मने जिंकली. त्यांच्या अभिनयाचे परीक्षकांनीही कौतुक केले. कु. सई चिटणीस हिने साकारलेली भूमिका विशेष गाजली आणि तिच्या दमदार अभिनयामुळे तिला वैयक्तिक गटात रौप्य पदक प्राप्त झाले.

या उल्लेखनीय यशाबद्दल कु. सई चिटणीस व त्यांच्या पालकांचे अभिनंदन करण्यात आले. तसेच सर्व सहभागी विद्यार्थ्यांचे मनापासून कौतुक करण्यात आले. नूतन विद्या समितीचे अध्यक्ष विजय जोशी, उपाध्यक्ष अनिल अष्टूरकर, उपाध्यक्ष दिलीप कुलकर्णी, सचिव संतोष धारासुरकर, सहसचिव व मुख्याध्यापक अनंत पांडे, कोषाध्यक्ष श्रीनिवास मुंदडा, संचालक वेंकटेश तोरंबेकर, वर्गशिक्षिका सौ. विद्या सोनुने आणि सर्व शिक्षक बंधू-भगिनी यांनी सई चिटणीस हिचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## तहसील कार्यालयातूनच जप्त ट्रॉलीची चोरी; प्रशासनाच्या सुरक्षेवर झाले मोठे प्रश्नचिन्ह?

**सेलू,/प्रतिनिधी-** तहसील कार्यालयातूनच जप्त ट्रॉलीची चोरी प्रशासनाच्या सुरक्षेवर प्रश्न चिन्ह समोर उभे टाकण्यात आले आहे.

सेलू तहसील प्रशासनाच्या निष्काळजीपणाचा पर्दाफाश करणारी धक्कादायक घटना सेलू येथे उघडकीस आली आहे. थेट तहसील कार्यालयाच्या आवारातून महसूल विभागाने जप्त केलेली ट्रॅक्टर ट्रॉली अज्ञात चोरट्यांनी लंपास केल्याने सरकारी यंत्रणेच्या सुरक्षा व्यवस्थेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

या प्रकरणी मोरेगाव येथील तलाठी राधिका गंगाधरराव गरुड यांच्या फिर्यादीवरून सेलू पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम ३०३ (२) अंतर्गत अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, ११ फेब्रुवारी २०२६ रोजी महसूल विभागाने विनाक्रमांकाची लाल रंगाची ट्रॅक्टर ट्रॉली जप्त करून ती तहसील कार्यालयाच्या आवारात ठेवली होती. ९ मार्च रोजी सायंकाळी सहाय्यक महसूल अधिकारी




राऊत यांनी जप्त वाहनांची पाहणी केली असता सदर ट्रॉली जागेवर असल्याचे दिसून आले. मात्र १० मार्च रोजी सकाळी ११ वाजता पुन्हा पाहणी केली असता ही ट्रॉली रहस्यमयरीत्या गायब झाल्याचे उघड झाले. विशेष म्हणजे सदर ट्रॉली सोडण्याचा कोणताही अधिकृत आदेश तहसील कार्यालयाकडून देण्यात आलेला नसताना ती अचानक गायब झाल्याने प्रशासनाच्या बेपर्वाईचा मुद्दा पुढे आला आहे. सुमारे ७० हजार रुपये किंमतीची ही ट्रॉली अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याचा संशय व्यक्त करण्यात येत आहे.

सरकारी कार्यालयाच्या आवारातूनच जप्त माल चोरीला जाणे ही अत्यंत गंभीर बाब मानली जात असून प्रशासनाच्या सुरक्षा व्यवस्थेचा फज्जा उडाल्याची चर्चा नागरिकांमध्ये रंगू लागली आहे. विशेष म्हणजे काही दिवसांपूर्वीच तहसील कार्यालयात वाहन तोडफोडीची घटना घडली होती. त्या घटनेची धूळ खाली बसण्याआधीच आता जप्त ट्रॉलीच चोरीला गेल्याने या प्रकारात आतील संगनमत तर नाही ना, असा संशयही व्यक्त केला जात आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस करत असून चोरट्यांचा शोध घेण्याचे मोठे आव्हान पोलिसांसमोर उभे ठाकले आहे. तसेच या प्रकारामागे कोणाचा सहभाग आहे का, याची सखोल चौकशी होणार का, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

## पाथरी येथील रोजगार मेळाव्यास उमेदवारांचा उस्फूर्त प्रतिसाद

**परभणी ,/प्रतिनिधी:** परभणी जिल्हयातील गरजू सुशिक्षित बेरोजगारांना खाजगी क्षेत्रात नोकरीची एक संधी उपलब्ध व्हावी या हेतूने जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, परभणी व वाल्मिकी शिक्षण प्रसारक मंडळ परभणी संचलित शांताबाई नखाते विद्यालय, पाथरी यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १७/०३/२०२६ रोजी सकाळी १०:०० वाजता शांताबाई नखाते विद्यालय, शिवाजी नगर, पाथरी येथे ''पंडित दिनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा'' आयोजीत करण्यात आलेला होता. जिल्हयातील दहावी, बारावी, आयटीआय, डीप्लोमा, पदवी इत्यादी शैक्षणीक पात्रता धारक उमेदवारांसाठी ट्रेनी ऑपरेटर, क्षेत्र अधिकारी




(), क्षेत्र अधिकारी (), विमा सल्लागार, विमा सखी, मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षणार्थी () इत्यादी २०० पदांसाठी मुलाखती आयोजित करण्यात आल्या होत्या. या मेळाव्यास १३० उमेदवार उपस्थितीत होते त्यापैकी ७४ उमेदवारांची प्राथमिक निवड करण्यात आली. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून श्री अनिल नखाते, वाल्मिकी शिक्षण प्रसारक मंडळ परभणी, प्रमुख मार्गदर्शक श्री प्र.सो. खंदारे, सहायक आयुक्त कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता परभणी, प्रमुख पाहुणे श्री आर.एम. टेंगसे प्रशासकीय अधिकारी वाल्मिकी शिक्षण प्रसारक मंडळ परभणी, व श्री सि.एस.उस्तुरगे शासकीय औद्योगीक प्रशिक्षण संस्था पाथरी हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्राध्यापक श्री किशन डहाळे सर यांनी केले. रोजगार मेळावा यशस्वी होण्यासाठी जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्रातील श्री प्रविण रुद्रकंठवार श्री राहूल गजभारे, श्री सचिन चव्हाण, श्री राहूल काळे, श्री करिमोदीन अन्सारी यांनी सहकार्य केले.

## युवा मोर्चा प्रदेशाध्यक्ष कृष्णराज महाडिक यांच्या नेतृत्वाखाली पश्चिम बंगाल विधानसभेत प्रचार



**परभणी,/प्रतिनिधी:** भाजप युवा मोर्चाचे जिल्हा अध्यक्ष प्रभाकर (देवा) शिंदे पश्चिम बंगाल विधानसभेत प्रवासी कार्यकर्ता प्रचारक म्हणून प्रदेशाध्यक्ष कृष्णराज महाडिक यांनी मराठवाडा विभागातून निवड केली आहे.हि निवड केल्याबद्दल महाराष्ट्राचे लोकप्रिय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण,राज्य मंत्री मेघना दिदी बोर्डीकर प्रदेश उपाध्यक्ष संजय कौडगे,प्रदेशाध्यक्ष कृष्णराज महाडिक,जिल्हाध्यक्ष सुरेश भुमरे मराठवाडा समन्वयक अरुण पाठक, दत्तप्रसाद जाधव यांचे देवा शिंदे यांनी आभार मानले आहेत.

याबाबत सविस्तर माहिती अशी की,आता होत असलेल्या पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीत महाराष्ट्र भाजप युवा मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष कृष्णराज महाडिक यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्रातील युवा मोर्चाचे पदाधिकारी प्रवासी कार्यकर्ता म्हणून प्रचार करणार आहेत. यामध्ये प्रभाकर (देवा) शिंदे यांची प्रवासी कार्यकर्ता प्रचारक म्हणून त्यांनी निवड केली आहे. या निवडणुकीत युवा मोर्चाचे पदाधिकारी राष्ट्रीय नेत्यांसोबत पश्चिम बंगाल राज्यातील विधानसभा निवडणुकीत प्रचार करणार आहेत.या निवडीबद्दल सर्व स्तरातून युवा नेत्याचे अभिनंदन केले जात आहे.

## गर्भाशय मुखाच्या कर्करोगाविरुद्ध लढा देण्यासाठी सेलूत तालुका शीघ्र पथकाची बैठक

**सेलू,/प्रतिनिधी:** गर्भाशय मुखाच्या कर्करोगाविरुद्ध लढा देण्यासाठी सेलूत तालुका शीघ्र पथकाची बैठक घेण्यात आली होती.

तहसील कार्यालय सेलू येथे दि. १० मार्च रोजी एच.पी.व्ही. (ह्युमन पॅपिलोमा व्हायरस) लसीकरण मोहिमेबाबत तहसीलदार श्री. शिवाजी मगर यांच्या अध्यक्षतेखाली तालुका शीघ्र पथकाची बैठक संपन्न झाली. या बैठकीस गटविकास अधिकारी उदय जाधव, उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. संजय हरबडे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. के. पी. चौधरी, एकात्मिक बालविकास विभागाचे प्रकल्प अधिकारी बाबासाहेब खरात तसेच शिक्षण विभागातून अंभोरे मॅडम उपस्थित होत्या. यावेळी डॉ. संजय हरबडे यांनी एच.पी.व्ही. लसीकरणाबाबत सविस्तर माहिती दिली. भारतात गर्भाशय पिशवीच्या मुखाच्या कर्करोगाचे प्रमाण चिंताजनक असून दर एक लाख महिलांमागे सुमारे ११.६ महिलांना हा कर्करोग होतो, तर ५.१ महिलांचा मृत्यू होतो. सन २०२२ मध्ये देशात ७९,१०३ नवीन रुग्ण आढळले असून त्यापैकी ३४,८०५ महिलांचा मृत्यू झाल्याचे त्यांनी सांगितले. ह्युमन पॅपिलोमा विषाणूमुळे हा कर्करोग होतो. या आजाराच्या प्रतिबंधासाठी एच.पी.व्ही. लस विकसित करण्यात आली असून पाश्चात्य देशांमध्ये ही लस नियमितपणे दिली जाते. दि. ८ मार्च २०२६ रोजी जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने राज्यात या लसीकरण मोहिमेचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, आरोग्यमंत्री प्रकाश आंबिटकर आणि आरोग्य राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांच्या हस्ते करण्यात आले. २०३० पर्यंत गर्भाशय मुखाच्या कर्करोगाचे निर्मूलन करणे हा या मोहिमेचा मुख्य उद्देश आहे. त्यासाठी १४ ते १५ वर्षे वयोगटातील ९० टक्के मुलींना लसीकरण, ३५ व ४५ वर्ष वयोगटातील ७० टक्के महिलांची तपासणी तसेच निदान झालेल्या ९० टक्के महिलांवर उपचार करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. सेलू तालुक्यात १४ वर्ष पूर्ण व १५ वर्षांच्या आत असलेल्या मुलींना उपजिल्हा रुग्णालय सेलू तसेच ग्रामीण भागासाठी प्राथमिक आरोग्य केंद्र वालूर व देऊळगाव गात येथे ही लस दिली जाणार आहे. प्रशिक्षित आरोग्य कर्मचारी ही लस देणार असून त्याची ऑनलाइन नोंद करण्यात येणार आहे. तसेच लसीकरणाचे प्रमाणपत्र त्वरित दिले जाणार आहे. ही लस डाव्या दंडाच्या स्नायूमध्ये ०.५ मिली इतकी देण्यात येते.

'गार्डासिल' नावाची ही लस अत्यंत प्रभावी असल्याचेही सांगण्यात आले. तालुक्यातील शाळेत शिकणाऱ्या तसेच शाळाबाह्य १४ ते १५ वर्ष वयोगटातील मुलींनी जवळच्या शासकीय रुग्णालयात ही लस घ्यावी आणि पालकांनी यासाठी सहकार्य व संमती द्यावी, असे आवाहन तहसीलदार शिवाजी मगर यांनी केले.

## अग्रलेख...

# आयुधांचा अनाठायी आधार!

संसदेच्या सभागृहाचा कारभार नियमांनुसार चालतो. सत्ताधारी किंवा विरोधकांतील कोणीही पक्ष किंवा सदस्य कितीही ज्येष्ठ असला, त्याच्या पाठीशी कितीही संख्याबळ असले किंवा त्यास कितीही मोठा जनाधार लाभलेला असला, तरी संसदीय कामकाजाच्या नियमांकडे पाठ फिरवून मनमानीपणे त्यास कामकाजात सहभागी होता येत नाही. तथापि, सध्या संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या दुसऱ्या सत्राच्या कामकाजात जे काही सुरू आहे, ते पाहता, संसदीय कामकाजाच्या शिस्त, संकेत व नियमांचे भान विरोधी पक्षांस आहे किंवा नाही याची शंका येणे साहजिक आहे. सत्ताधाऱ्यांस अडचणीत आणण्यासाठी किंवा धारेवर धरण्यासाठी संसदीय नियमांच्या चौकटीत राहून आक्रमकपणाने कामकाजात सहभागी होणे हे विरोधकांचे कामच असते. मात्र, कामकाजाच्या नियमांचा आधार घेऊन एखादे वैधानिक आयुध उपसायचे आणि ज्या कारणासाठी त्याचा वापर करण्यास संमती मिळालेली असेल त्यापासून भरकटत जाऊन भलतीकडेच ते आयुध चालवायचे असेच काहीसे विरोधी बाकांवरून सुरू असल्याचा जो आरोप होत आहे, ते पाहता, विरोधकांना देशाच्या आणि जनतेच्या हितासाठी संसदेच्या कामकाजाचा मंच वापरावयाचा आहे की केवळ सत्ताधाऱ्यांच्या प्रतिमाहननाचा जुना एककलमी कार्यक्रम राबविण्यासाठी संसदेचा वापर करावयाचा याबाबत शंका यावी अशी स्थिती दिसते. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि सत्ताधारी रालोआ यांचे पूर्ण प्रतिमाहनन करणे आणि जनमानसातील त्यांचे स्थान डळमळीत करणे हा विरोधकांचा, विशेषतः काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांचा एकमेव कार्यक्रम असल्याची बाब आता लपून राहिलेली नाही.

येत्या महिनाभरात देशातील पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुका पार पडणार आहेत. त्याआधी प्रतिमाहननाचा हा कार्यक्रम नेटाने राबविण्याच्या मोहिमेचाच एक भाग म्हणून, देशाच्या मुख्य निवडणूक आयुक्तांविरोधात महाभियोगाचा प्रस्ताव विरोधकांकडून दाखल करण्यात येत आहे. येत्या ९ एप्रिलपासून ४ मेपर्यंतच्या काळात देशातील केरळ, तामिळनाडू, पश्चिम बंगाल, आसाम या चार राज्यांच्या आणि पुडुचेरी या केंद्रशासित प्रदेशाच्या विधानसभा निवडणुकांचा कार्यक्रम निवडणूक आयोगाने जाहीर केल्यानंतर आता मुख्य निवडणूक आयुक्तांविरोधातील महाभियोगाच्या विरोधकांच्या कृतीस राजकीय महत्त्व प्राप्त झाले असून कोणत्याही प्रकारे सरकारचे व सरकारी वा स्वायत्त यंत्रणांचे प्रतिमाहनन करण्याच्या सातत्यपूर्ण कार्यक्रमाचाच हा एक भाग ठरेल. पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी राज्यातील मतदारयाद्यांच्या (एसआयआर) सखोल फेरतपासणी मोहिमेच्या विरोधात मुख्य निवडणूक आयुक्तांविरुद्ध थेट संघर्ष पुकारला असून त्याआडून केंद्र सरकारवर प्रतिमाहननाचे हत्यार चालविण्याचा त्यांचा राजकीय हेतू लपून राहिलेला नाही. मुख्य निवडणूक आयुक्त हे एसआयआरचे निमित्त साधून भाजपाच्या फायद्यासाठी काम करत आहेत, असा त्यांचा आरोप असल्याने, गेल्या १५ वर्षांची सत्ता शाबूत ठेवण्यासाठी ममता बॅनर्जी यांनी प्रतिमाहननाचे हे नवे हत्यार उपसून निवडणुका गाजविण्याचे ठरविलेले दिसते. निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर होण्याच्या जेमतेम दोन दिवस अगोदर विरोधकांनी संसदेत मुख्य निवडणूक आयुक्तांविरुद्ध महाभियोग चालविण्याची मागणी करणारा प्रस्ताव सादर केला आहे. देशाच्या इतिहासात बहुधा प्रथमच, मुख्य निवडणूक आयुक्तांच्या विरोधात दाखल होणाऱ्या महाभियोग प्रस्तावावरील चर्चेच्या निमित्ताने पुन्हा एकदा संसदेच्या मंचावर सत्ताधाऱ्यांच्या प्रतिमहननाची मोहीम तीव्र करण्याचा विरोधकांचा हेतू आहे का, हे काळाच्या ओघात पुन्हा स्पष्ट होणारच आहे. पण त्याचा आगामी निवडणुकांमध्ये राजकीय लाभ उठविण्याच्या त्यांचा प्रयत्न असेल हे मात्र आता स्पष्ट झाले आहे.

या चारही राज्यांतील राजकारण हे केवळ विचारधारांवर नाही, तर तेथील खोलवर रुजलेल्या जातीय आणि धार्मिक समीकरणांवरही आधारित आहे. प्रत्येक राज्याची सामाजिक संरचना वेगळी असल्याने त्यांचा निवडणुकीवरील प्रभावही भिन्न असतो. तामिळनाडूचे राजकारण तर देशातील अन्य राज्यांपेक्षा वेगळे आहे. येथे द्रविडी चळवळीतून सत्ताकारणाचा पाया रचला गेला आहे. द्रविडी अस्मिता आणि ओबीसी राजकारण ही या राज्याच्या सत्तेची सूत्रे आहेत. त्यातूनच ब्राह्मण व ब्राह्मणेतर अशा जातीय संघर्षास खतपाणी घातले गेले. लोकसंख्येच्या प्रमाणात जातीय प्रभाव असलेला ओबीसी समुदाय, वन्नियार समुदाय, थेवर, गोंडर आदी समुदायांची ताकद पाठीशी उभी करण्यासाठी या संघर्षाचा वापर केला जातो. दलित समुदायाची मतेही प्रभावी असल्याने, आरक्षण हादेखील येथील कळीचा मुद्दा राहिला आहे. जो पक्ष या समुदायांस गोंजारतो, तो सत्तेच्या जवळ जातो हा या राज्याच्या सत्ताकारणाचा इतिहास राहिला आहे. केरळच्या राजकारणासही जातींच्या राजकारणाचे कंगोरे आहेत. सुमारे ४५ टक्के अल्पसंख्यक समुदायाचे पाठबळ मिळविणे आणि हिंदू समुदायांतील प्रभावी गटांना गोंजारणे ही येथील निवडणुकीची राजनीती असते, तर आसाममध्ये स्थानिक व उपरे यावर प्रादेशिक व वांशिक अस्मिता जोपासली जाते. त्यामुळे धार्मिक, जातीय ध्रुवीकरण हा या राज्यांच्या सत्ताकारणाचा केंद्रबिंदू राहिला आहे. पश्चिम बंगालमध्ये डाव्यांच्या दीर्घ सत्ताकाळात लपून राहिलेली जातीय समीकरणे ममता सरकारच्या सत्ताकारणात फोफावली आणि एसआयआरच्या निमित्ताने आता या समीकरणांची मोडतोड होण्याची भीती निर्माण झाल्याने, महाभियोगाच्या प्रस्तावाचे हत्यार निवडणुकीत वापरले जाईल. कारण या पाच राज्यांपैकी पश्चिम बंगाल, केरळ आणि तामिळनाडू या राज्यांमध्ये विरोधकांची मजबूत सत्ताकेंद्रे प्रस्थापित झालेली आहेत. आसामवर गेल्या १० वर्षांपासून भाजपाचा झेंडा आहे आणि या राज्याची सत्ता कायम राखण्यासाठी भाजपची मजबूत मोर्चेबांधणी सुरू राहणार आहे. बंगालमध्ये ममता बॅनर्जींच्या तृणमूल सरकारला सत्तेवरून खेचण्यासाठी भाजपने सारी ताकद पणाला लावली आहे, तर केरळ आणि तामिळनाडूमध्ये ताकद वाढविण्यावर भाजपाचा भर राहणार आहे. २०१९ मध्ये भाजपची पश्चिम बंगालमधील स्थिती सुधारली होती. मात्र तृणमूल काँग्रेसच्या आक्रमक राजकारणाने भाजपची वाटचाल खडतर राहिली. आता सलग चौथ्यांदा राज्याची सत्ता हस्तगत करण्यासाठी ममता बॅनर्जी यांनी सुरू केलेल्या प्रयत्नांना मुख्य निवडणूक आयुक्तांविरुद्धचा महाभियोग प्रस्ताव आणि मतदारयाद्या अद्ययावतीकरणातून वगळलेल्या नावांचे राजकारण साथ देणार का, हा कळीचा मुद्दा ठरणार आहे. कोलकाता येथे घडलेले आरजी कार इस्पितळ बलात्कार प्रकरण हे ममता सरकारसमोरील आव्हान ठरणार आहे. मात्र, या राज्यातील जवळपास २७ टक्के मुस्लिम समुदायाच्या मनात असुरक्षिततेची भावना पेरण्याच्या राजकारणातून भाजपाविरोधाची हवा तापविण्याचा त्यांचा प्रयत्न राहणार हे स्पष्ट आहे.

मतदारयाद्यांच्या सखोल तपासणी मोहिमेमुळे एकही पात्र मतदार मतदानापासून वंचित राहणार नाही आणि एकाही अपात्र व्यक्तीस मतदान करता येणार नाही अशी कठोर भूमिका निवडणूक आयोगाने घेतल्याने पश्चिम बंगालमधील मतदारयाद्यांमधून जवळपास ६३ लाख नावे वगळली गेली आहेत. आणखी सुमारे ६० लाख नावांचे भवितव्य पणाला लागलेले आहे. हा ममता बॅनर्जी यांच्या प्रस्थापित राजकारणास मोठा धक्का मानला जातो. त्यामुळेच, महाभियोग प्रस्ताव आणि एसआयआरद्वारे सुरू झालेली मतदार छाननी या दोन बाबी निवडणूक प्रचारातील भाजपच्या प्रतिमाहननाच्या मोहिमेत केंद्रस्थानी राहाव्यात असा प्रयत्न राहील. याआधीच्या निवडणुकांत मतदान यंत्रांच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्हे उमटविण्याचा प्रयत्न झाला होता. मतदारयाद्यांतील घोळाचे भांडवल करून सत्ताधारी भाजपा व निवडणूक आयोगास घेरण्याचा प्रयत्न झाला होता. आता महाभियोगाचे आयुध उगारून नव्या प्रयत्नासाठी सज्ज होण्याचा प्रयत्न विरोधकांच्या तंबूत सुरू झाला आहे. अशा राजकारणात, लोकशाहीचे पवित्र मंदिर असलेल्या संसदेच्या कामकाजास वेठीस धरले जाऊ नये ही सामान्य नागरिकांची अपेक्षा उपेक्षित राहता नये!

## आंतरराष्ट्रीय

प्रा. जयसिंग यादव

# जगावर दीर्घकालीन युद्धाची सावली

इराण आणि अमेरिका यांच्यात वाढत चाललेला संघर्ष केवळ दोन राष्ट्रांमधील लष्करी चकमकींपुरता मर्यादित नाही. या संघर्षात दोन्ही बाजूंनी लढाई दीर्घकाळ सुरू ठेवण्याचा व्यक्त केलेला निर्धार, त्यामागील सामरिक गणित, भूतकाळातील अनुभव आणि जागतिक परिणाम यांचा विचार केल्यास हा प्रश्न केवळ प्रादेशिक राहात नाही, तर संपूर्ण जगाच्या स्थैर्यावर परिणाम करणारा ठरतो. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी आपल्या देशाकडे प्रचंड शस्त्रसाठा असल्याचा दावा करत युद्ध दीर्घकाळ चालवण्याची क्षमता असल्याचे संकेत दिले आहेत. दुसरीकडे, इराणनेही किमान सहा महिने युद्ध सुरू ठेवण्याचा इशारा दिला आहे. या दोन घोषणांमधून स्पष्ट होते की संघर्ष तात्पुरता किंवा मर्यादित राहील, अशी अपेक्षा करणे अवास्तव ठरू शकते. आधुनिक युद्धात निर्णायक विजय पटकन मिळत नाही; उलट दीर्घकालीन संघर्ष हीच अधिक सामान्य बाब बनली आहे. लष्करी शक्तीच्या दृष्टीने पाहता अमेरिका जगातील सर्वांत सामर्थ्यशाली राष्ट्र मानले जाते. तिच्याकडे अत्याधुनिक हवाई दल, नौदल, क्षेपणास्त्र तंत्रज्ञान आणि जगभर पसरलेले लष्करी तळांचे जाळे आहे. याउलट इराणकडे अमेरिकेसारखी प्रचंड पारंपरिक लष्करी क्षमता नसली, तरी त्याने असीमित युद्धतंत्र विकसित केले आहे. बॅलिस्टिक क्षेपणास्त्रे, ड्रोन तंत्रज्ञान, प्रादेशिक मित्रगट आणि समुद्री मार्गांवर प्रभाव टाकण्याची क्षमता या माध्यमातून तो आपल्या तुलनेने कमी साधनसामग्रीतून मोठ्या शक्तीला आव्हान देऊ शकतो.

अमेरिकेच्या लष्करी इतिहासाकडे पाहिले असता एक महत्त्वाची बाब लक्षात येते. प्रचंड शक्ती असूनही तिला काही वेळा तुलनेने लहान किंवा कमी शक्तिशाली राष्ट्रांविरोधात अपेक्षित यश मिळालेले नाही. याचे सर्वांत मोठे उदाहरण म्हणजे व्हिएतनाम युद्ध. तांत्रिक आणि लष्करी वर्चस्व असूनही अमेरिकेला दीर्घकाळ चाललेल्या संघर्षानंतर माघार घ्यावी लागली. त्याचप्रमाणे अफगाणिस्तानमध्ये दोन दशके ठाण मांडूनही शेवटी अमेरिकेवर माघारीची नामुष्की ओढवली. अमेरिका आणि इराण यांच्यातील संघर्ष दीर्घकाळ चालल्यास दोन्ही देशांना किंमत चुकवावी लागेल. अमेरिकेसाठी सर्वांत मोठा प्रश्न आर्थिक आणि सामरिक संसाधनांचा असेल. जगभर अनेक लष्करी जबाबदाऱ्या सांभाळताना आणखी एक मोठा संघर्ष टिकवून ठेवणे हे तिच्यासाठी आव्हानात्मक ठरू शकते. इराणसाठीही परिस्थिती सोपी नाही. आंतरराष्ट्रीय निर्बंध, मर्यादित आर्थिक साधने आणि आधीच दबावाखाली असलेली अर्थव्यवस्था यामुळे दीर्घ युद्ध देशांतर्गत संकटे वाढवू शकते. म्हणजेच, या संघर्षात जिंकणारा कोणी असला, तरी तो पूर्णपणे निष्कलंक राहणार नाही. दोन्ही बाजूंना मोठी मानवी, आर्थिक आणि राजकीय किंमत मोजावी लागेल. या संघर्षाचा परिणाम केवळ मध्यपूर्वेपुरता मर्यादित राहणार नाही. विशेषतः ऊर्जा बाजारपेठेवर त्याचा मोठा प्रभाव पडू शकतो.



मध्यपूर्व हा तेलपुरवठा करणारा जगातील सर्वांत महत्त्वाचा प्रदेश आहे. येथे अस्थिरता वाढल्यास जागतिक तेलदर वाढण्याची शक्यता असते. याचा थेट परिणाम जगातील अर्थव्यवस्थांवर होतो. याशिवाय जागतिक राजकारणातही नव्या समीकरणांची निर्मिती होऊ शकते. रशिया आणि चीन यासारखी राष्ट्रे या संघर्षाचा फायदा घेऊन आपले सामरिक हितसंबंध मजबूत करण्याचा प्रयत्न करू शकतात. युक्रेन दीर्घकाळापासून रशियाच्या तुलनेत कमी शस्त्रे आणि कमी सैनिक असूनही कडवी लढत देत आहे. तरीदेखील शस्त्रांचा साठा आणि पुरवठा युद्धात महत्त्वाची भूमिका बजावतात. इस्रायल-अमेरिका आणि इराण यांच्यातील या संघर्षाच्या सुरुवातीलाच हल्ल्यांची गती अत्यंत वेगवान राहिली आहे. दोन्ही बाजू ज्या वेगाने शस्त्रांचा वापर करत आहेत, त्या वेगाने त्यांचे उत्पादन होत नाही. 'इन्स्टिट्यूट फॉर नॅशनल सेक्युरिटी स्टडीज' (आयएनएसएस) च्या अंदाजानुसार, अमेरिका आणि इस्रायल यांनी आतापर्यंत दोन हजारपेक्षा अधिक हल्ले केले आहेत. त्यात विविध प्रकारची शस्त्रे वापरण्यात आली आहेत. 'आयएनएसएस'च्या मते, इराणने आतापर्यंत ५७१ क्षेपणास्त्रे आणि १,३९१ ड्रोन डागले आहेत. त्यापैकी अनेक हवेतच पाडण्यात आले; मात्र या पातळीवरील लढाई दीर्घकाळ चालू ठेवणे दोन्ही बाजूंसाठी कठीण ठरणार आहे. इराणचे शाहीद १३६ ड्रोन कमी उंचीवर उडतात आणि ते रडारवर ओळखणे कठीण असते. हे ड्रोन सुमारे २५०० किलोमीटर अंतरावर लक्ष्य भेदू शकतात.

पाश्चिमात्य देशांच्या अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे, की इराणकडून डागल्या जाणाऱ्या क्षेपणास्त्रांच्या संख्येत आधीच घट दिसू लागली आहे. युद्धाच्या पहिल्या दिवशी शेकडो क्षेपणास्त्रे डागली गेली होती. ती आता कमी झाली आहेत. युद्धापूर्वी असा अंदाज व्यक्त केला जात होता, की इराणकडे दोन हजारांपेक्षा अधिक कमी पल्ल्याच्या बॅलिस्टिक क्षेपणास्त्रांचा साठा आहे. कोणताही देश आपल्या शस्त्रसाठ्याची अचूक संख्या सार्वजनिक करत नाही. कारण त्यामुळे शत्रूला माहिती मिळू शकते. अमेरिकेचे वरिष्ठ लष्करी अधिकारी डॅन केन यांनी सांगितले की युद्धाच्या पहिल्या दिवसाच्या तुलनेत इराणकडून होणाऱ्या बॅलिस्टिक क्षेपणास्त्र प्रक्षेपणात ८६ टक्के घट झाली आहे. 'युनायटेड स्टेट्स सेंट्रल कमांड' (सेंटकॉम) च्या मते, केवळ मागील २४ तासांमध्येच त्यात २३ टक्क्यांची घट नोंदवली गेली आहे. युद्धापूर्वी असेही मानले जात होते, की इराणने हजारो 'वन-वे अ‍ॅटॅक' प्रकारचे ड्रोन तयार करून ठेवले आहेत. त्याने रशियालाही हे तंत्रज्ञान दिले असून ते युक्रेनमध्ये त्याचा वापर करत आहेत. अमेरिकेनेही या डिझाईनची नक्कल केली आहे; मात्र जनरल केन यांच्या मते, संघर्षाच्या पहिल्या दिवसानंतर इराणच्या ड्रोन हल्ल्यांमध्ये ७३ टक्क्यांची घट झाली आहे. यावरून असे दिसते, की इराणला मोठ्या वेगाने हल्ले सुरू ठेवण्यात अडचणी येत आहेत. तथापि असेही शक्य आहे की इराण आपला शस्त्रसाठा वाचवण्यासाठी जाणीवपूर्वक हल्ले कमी करत असावा; पण उत्पादन सुरू ठेवणे आता अधिक कठीण होऊ शकते, कारण अमेरिका आणि इस्रायलची लढाऊ विमाने आता इराणवर हवाई वर्चस्व प्रस्थापित करत आहेत.

इराणची बहुतेक हवाई संरक्षण व्यवस्था नष्ट झाली असून त्याची वायुसेना प्रभावी राहिलेली नाही. 'सेंटकॉम'च्या मते, युद्धाचा पुढील टप्पा आता इराणचे क्षेपणास्त्र आणि ड्रोन लाँचर, शस्त्रसाठे, शस्त्र उत्पादन कारखान्यांना लक्ष्य करण्यावर केंद्रित असेल. यामुळे अमेरिका आणि इस्रायलसाठी इराणची लढण्याची क्षमता कमकुवत करणे सोपे होऊ शकते; मात्र त्याचा संपूर्ण शस्त्रसाठा नष्ट करणे कठीण असेल. इराणचे क्षेत्रफळ फ्रान्सच्या तुलनेत जवळजवळ तीनपट मोठे आहे. त्यामुळे शस्त्रे जमिनीखाली लपवणे शक्य आहे. अलिकडील इतिहासाकडे पाहिले, तर केवळ हवाई हल्ल्यांद्वारे युद्ध पूर्णपणे जिंकणे शक्य होत नाही, असे दिसते. तीन वर्षांहून अधिक काळ चाललेल्या तीव्र बॉम्बहल्ल्यांनंतरही इस्रायलला गाझा पट्टीत 'हमास'ला पूर्णपणे नष्ट करता आलेले नाही. त्याचप्रमाणे येमेनमध्ये हुती बंडखोरही एका वर्षाच्या अमेरिकी बॉम्बहल्ल्यांनंतर टिकून राहिले. अमेरिकेकडे जगातील सर्वांत शक्तिशाली सैन्य आहे. तिच्याकडे इतर कोणत्याही देशापेक्षा पारंपरिक शस्त्रांचा मोठा साठा आहे; मात्र अमेरिकी सैन्य प्रामुख्याने महाग आणि अत्यंत अचूक मार्गदर्शित शस्त्रांवर अवलंबून असते. त्यांचे उत्पादन मर्यादित प्रमाणात होते. ट्रम्प यांनी संरक्षण कंपन्यांची बैठक बोलावली आहे. अमेरिकेच्या संसाधनांवरही काही प्रमाणात दबाव असल्याचे संकेत मिळतात. अमेरिका महागड्या आणि लांब पल्ल्याच्या 'टॉमहॉक क्रूज मिसाईल' ऐवजी तुलनेने स्वस्त शस्त्रांचा वापर करत आहे. अमेरिकी वायुसेना आता 'जेडीएएम' बॉम्बचा वापर करत आहे. अमेरिका दरवर्षी सुमारे ७०० क्षेपणास्त्रे तयार करते. इराण सतत बॅलिस्टिक क्षेपणास्त्रे डागत राहिला, तर हा मर्यादित साठा वेगाने कमी होऊ शकतो. अमेरिकेकडे सुमारे १६०० पॅट्रियट क्षेपणास्त्रांचा साठा असू शकतो; परंतु अलिकडील काळात तो कमी झाला असावा. ट्रम्प यांनी पॅट्रियट क्षेपणास्त्रांचा साठा कमी करण्याचा धोका स्वीकारल्यास अमेरिका इराणविरुद्धच्या युद्धात अधिक काळ टिकू शकते; मात्र त्यामुळे प्रशांत महासागर क्षेत्रातील संभाव्य संघर्षाचा धोका वाढू शकतो.

(लेखक राज्यशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

## वेध

नितीन शिरसाट

# वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्प जलसंजीवनी

भारतासारख्या कृषिप्रधान देशात अन्नधान्याची उत्पादकता सिंचन सुविधेवर अवलंबून आहे. तसेच महाराष्ट्र हे औद्योगिकदृष्ट्या अग्रेसर राज्य असून अस्तित्वातील व नव्याने प्रस्तावित उद्योगासाठी पाण्याची मागणीही मोठ्या प्रमाणात आहे. महाराष्ट्रात दरवर्षी लाखो लिटर पाणी वाहून समुद्रात जाते तर दुष्काळामुळे मराठवाडा, विदर्भ व उत्तर महाराष्ट्र होरपळून निघतो. पाणीटंचाईमुळे कृषी उत्पादनावर वाईट परिणाम होत असतो. नागरी क्षेत्रांमध्ये पिण्याच्या पाण्याचा तुटवडा जाणवतो. पाण्याच्या अल्प पुरवठ्यामुळे शेतकऱ्यांना व शेतीला मोठ्या प्रमाणावर संकटांचा सामना करावा लागतो. या परिस्थितीला सामोरे जाण्यासाठी नदीजोड प्रकल्प एक महत्त्वपूर्ण उपाय आहे. या प्रकल्पाचे प्रमुख उद्दिष्ट म्हणजे पाणीटंचाई असलेल्या भागांमध्ये पाणीपुरवठा सुधारणे, त्याद्वारे एक नदी दुसऱ्या नदीला जोडली जाऊन पाण्याचे वितरण अधिक सुलभ होईल. प्रकल्पाच्या माध्यमातून विविध भागांमध्ये सिंचनाची व्यवस्था सुधारणे, विशेषतः जिथे पाण्याची कमतरता आहे. यामुळे शेतकऱ्यांना अधिक पाणी मिळेल आणि शेती व्यवसायाला अधिक चालना मिळेल. नदीजोड प्रकल्पामुळे जलसंचय करण्याची क्षमता वाढवता येईल, ज्यामुळे पाऊस कमी पडला तरी पाणी उपलब्ध राहील. हे कृषी उत्पादनावर सकारात्मक प्रभाव पाडू शकते. दिवसेंदिवस बदलत्या हवामानामुळे पर्जन्याचे प्रमाण विषम स्वरूपाचे झाले असून, काही भागांत अतिवृष्टी, तर काही भागांत दुष्काळी परिस्थिती निर्माण होते. हे चित्र बदलण्यासाठी नदीजोड प्रकल्प महत्त्वाचा आहेत.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्र सरकार, तसेच राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या नेतृत्वाखाली महायुती सरकारने या नदीजोड प्रकल्पाला गती देण्यासाठी, विदर्भातील शेतकऱ्यांसाठी जलसंजीवनी ठरणाऱ्या वैनगंगा-नळगंगा प्रकल्पासाठी ९४ हजार ९६८ कोटी रुपयांची तरतूद अर्थसंकल्पात केली आहे. या प्रकल्पामुळे विदर्भातील शेतकऱ्यांची शेती सिंचनाखाली येणार आहे. राज्य सरकारने या नदीजोड प्रकल्पासाठी अर्थसंकल्पात केलेल्या आर्थिक तरतुदीचे स्वागत केंद्रीय आयुष राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी केले आहे. भारत सरकारच्या जलसंधारण नदी विकास व गंगा संरक्षण मंत्रालय यांच्या राष्ट्रीय जलविकास अभिकरणाला जलसंपदा विभागाने वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्पाला हिरवी झेंडी दिली. राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समिती कार्यालयाकडून आवश्यक त्या परवानगी देत सर्वेक्षण करण्यात आले आहे. जवळपास ३ लाख ७१ हजार २७७ हेक्टरवर हा भव्य नदी जोड प्रकल्प उभारण्यात येणार आहे. देशातील जवळपास १४६ जलाशये ही महत्त्वाची आहेत. देशातील शेतकऱ्यांना पाणीटंचाईच्या समस्येपासून दूर ठेवायचे असल्यास नदीजोड योजना अमलात आणण्यात येणार आहे. त्या अनुषंगाने देशात नदीजोड प्रकल्प सर्वेक्षण सुरू आहे. यामध्ये राज्यातील वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्पाचा समावेश करण्यात आलेला आहे. या प्रकल्पामुळे विदर्भातील भंडारा, नागपूर, वर्धा, अमरावती, यवतमाळ, अकोला आणि बुलडाणा जिल्ह्यातील शेतकऱ्यांना सिंचनाचा लाभ होणार असून हा प्रकल्प शेतकऱ्यांना नवसंजीवनी देणारा ठरणार आहे. विदर्भाला सुजलाम सुफलाम करणाऱ्या वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्पाला केंद्र सरकारने मान्यता प्रदान केली असून या प्रकल्पाचे सर्वेक्षणाचे काम झाले आहे. वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्पामुळे बहुतांश भाग पाण्याखाली येणार आहे. या प्रकल्पामुळे नद्यांना येणाऱ्या पुरांच्या पाण्याचे नियोजन होऊन त्याचा फायदा शेतकरी, उद्योगधंद्याला होणार आहे. केंद्र सरकारने या नदीजोड प्रकल्पाला मान्यता दिली आहे. ६० टक्के निधी केंद्र सरकारचा, तर ४० टक्के निधी हा राज्य सरकारचा राहणार आहे. वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्पाला मंत्रिमंडळाने अंर्थसकल्पात मान्यता दिली आहे. बुलढाणा जिल्ह्याच्या वाट्याला तब्बल १४० दलघमी म्हणजेच पाच टीएमसी पाणी येणार आहे. या पाण्यातून नळगंगा धरण भरून घेण्यासोबतच खामगाव तालुक्यातील कोलोरी व सेलोडी येथे प्रकल्प उभारून नदीजोड प्रकल्प महत्त्वपूर्ण ठरणारा आहे. प्रकल्पाचा गेल्या ४० वर्षांचा अभ्यास केल्यानंतर प्रकल्पाची जवळपास ३७.५८ दलघमी पाण्याची तूट निघत असल्याचे स्पष्ट झाले होते. परिणामी गोदावरी, प्राणहिता आणि वैनगंगा नदी परिसरातील अतिरिक्त ९६ टीएमसी पाण्याचे नियोजन करून ते नळगंगा प्रकल्पात आणण्याचे नियोजन झाले. १९८० च्या राज्यातील अवर्षणप्रवण तालुक्यांच्या यादीत मोताळा तालुक्याचा समावेश आहे. सिंचनाचा टक्का वाढण्यास मदत होणार आहे. वैनगंगा-नळगंगा प्रकल्प जलतज्ज्ञांनी शासनाकडे वेळोवेळी पाठपुरावा करून पत्रकार परिषदेच्या माध्यमातून नदीजोड प्रकल्पाच्या समस्या दूर करून प्रकल्प मंजुरीसाठी प्रयत्न केले आहेत. या निर्णयामुळे विदर्भातील अनेक जिल्ह्यांतील सिंचन क्षमतेमध्ये वाढ होऊन लाखो हेक्टर जमीन ओलिताखाली येऊन शेतकऱ्यांच्या उत्पन्नात भरघोस वाढ होऊन शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्यास मदत होणार आहे.

९८८१७१७८२८

## इतस्ततः

दत्तात्रेय आंबुलकर

# महिलांनी घडवलेली तेलंगणातील 'वनक्रांती'!

तेलंगणा सरकारच्या महिलांना वन विभाग आणि वन-क्षेत्रात अधिकारी पदावर नेमण्याच्या भूमिकेला आज परिणामकारक फळे आलेली दिसतात. याचा मुख्य परिणाम म्हणजे, तेलंगणामधील महिला वन अधिकारी आज अत्यंत मर्यादित संसाधने व साधनसामग्रीसह वन-क्षेत्राशी संबंधित व अत्यंत जिव्हाळ्याच्या अशा वन-अतिक्रमण, अवैध कब्जा, वनसंपत्तीतील महत्त्वाच्या अशा लाकडाची तस्करी, अवैध वाळू व्यवसाय, वाहतूक व वनसंवर्धनाच्या जोडीलाच वन-संरक्षण व वन्यजीवांच्या मानवीय वस्तीतील होणाऱ्या उपद्रवावर नियंत्रण ठेवण्याचे काम प्रकर्षाने करीत आहेत. मुख्य म्हणजे, हे काम या महिला परंपरागत नक्षलप्रभावित भागांमध्ये करीत असल्याने त्यांचे यश अधिक प्रकर्षाने जाणवते.

तेलंगण राज्य वन अकादमीच्या संचालिका एस. जे. आशा यांच्यानुसार, राज्यातील महिला वन कर्मचारी व अधिकाऱ्यांनी मिळविलेले यश हे त्यांचे निर्धारपूर्वक केलेले प्रयत्न आणि त्यांना देण्यात येणारे विशेष प्रशिक्षण यांचा संयुक्त सफल परिणाम म्हणावा लागेल. त्यांच्या मते, वन अकादमीतर्फे राज्यातील महिला प्रशिक्षणार्थींना वन-क्षेत्रातील अत्यंत प्रतिकूल स्थितीत राहणे, त्यादरम्यान आत्मसंरक्षणाशिवाय जंगल क्षेत्रातील रहिवाशांना संरक्षणासाठी सिद्ध करणे, सर्पदंशासारख्या वारंवार होणाऱ्या घटनांवर तातडीने उपाययोजना करणे, पोलिस खात्याशी समन्वय राखणे आदी अनेक बाबींचा समावेश असतो. विशेषत: महिला वनअधिकाऱ्यांच्या या प्रयत्न आणि पुढाकाराला वन-क्षेत्रातील वनवासी महिलांसह सर्वसाधारणपणे सर्वच नागरिकांचा सकारात्मक प्रतिसाद मिळत असला, तरी त्यासाठी या महिला वन अधिकाऱ्यांना मोठ्या अग्निदिव्यातून जावे लागते, हेदेखील तेवढेच खरे. पुढील प्रमुख घटना व अनुभवातून हीच बाब सिद्ध होते.

वन अधिकारी अप्सरामुनीसा यांच्या मते, त्यांच्या कार्यक्षेत्रातील भूपतपूर परिसरात वन्यप्राण्यांची शिकार करून त्यांची तस्करी करून, त्याद्वारे पैसा मिळविण्याचे प्रकार सर्रासपणे होत असत. यामध्ये शिकारी-तस्करांनी स्थानिक ग्रामीण-वनवासींना पैशाच्या लोभातून सहभागी करून घेतले होते. त्यांनी स्थानिक वनवासींना विश्वासात घेतले. त्यांना वन आणि वनसंपत्तीच्या संरक्षणासाठी वन-वनवासींच्या जोडीलाच वन्यजीवांचे महत्त्व समजून सांगितले. या प्रकरणी तस्कर-मंडळी वनवासींच्या भोळेभाबडेपणाचा फायदा घेऊन अल्प रक्कम देऊन सर्वांचेच शोषण कसे करतात, ते नीट समजावून सांगितले. ही मात्रा लागू पडली व भूपतपूर वन-क्षेत्र परिसरातील अवैध शिकारी व तस्करीला कायमचा आळा बसला. एवढेच नव्हे, तर अप्सरामुनीसा व त्यांच्या सहकारी वनकर्मचाऱ्यांनी केलेल्या प्रयत्नांच्या परिणामी वेगवेगळ्या ठिकाणी पकडून जप्त केलेल्या लाकूड व तत्सम वनसंपत्तीच्या सरकारी लिलावातून शासकीय तिजोरीत सुमारे ४.५ कोटी राशींची भर पडली. तेलंगणा शासनाच्या वनसेवा विभागात महिलांची संख्या लक्षणीय स्वरूपात आहे. वनसंरक्षण विभागाच्या संदर्भातच सांगायचे म्हणजे, या विभागातील कर्मचाऱ्यांच्या एकूण संख्या व टक्केवारीच्या तुलनेत महिलांची संख्या ४३ टक्के आहे. त्यातही प्रत्यक्ष वन-क्षेत्रात आघाडीवर व जोखीम-जबाबदारीसह काम करणाऱ्यांची संख्या ३१ टक्के आहे. वन-क्षेत्रातील महिला कर्मचाऱ्यांचे प्रमाण आणि टक्केवारी यांचे विविध संदर्भात सकारात्मक परिणाम पण दिसू लागले आहेत. तेलंगणाच्या सर्वाधिक वन व हरित क्षेत्रफळासाठी प्रसिद्ध असणाऱ्या मुलुगू या जिल्ह्यात सुमारे ६८ टक्के जमीन ही वन-क्षेत्र वा हरितपट्टा या क्षेत्रामध्ये मोडते. महिला वन अधिकारी व कर्मचारी यांचे प्रयत्न सक्रिय सहभागाद्वारे गेल्यावर्षी अतिवृष्टी व नैसर्गिक प्रकोपामुळे मोठे नुकसान झालेल्या ३०२ हेक्टर परिसरातील वन आणि वनसंपत्तीचे विक्रमी वेळात पुनर्रोपण करण्याचा प्रयोग नुकताच यशस्वी करण्यात आला. वन-क्षेत्र व वन विभागात अकल्पित व अकस्मातपणे मोठी आपत्ती निर्माण होते व गरजेनुरूप त्यावर तोडगा काढावा लागतो. मोठी जोखीम घेऊन जीवाची बाजी लावावी लागते. यामध्ये आपत्कालीन तातडीच्या उपायांपासून सार्वत्रिक संतुलन साधणे, पुढाकार घेऊन परिस्थिती हाताळणे व त्यावर तोडगा काढणे इथपासून प्रसंगी शारीरिक सिद्धतेसह केलेली कारवाई व त्याच्याच जोडीला वेळेत व आवश्यक अशी प्रशासनिक-वैधानिक वा न्यायालयीन कारवाई करावी लागते. ही सारी आवश्यक कौशल्ये तेलंगणामधील महिला वनअधिकाऱ्यांनी पुरेशा व पुरतेपणी आत्मसात केली आहेत, हे विशेष.

राज्यस्तरावरील पृष्ठभूमी नमूद करताना, तेलंगणा राज्याचे वन विभागप्रमुख एस. चंद्रप्पागिरी नमूद करतात की, राज्यात वनसंरक्षण व वन्य व्यवस्थापन हे क्षेत्र परंपरागतरीत्या पुरुषप्रधान व पुरुषांच्याच प्रभावळीतील होते. मात्र, गेल्या दशकात राज्य सरकारने नियोजनपूर्वक पद्धतीने या क्षेत्रात महिलांचा केवळ विचारच केला असे नव्हे, तर त्यांचा प्राधान्याने विचार केला. या संदर्भात विशेष धोरण अंगीकारण्याचा पुढाकार तेलंगणानेच घेतला. परिणामी, वन विभागात महिला कर्मचारी-अधिकाऱ्यांची नेमणूक वाढत्या प्रमाणात होऊ लागली. त्या अग्रक्रमाने व प्रसंगी आव्हानपर कामे यशस्वीपणे करू लागल्याचे आश्वासक चित्र निर्माण झाले, हे विशेष. या महिला वनअधिकाऱ्यांना मोठ्या जोखमीची कामे नेहमीच करावी लागतात. या संदर्भातील वनअधिकारी एम. रेणुका यांच्या अनुभवानुसार वन-क्षेत्रात अवैध तस्करीतून अवैध वनकटाई-तस्करी यांसारख्या अनधिकृत कृत्यांवर नेहमीच कारवाई करावी लागते व त्यासाठी त्यांना प्रसंगी सशस्त्र व शारीरिक विरोधाची पण तयारी करावी लागते. पसरा वन-क्षेत्राच्या अधिकारी माधवी जे. एस. यांच्यानुसार त्यांच्या वन-क्षेत्रात सुमारे २० हजार हेक्टर्सचे घनदाट जंगल असून, त्यांचा लाकडासह विविध उत्पादनांच्या तस्करीचा मुकाबला सर्वशक्तीसह व नेहमीच करावा लागतो. या पृष्ठभूमीवर तेलंगणाचे मुख्य संरक्षक एस. चंद्रप्पागिरी नमूद करतात की, राज्यात शासकीय विभागांतर्गत महिला अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या कार्यक्षमतेच्या संदर्भात महिलांनी आघाडी घेतली असून, ही बाब त्यांच्यासह राज्याच्या एकूणच प्रशासन व प्रशासकच नव्हे, तर महिलांसह जनसामान्यांसाठी प्रेरणादायी ठरली आहे.

(लेखक एचआर व्यवस्थापन सल्लागार आहेत.)

९८२२८४७८८६

## आपलं गावच गड्या बरं...

आपला भारत देश हा विविधतेने आणि समृद्धीने नटलेला असा संपन्न देश आहे. सर्व जाती-धर्माचे लोक गुण्यागोविंदाने कितीतरी वर्षांपासून सोबत राहत आलेली आहेत. आजही जगामध्ये भारताकडे एका आदर्शव्रत नजरेने पाहिले जाते. भारताला या स्थितीपर्यंत आणण्यासाठी आपल्या महापुरुषांनी मोठा त्याग केला आणि त्याचे फलित म्हणून आज भारत हा जगामध्ये आपल्या विविधतेमुळे ओळखला जातो. अशा या आदर्श भारताचा कणा हा आजही गावांमध्येच आहे. समृद्धीच्या वाटा गावातूनच वाहतात. समाधान म्हणजे काय असते हे जर शोधायचे असेल तर गावाकडेच जावे लागते. राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी गावाकडे चला असा मूलमंत्र दिला होता. जगाने कोरोनासारखी महामारी अनुभवली. संपूर्ण जग बंद पडलेले असताना, नोकरदार वर्गाला शहराने तर दूर लोटले; मात्र गावांनीच त्यांना आपल्या जवळ केले. आज जगामध्ये आखाती देश युद्धाच्या सावटाखाली आहेत. त्याचा परिणाम इतर देशावर होत असून मोठ्या प्रमाणात इंधन तुटवडा जाणवत आहे. काही दिवसापूर्वी डिझेल आणि पेट्रोलचा भारता जवळचा साठा संपला अशी अफवा पसरली आणि एकच खळबळ देशामध्ये उडाली. मात्र सरकारने या स्थितीला योग्यरीत्या हाताळणी आणि परिस्थिती आटोक्यात आणली.

पेट्रोल डिझेल नंतर आता एलपीजी घरगुती गॅसचा तुटवडा देशात मोठ्या प्रमाणात पडल्याची स्थिती आहे. एलपीजी मिळविण्यासाठी ग्राहकांच्या प्रचंड रांगा एजन्सी पुढे लागत आहेत. यामुळे अवैध साठवणूक करून त्याची जादा दराने विक्री करणाऱ्यांचे चांगभले होत आहे. अनेक ठिकाणी तर खेड्याप्रमाणे चुली व शेगड्या अडगळीत पडलेल्या ठिकाणाहून बाहेर आलेल्या आहेत. आणि त्यांनी गॅसची जागा घेतली. पुन्हा एकदा कोविडप्रमाणे आपले गावच बरे होते इकडे असे म्हणण्याची वेळ नागरिकांवर आलेली आहे. तंत्रज्ञानाने कितीही प्रगती केली तरी शेवटी गावाकडेच सर्व समस्यांची उपाय आहे हे पुन्हा एकदा दिसून आले.

**मोहन कळमकर**/उमरखेड/७३८५८६१४४६

## वाचक पत्रे

### सर्व विषयांना स्पर्श करावा

पुण्यातील महिला शिक्षण, उद्योग आणि सामाजिक कार्यात आघाडीवर आहेत. त्यांच्या कार्याची दखल घेणारे विशेष सदर असावे. महिला सुरक्षेचे प्रश्न, आरोग्य आणि कायदेशीर हक्क यावर मार्गदर्शनपर लेख प्रसिद्ध करावेत. सकारात्मक उदाहरणे समाजात आत्मविश्वास निर्माण करतात.

**प्रीती सोमण**/पुणे

### गुढीपाडवा: विजयाचा सण

हिंदू पंचांगानुसार चैत्र शुद्ध प्रतिपदेला 'गुढीपाडवा' साजरा केला जातो. हा दिवस केवळ नवीन वर्षाची सुरुवात नसून, तो निसर्गातील बदल आणि ऐतिहासिक विजयाचे प्रतीक मानला जातो. साडेतीन मुहूर्तांपैकी एक असल्यामुळे या दिवशी कोणत्याही नवीन कार्याची सुरुवात करणे अत्यंत शुभ मानले जाते. गुढीपाडव्याशी अनेक पौराणिक कथा जोडल्या गेल्या आहेत.१४ वर्षांचा वनवास संपवून आणि रावणाचा वध करून प्रभू श्रीराम जेव्हा अयोध्येत परतले, तेव्हा प्रजेने आनंदोत्सवाचे प्रतीक म्हणून 'गुढ्या' उभारल्या होत्या. याच दिवशी ब्रह्मदेवाने विश्वाची निर्मिती केली; याला ब्रह्मध्वज असेही म्हणतात. गुढीपाडव्याच्या दिवशी घराची स्वच्छता करून दारासमोर रांगोळी काढली जाते. या सणाचे मुख्य आकर्षण 'गुढी'. एका उंच काठीला (बांबूच्या) रेशमी वस्त्र, कडुलिंबाची डहाळी, गाठी (साखरेची माळ) आणि फुलांचा हार बांधला जातो. त्यावर तांब्याचा किंवा चांदीचा गडवा (कलश) उपडा ठेवून ती गुढी घराच्या दारात किंवा खिडकीत उंच ठिकाणी उभारली जाते. या दिवशी सकाळी कडुलिंबाची पाने, जिरे, हिंग आणि गूळ यांचे मिश्रण प्रसाद म्हणून खाल्ला जातो. हे आरोग्यासाठी अत्यंत गुणकारी असून रोगप्रतिकारक शक्ती वाढविते.

**वर्षा आवदे**/नागपूर

### हुरडा पार्टीचा तरुणाईला विसर

पूर्वीच्या काळी ग्रामीण भागात शेतात होणारी हुरडा पार्टी आता क्वचितच कुठेतरी एखाद्या ठिकाणी होत आहे. शहरी भागात याला व्यावसायिक रूप आले आहे. शेतांत हरभरा जोमदार आला की हुरडा पार्टी सुरू व्हायची. छानशी शेकोटी करून त्यात हरभरे भाजून खाणे म्हणजेच हुरडा पार्टी. ही हुरडा पार्टी अनेकांना आपापसातले मतभेद विसरायला लावते व दोन घटका माणसांमध्ये रमवायला राजी करते. मात्र आता काळ बदलला आहे. काळ बदलला तसे हुरडा पार्टीचे स्वरूप बदलले. हुरडा पार्टीचे अप्रूप जुन्याजाणत्या पिढीपासून आताच्या तरुणांसहित सर्वांनाच वाटते. महागड्या हॉटेल्समध्ये हुरडा पार्टी रंगू लागली आहे. पैसे खर्च करूनही शेतात होणाऱ्या हुरडा पार्टीची जी मजा असते ती येथे मिळत नाही. कालाय तस्मै नमः या उक्तीप्रमाणे ग्रामीण ढंगाची हुरडा पार्टी आता शहरी झाल्याने ग्रामीण भागातील वृद्ध आता या हुरडा पार्टीच्या आठवणीने खंतावत आहे.

**जयदीप सुधीर हिरवे**/९०९६२७६४८३

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८
RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# तारकेश्वर गडाचे महंत आदिनाथ शास्त्री यांनी स्वत:वरच केला वार

तभा. वृत्तसेवा

**बीड |** बीड,अहिल्यानगर जिल्ह्यासह पाथर्डी परिसरात मोठा भक्त परिवार असलेल्या तारकेश्वर गडाचे महंत आदिनाथ शास्त्री यांनी स्वत:वरच वार केल्याची धक्कादायक उघडकीस आली आहे. यात ते गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर अहिल्यानगरमधील खासगी रुग्णालयात उपचार सुरू असल्याची माहिती समोर येत आहे.

महाराजांनी तारकेश्वर गडावर स्वत:च्या खोलीत गुप्तांगावर शस्त्राने वार केले, खोलीतच महाराज रक्तबंबाळ अवस्थेत होते. ही बाब लक्षात येताच त्यांच्या भक्तांनी तातडीने त्यांना उपचारासाठी रुग्णालयात हलवलं. मात्र महाराजांची स्वत:च्या गुप्तांगावर वार का केले असा प्रश्न उपस्थित होत आहे. अखेर घटनेच्या २४ तासानंतर त्यांच्या शिष्याने या संदर्भात माहिती दिली आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यातील तारकेश्वर गडांवर लाखो भक्तगण जोडले गेलेले आहेत. आता याच गडाच्या महंतांनी स्वत:वार केल्याची गंभीर घटना समोर आल्यानं मोठा धक्का बसला आहे. सध्या महंत आदिनाथ शास्त्री महाराजांवर डॉक्टरांकडून उपचार सुरू आहेत. मात्र,याचवेळी महाराजांनी स्वत:वर वार का केले याबाबत काही माहिती समोर आली आहे. अलीकडे नेहमीच संत-महंतांना त्रास दिला जात आहे. बाबांनी असं कराया नको होतंय बाबांना त्रास देणारा जो कोणी नराधम असेल त्याचा शोध घ्यायला हवा. यापूर्वीही अनेक महाराजांना त्रास देण्याचा प्रयत्न झाला. धार्मिक आदरस्थान असलेल्या व्यक्तिमत्त्वांवर त्रास देणाऱ्यांची टोळी सक्रिय झाली असून समाजाने त्याचा बंदोबस्त करायला हवा. आदिनाथ महाराजांच्या प्रकरणात काही संशयित आहेत. त्यांचे सीडीआर काढा अशी मागणी त्यांनी पोलिसांकडे केली आहे. बाबा कधीच याबाबत बोलणार नाहीत, त्यामुळे या प्रकरणातील आरोपीला पकडणं अत्यंत गरजेचं आहे.

शस्त्रक्रियेनंतर महाराजांचा अनुयायांना संदेश

बीड जिल्ह्यातील श्रद्धास्थान असलेल्या तारकेश्वर गड या ठिकाणी ते महंत म्हणून काम पाहतात. बीडच्या आष्टी तालुक्यातील महिंदा गावात तारकेश्वर गड अध्यात्मिक क्षेत्र म्हणून प्रसिद्ध आहे. या घटनेनंतर काळजीत पडलेल्या भक्तांना स्वतः महाराजांनी संदेश देत दिलासा दिला आहे. माझी तब्येत आता चांगली आहे. कोणीही काळजी करु नका, मी लवकरच गडावर येणार आहे, असा संदेश आदिनाथ शास्त्री महाराजांनी आपल्या भक्तांना दिल्याने त्यांच्या अनुयायांमध्ये काहीसा दिलासा व्यक्त केला जात आहे.

आठ दिवस भेटणे टाळावे... डॉक्टरांनी नेमकं काय सांगितलं?

अहिल्यानगरच्या खासगी रुग्णालयामध्ये त्यांच्यावर एक शस्त्रक्रिया करण्यात आली असून त्यांची प्रकृती स्थिर आहे. अहिल्यानगरच्या खासगी रुग्णालयामध्ये दाखल करण्यात आलं होते.यावेळी त्यांच्यावर एक शस्त्रक्रिया करण्यात आली असून त्यांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती आहे. काळजी करण्याचे कारण नसून भक्तांनी महाराजांना आठ दिवस भेटणे टाळावं जेणेकरून त्यांना कोणत्याही प्रकारचे इन्फेक्शन होणार नाही असं आवाहन डॉक्टर तन्वर यांनी केलं आहे.

# जमिनीच्या तुकड्यासाठी सासरच्या मंडळीसह लेकाचा बापावर प्राणघातक हल्ला

तभा. वृत्तसेवा

**केज |** शेती आणि ट्रॅक्टर नावावर करण्यास नकार दिल्याच्या कारणावरून मुलाने जन्मदात्या वडीलावर सासरच्या मंडळींच्या मदतीने प्राण घातक हल्ला केल्याची घटना नाहोली येथे घडली. यामध्ये वडील गंभीररित्या जखमी झाले असून त्यांच्यावर अंबाजोगाईत उपचार सुरू आहेत

नाहोलीतील लक्ष्मण ठोंबरे हा आपले वडील सुभाष ठोंबरे यांच्याकडे जमीन व ट्रॅक्टर माझ्या नावावर करा म्हणून घरात वितंड वाद घालत होता. शेवटी १४ मार्च रोजी रात्री साडेदहाच्या सुमारास हा वाद विकोपाला गेला. गावातील चौकात लक्ष्मण ठोंबरे व त्याची पत्नी सारिका यांनी सुभाष ठोंबरे यांना गाठले. "जमीन आणि ट्रॅक्टर माझ्या



नावावर का करत नाहीस?" असा जाब विचारत त्यांना काठीने बेदम मारहाण करण्यास सुरुवात केली. ही मारहाण होत असताना सून सारिका हिचे माहेर त्याच गावात असल्याने तिचे आई-वडील, भाऊ आणि चुलते यांनीही घटनास्थळी धाव घेतली.आपल्या जावयाला साथ देत या सर्वांनी मिळून सुभाष ठोंबरे यांना अमानुषपणे मारहाण केली. भांडणाचा आवाज ऐकून सुभाष ठोंबरे यांची मुलगी मीना बिक्कड आणि जावई दादा बिक्कड हे बचावासाठी धावून आले. मात्र, संतप्त झालेल्या हल्लेखोरांनी त्यांनाही सोडले नाही. त्यांनाही मारहाण करत "मध्ये आलात तर जीवे मारू" अशी धमकी दिली.

या मारहाणीत सुभाष ठोंबरे हे रक्तबंबाळ झाले असून त्यांच्या तोंडावर, हातावर आणि पाठीवर गंभीर जखमा झाल्या आहेत. मारहाणीमुळे त्यांचे शरीर काळे निळे पडले आहे. त्यांना तातडीने केज येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले, मात्र प्रकृती चिंताजनक असल्याने पुढील उपचारासाठी त्यांना अंबाजोगाईतील स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण रुग्णालयात हलवण्यात आले आहे.या प्रकरणी मुलगा लक्ष्मण ठोंबरे, सून सारिका ठोंबरे, यांच्यासह सासरच्या १० जणांविरोधात गुन्हा दाखल केला आहे. घटनेचा पुढील तपास केला जात आहे.

## सौ. सीमाताई भगवानराव शिंदे यांचे निधन



तभा. वृत्तसेवा

**अंबाजोगाई |** येथील यशवंतराव चव्हाण मराठवाडा महाविद्यालयातील सेवानिवृत्त प्राध्यापक भगवानराव शिंदे यांच्या पत्नी सौ. सीमाताई शिंदे यांचे आज मंगळवारी सकाळी हृदयविकाराच्या तीव्र धक्क्याने निधन झाले.

हृदयविकाराच्या त्रासामुळे त्यांना सोमवारी सायंकाळी अंबाजोगाई येथील खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. तिथे उपचार सुरू असताना आज सकाळी त्यांची प्राणज्योत मालवली. सौ. सीमाताई शिंदे या माजी नगराध्यक्ष कै. बालासाहेब लोमटे यांच्या कन्या तथा विद्यमान नगरसेवक बबनराव लोमटे यांच्या भगिनी होत. त्यांच्या पश्चात पती, पाच मुली, नातवंडे असा परिवार आहे.

प्रा. भगवान शिंदे यांच्य धर्मपत्नी सौ. सीमा भगवान शिंदे यांचे हृदय विकाराच्या झटक्याने आज सकाळी ८ वाजता अकस्मात दु:खद निधन झाले. मृत्यू समयी त्यांचे ५४ वय होते. त्याच्या पश्चात ५ मुली, जावई व नातवंडे असा मोठा परिवार आहे.त्यांच्यावर अंत्यसंस्कार आज दिनांक १७ मार्च २०२६ रोजी दुपारी ४.३० अंबाजोगाई येथील बोरुळ तलाव येथे करण्यात येतील.

## येडेश्वरी साखर कारखाना युनिट नं. 1 च्या गळीत हंगामाचा सांगता समारंभ

तभा. वृत्तसेवा

**केज |** येडेश्वरी साखर कारखाना युनिट नं. १, आनंदगाव (ता. केज) येथे सन २०२५–२६ च्या गळीत हंगामाचा सांगता समारंभ उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. या निमित्ताने आयोजित स्नेहभोजन कार्यक्रमात येडेश्वरी साखर कारखान्याचे चेअरमन तथा खासदार बजरंग बप्पा सोनवणे यांनी कर्मचारी व सभासदांसाठी महत्त्वपूर्ण आणि समाजाभिमुख घोषणा केली.

कारखान्याशी संबंधित कर्मचारी तसेच सभासदांच्या घरी मुलगी जन्माला आल्यास त्या कुटुंबाच्या खात्यावर १० हजार रुपये जमा करण्यात येणार असल्याचे त्यांनी जाहीर केले. मुलींचा जन्म साजरा व्हावा, तसेच समाजात मुलींबाबत सकारात्मक विचार वाढावा आणि कन्या जन्माबाबत



जागरूकता निर्माण व्हावी, या उद्देशाने हा निर्णय घेतल्याचे खा. सोनवणे यांनी स्पष्ट केले.

समाजात मुलगा-मुलगी भेद न करता दोघांनाही समान मान मिळायला हवा. मुली आज विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करत आहेत. त्यामुळे मुलींच्या जन्माचे स्वागत व्हावे आणि कुटुंबात आनंदाचे वातावरण निर्माण व्हावे, यासाठी हा उपक्रम सुरू करण्यात येत असल्याचेही त्यांनी नमूद केले. या निर्णयामुळे कारखान्याच्या सभासद व कर्मचारी वर्गात मुलींच्या जन्माला प्रोत्साहन मिळेल आणि समाजात सकारात्मक संदेश जाईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. दरम्यान, आनंदगाव येथील येडेश्वरी साखर कारखाना युनिट नं. १ येथे सन २०२५–२६ च्या गळीत हंगामाचा सांगता समारंभ व स्नेहभोजन कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रमात कारखान्याच्या कार्याचा आढावा घेण्यात आला. यावेळी कारखान्याच्या प्रगतीसाठी महत्त्वपूर्ण योगदान देणाऱ्या ऊस उत्पादक शेतकरी, अधिकारी, कर्मचारी तसेच सर्व संबंधितांचे खा. सोनवणे यांनी मनापासून आभार मानले.

### सहकाऱ्यांचा मानसिक त्रास, पगाराची जाणूनबुजून अडवणूक'

## माध्यमिक शिक्षकाने आयुष्य संपवलं, घटनास्थळी चिठ्ठी सापडली

तभा. वृत्तसेवा

**बीड |** गेवराई तालुक्यातील अर्धा मसला येथे एका ५० वर्षीय शिक्षकाने राहत्या घरी गळफास घेऊन आपली जीवनयात्रा संपवल्याची मोठी घटना उघडकीस आली आहे. कैलास उघडे असं मृत शिक्षकाचं नाव असून, या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे. विशेष म्हणजे, आत्महत्या करण्यापूर्वी उघडे सरांनी एक सविस्तर नोट लिहून ठेवली असून, त्यामध्ये आपल्या मृत्यूला जबाबदार असणाऱ्या काही बाबींचा उल्लेख केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, कैलास उघडे हे शिरसदेवी येथील माध्यमिक विद्यालयात शिक्षक म्हणून कार्यरत होते. सकाळी बराच वेळ झाला तरी त्यांच्या घरातून कोणतीही हालचाल होत नसल्याने शेजारी राहणाऱ्या नातेवाईकांना संशय आला. त्यांनी तातडीने उघडे यांच्या घराकडे धाव घेतली. घराचा दरवाजा उघडून आत पाहिले असता, समोरच कैलास उघडे यांनी गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आले. हा हृदयद्रावक प्रसंग पाहून नातेवाईकांनी एकच टाहो फोडला.

पोलिसांना घटनास्थळी एक नोट सापडली आहे, ज्यामध्ये उघडे सरांनी गेल्या ५-६ दिवसांत त्यांच्यासोबत घडलेल्या घडामोडींचा



पाढाच वाचला आहे. यामध्ये त्यांनी शाळेतील काही सहकारी शिक्षकांकडून होणाऱ्या त्रासाचा स्पष्ट उल्लेख केला आहे. नोटमधील माहितीनुसार शाळेतील काही शिक्षकांनी त्यांना मानसिक त्रास दिला होता. पगाराशी संबंधित काही तांत्रिक अडचणी किंवा जाणीवपूर्वक अडवणूक केली जात असल्याचे संकेत दिले आहेत. आजारी असल्यामुळे त्यांनी मेडिकल रजेचा अर्ज केला होता, त्यासंदर्भातही काही अडचणी निर्माण करण्यात आल्या होत्या. चिठ्ठीत काही विशिष्ट शिक्षकांची नावे सुद्धा नमूद करण्यात आली आहेत. या घटनेनंतर कैलास उघडे यांच्या कुटुंबियांनी आक्रमक पवित्रा घेतला आहे. 'आमच्या माणसाला आत्महत्या करण्यास प्रवृत्त करण्यात आलं आहे', असा थेट आरोप कुटुंबियांनी केला आहे. 'जोपर्यंत सुसाईड नोटमध्ये नाव असलेल्या दोषी शिक्षकांवर गुन्हे दाखल करून त्यांना अटक केली जात नाही, तोपर्यंत आम्ही शांत बसणार नाही', अशी भूमिका नातेवाईकांनी घेतली आहे.

## बीड जिल्ह्याच्या जलसाठ्यात दोन महिन्यांत ४० टक्क्यांची मोठी घट

तभा. वृत्तसेवा

**बीड |** जिल्ह्यातील जलप्रकल्पांना आता उन्हाळ्याच्या तीव्र झळा सोसाव्या लागत असून गेल्या दोन महिन्यांत जिल्ह्यातील एकूण उपयुक्त पाणीसाठ्यात ४० टक्क्यांनी मोठी घट झाली आहे.

सध्या जिल्ह्यात केवळ ६० टक्के पाणीसाठा शिल्लक असून वाढत्या मागणीसह बाष्पीभवनामुळे ही पातळी अधिकच खाली जाण्याची भीती व्यक्त होत आहे.

जिल्हयातील एकूण १४३ प्रकल्पांपैकी एकही प्रकल्प सध्या पूर्ण क्षमतेने भरलेला नाही. सुदैवाने, मांजरा धरणात ७२ टक्के तर बिंदुसरा धरणात ५१ टक्के साठा उपलब्ध असल्याने बीड शहराला काहीसा दिलासा मिळाला आहे. मात्र, उन्हाळ्यातील संभाव्य पाणीटंचाईची तीव्रता कमी करण्यासाठी नागरिकांनी पाण्याचा वापर अत्यंत जबाबदारीने करावा आणि नळांना तोट्या बसवून पाण्याची नासाडी टाळावी, असे आवाहन प्रशासकीय अधिकारी प्रेमलता पारवे यांनी केले आहे.

## स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई; कार मधून 7 लाखाचा गुटखा जप्त

तभा. वृत्तसेवा

**बीड |** शहरातील फुलाई नगर परिसरात अवैधरित्या गुटखा विक्रीसाठी आणला जात असल्याची माहिती मिळाल्यानंतर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने कारवाई करत एका स्वीफ्ट कारमधून विविध कंपनींचा गुटखा जप्त केला. या कारवाईत एकूण ६ लाख ६८ हजार १८४ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

जिल्ह्यातील अवैध धंद्यांवर आळा घालण्याच्या दृष्टीने पोलीस अधीक्षकांच्या आदेशा नुसार स्थानिक गुन्हे शाखा अवैध



धंद्यावर कारवाई करत आहे. शहरातील फुलाईनगर भागात गुटखा येत असल्याची माहिती स्थानिक गुन्हे शाखेला मिळाली त्यानंतर फुलाईनगर येथे एक स्वीफ्ट कार क्र. एम एच -४३आर-५७२५ मधून विविध कंपन्यांचा प्रतिबंधित गुटखा विक्रीसाठी आणला जात असतांना कारवाई करण्यात आली. आज दि. १६ मार्च २०२६ रोजी सकाळी सुमारे ८.३० वाजता स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने सापळा रचून कारची तपासणी केली. तपासणी दरम्यान कारमध्ये विविध कंपनींच्या गुटख्याचा साठा आढळून आला. यामध्ये एकूण ६ लाख ६८ हजार १८४ रुपयांचा गुटखा जप्त करण्यात आला. पोलिसांनी या प्रकरणी भाऊसाहेब राम पडुळे वय ३४ वर्ष, रा. औरंगपूर ता. बीड, ह.मु. स्वर्णनगरी, फुलाईनगर याला ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान हा गुटखा त्याने रेवन्नाथ चादर रा. भाटसांगवी, ता. बीड याच्याकडून घेवून आल्याचे समोर आले. या प्रकरणी बीड शहर पोलीस ठाण्यात दोन्हीही आरोपी विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## विविध विकास कामांचे 19 कोटी रुपयांचे टेंडर रद्द करण्याच्या मागणीसाठी पत्रकार संघाचे अमरण उपोषण सुरूच

### विविध पक्ष , संघटनांचा व नगरसेवकांचा जाहीर पाठिंबा

तभा. वृत्तसेवा

**परळी |** परळी वैजनाथ शहरात यापूर्वी नगरोत्थान सुवर्ण जयंती शहरी विकास योजना अंतर्गत ११० कोटी रुपयांची अपूर्ण व निकृष्ट दर्जाची कामे करणा- या लातूर येथील श्रीनाथ इंजिनियर यांना परत एकदा परळी नगर परिषदेने डी.पी.डी.सी.२०२५०-२०२६ अंतर्गत १९ कोटी रुपयांची विविध विकास कामांचे दिलेले टेंडर त्वरित रदद करावे व संबंधित ब्लॅकलिस्ट करावे या मागणीसाठी परळी शहर व तालुका पत्रकार संघाच्या वतीने दिनांक १६ मार्च रोजी परळी नगर परिषद कार्यालयासमोर अमरण उपोषण करण्यात येत आहे.या उपोषणाला परळी शहरातील विविध पक्ष व संघटना, नगरसेवक, तसेच सामाजिक कार्यकर्ते यांनी जाहीर पाठिंबा दिला. उपोषणाला पत्रकार संघाचे तालुका



अध्यक्ष रानबा गायकवा, शहराध्यक्ष शेख मुकरम, उपाध्यक्ष बाबा शेख आदी पत्रकार उपोषणाला बसले आहेत.

या उपोषणाला शिवसेना नेते तथा नगरसेवक व्यंकटेश शिंदे, शहरप्रमुख वैजनाथ माने, कामगार नेते गौतम आगळे,नगरसेवक अश्विन मोगरकर, नगरसेवक नितीन बागवाले, वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा महासचिव मिलिंद घाडगे, प्रसेनजित रोडे, राजेश सरवदे, कांग्रेस अल्पसंख्याक शहर अध्यक्ष रसूल खान, सामाजिक कार्यकर्ते राहुल घोबाळे,प्रा.विलास रोडे, संपादक ज्ञानोबा सुरवसे इंजिनियर भगवान साकसमुद्रे, संपादक भगिरथ बददर, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई शहराध्यक्ष प्रल्हाद कंडुकटले, माजी नगरसेवक केशव गायकवाड, सामाजिक कार्यकर्ते रमेश फड, कामगार संघटनेचे शेख जमीर याबरोबरच संपादक बालासाहेब कडबाने, गणेश आदोडे संपादक रामप्रसाद गरड, संपादक शिवशंकर झाडे, संपादक मोहन व्हावळे, पत्रकार धनंजय आढाव, संपादक कैलास डुमणे,प्रा प्रविण फुटके,संजीव रॉय, पत्रकार महादेव शिंदे, पत्रकार माणिक कोकाटे, पत्रकार सुमीत गिरी आदी उपस्थित होते.

# वीज पुरवठा बंद तरीही वाढतेय बील; अधिकृत बिल मिळेना

## वीज ग्राहकाचा मानसिक छळ ; महावितरणच्या कारभारावर ग्राहकाचा संताप

तभा. वृत्तसेवा

**अंबाजोगाई |** महावितरणच्या भोंगळ कारभारामुळे शहरातील गुरूवार पेठ भागातील एका ग्राहकाला गेल्या अनेक महिन्यांपासून वीज बिल न मिळता, थेट थकबाकी दाखवत असल्याने प्रचंड मानसिक त्रास सहन करावा लागत आहे. अनेकदा लेखी स्वरूपात विनंती अर्ज आणि अधिकृत बिल देण्याची मागणी करूनही बिल न दिल्याने या ग्राहकाने संताप व्यक्त केला असून, यामुळे महावितरण कंपनीच्या ढिसाळ कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

यासंदर्भात आमच्या प्रतिनिधीशी बोलताना समाजवादी पार्टीचे शहराध्यक्ष राजेश परदेशी यांनी सांगितले की, मीटर रिडींग वेळेवर न घेणे किंवा रिडींग घेऊनही बिल न पाठवल्यामुळे अनेकांना बिल भरता येत नाही. यामुळे अचानक एकाच वेळी मोठ्या रकमेचे सरासरी बिल येते, अशाने सामान्य माणसाचे किती हाल करतेत तसेच गोरगरिबांना हराशमेंट करून लाईट बिल वसुलीचे कारण दाखवून त्या लोकांकडून पैसे वसूल करतात. ज्यामध्ये दंडाची रक्कमही असते. या प्रकारामुळे ग्राहकांना विनाकारण आर्थिक भुर्दंड आणि मानसिक त्रासाला सामोरे जावे लागत आहे. असाच काहीसा अनुभव मला ही आला आहे. मला वीज वापराचे अधिकृत बिल देण्यात यावे अशी मागणी मी ८ ऑगस्ट २०२४ पासून आजतागायत पर्यंत करीत आहे. याबाबत मी दिनांक ८ ऑगस्ट २०२४, २१ नोव्हेंबर २०२४, १७ एप्रिल २०२५ आणि २३ जुन २०२५ या विविध तारखांना अर्ज देवून महावितरणच्या अभियंता यांना विनंती केली आहे. तरी परंतु, महावितरणने या प्रकरणी कोणतीही दखल घेतलेली नाही. सदर अर्जांवर काही कार्यवाही सुध्दा केली नाही. उलट दुर्लक्ष केले आहे असे परदेशी यांनी सांगितले. पुढे बोलताना ते म्हणाले की, महावितरणच्या दप्तर दिरंगाईचा फटका आमच्या सारख्या नियमित वीज बिल भरणाऱ्या ग्राहकांना बसत आहे. वारंवार मागणी करूनही अधिकृत वीज बिल मिळत नसल्याने, दिवसेंदिवस न वापरलेल्या वीज बिलाची थकबाकी वाढत आहे. मी या संदर्भात सातत्याने मागणी करूनही महावितरण अधिकृत बिल देत नाही, त्यामुळे वेळोवेळी मी बिलाची प्रिंट काढून पेमेंट ऑनलाईन पद्धतीने अदा केलेले आहे. माझ्याकडे कोणतीही थकबाकी नसताना व कोणतीही पूर्वसूचना न देता यापूर्वीच अचानक वीज पुरवठा खंडित केला आहे. वीज कनेक्शन बंद असताना ही वीज वापराचे बिल मिळत आहे हा प्रकार अजबच म्हणावा लागेल अशी तक्रार व महावितरणच्या कारभाराविषयी परदेशी यांनी तीव्र नापसंती व्यक्त केली आहे. अवास्तव व भरमसाठ बिल पाहून परदेशी यांना काही दिवसांपूर्वी मोठा मानसिक धक्का बसला आहे. न वापरलेल्या वीजेच्या वाढीव बिलामुळे ते तणावाखाली आहेत. यामुळे आपल्या जीवाचे काही बरेवाईट झाल्यास याला जबाबदार कोण, असा संतप्त सवाल ही परदेशी यांनी लेखी स्वरूपातील अर्जाद्वारे महावितरणला केला आहे. आम्ही नियमीत वीज बिल भरणा करीत असून व कधीही वीज बिल थकीत ठेवलेले नसताना आम्हांला इतक्या मोठ्या रकमेचे बिल देऊन, मानसिक त्रास तर दिला आहे. त्यामुळे आता आपण महावितरणच्या या भोंगळ, मनमानी कारभाराविरोधात नाराजीने सक्षम प्राधिकरणाकडे रितसर तक्रार दाखल करून न्यायालयातही दाद मागणार असल्याचे समाजवादी पार्टीचे शहराध्यक्ष राजेश परदेशी यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले.

## जातीच्या भिंती तोडा, आपली माती, माणस आणि नाती जपा; 'गुरुकृपा' मंचावर संदीप पाठक भावनिक

तभा. वृत्तसेवा

**माजलगाव (प्रतिनिधी) |** आम्ही लहान होतो, त्यावेळी जाती धर्माच्या भिंती फार खुज्या होत्या, मागच्या काळात अनेकांनी त्यावर अनेक विटा रचून त्या माणसापेक्षाही मोठ्या केल्या आहेत. आपल्याला त्या भिंती तोडल्या पाहिजेत. जाती धर्माच्या भिंती तोडून आपली माती, माणस आणि नाती जपा असे भावनिक आवाहन अभिनेते संदीप पाठक यांनी केले.

'गुरुकृपा ' शिक्षण समूहाच्या वार्षिक स्नेहसंमेलनाच्या समारोप प्रसंगी ते बोलत होते. प्रा. स्नेहल पाठक, संजय मालानी, डॉ.



विनोद काकडे, व्यंकटेश वैष्णव, पांडुरंग उगले, डॉ रंगनाथ गोळेकर, डॉ. भांगरे,गुरुकृपा चे डॉ यशवंत राजेभोसले यांची यावेळी उपस्थिती होती.

यावेळी संदीप पाठक यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना आपल्या जुन्या आठवणी जागवल्या. कितीही मोठे झालात तरी आपल्या मातीला आणि आपल्या आईवडील, मित्रांना विसरू नका, हेच लोक आपले पाय जमिनीवर राहायला मदत करत असतात असे सांगितले. आईवडिलांना कर्जबाजारी करून लग्नावर कोट्यवधी खर्च करण्याची आजची पद्धत बदलण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी सांगितले तसेच जाती धर्माच्या पलीकडे जाऊन माणूसपण जपा, हा संस्कार इथल्या मातीचा आहे, हातात दगड घेऊन कोणाचे तरी रक्त काढण्याऐवजी रक्तदान करून कोणाचा तरी जीव वाचवा. जातीवाद, धर्मवाद हा आपला मूळ स्वभाव नाही तर माणुसकी हा आपला मूळ स्वभाव आहे तो जपा असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी डॉ यशवंत राजेभोसले यांनी संदीप पाठक यांच्या जुन्या आठवणी जागवत गुरुकृपा समूहाचा प्रवास मांडला तर संजय मालानी यांनी विद्यार्थ्यांनी आपल्या मैत्रीचा परीघ वाढवावा त्यासोबतच प्रत्येकाने कोठे थांबायचे याचे भान ठेवावे असे सांगितले. डॉ विनोद काकडे यांनी गुरुकृपा मधून परिपूर्ण माणूस म्हणून विद्यार्थी निर्माण व्हावेत तसेच या परिवाराचा समाजाच्या विकासासाठी अधिकाधिक विस्तार व्हावा अशी अपेक्षा व्यक्त केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. प्रज्वल म्हस्के यांनी केले, तर सूत्रसंचालन ज्ञानेश्वर सोळंके यांनी केले. यावेळी प्रकाश राजेभोसले, नंदिनी राजेभोसले, डॉ वैशाली काकडे, डॉ प्रियंका राजेभोसले, प्राचार्य अमित बिंदू, प्राचार्य मकेश बाबू आदींची उपस्थिती होती.

'वऱ्हाड ' ने उडविले हास्याचे कारंजे

यावेळी संदीप पाठक यांनी वऱ्हाड निघालय लंडनला या एकपात्री प्रयोगातील काही प्रसंग सादर केले यावेळी सारा परिसर टाळ्या, शिट्ट्या आणि हास्याच्या कारंजांनी भरून गेला.

## कवडगावात सशस्त्र दरोडेखोरांचा धुमाकूळ

तभा. वृत्तसेवा

**वडवणी |** तालुक्यातील जुने कवडगाव येथे मध्यरात्रीच्या सुमारास पाच सशस्त्र दरोडेखोरांनी दोन घरांमध्ये घुसून दरोडा टाकल्याची धक्कादायक घटना घडली.

दरोडेखोरांनी महिलांच्या गळ्याला चाकू लावून त्यांच्या अंगावरील सुमारे साडेचार तोळे सोने व तीन हजार रुपयांची रोकड असा सुमारे साडेचार लाखांचा ऐवज लंपास केला. दरम्यान प्रतिकार करणाऱ्या २२ वर्षीय तरुणावर लोखंडी रॉडने हल्ला करून त्याला जखमी करण्यात आले.

जुने कवडगाव येथील



शेख सिद्दीक शेख अनीस हे कुटुंबासह घरात झोपलेले असताना मध्यरात्री सुमारे अडीच वाजण्याच्या सुमारास पाच सशत्र दरोडेखोरांनी घराच्या पाठीमागील गेटमधून प्रवेश केला. त्यांच्या हातात चाकू, लोखंडी रॉड व अन्य धारदार शखे होती. घरात शिरताच त्यांनी सिद्दीक यांच्या आईच्या गळ्याला चाकू लावून धमकावत त्यांच्या अंगावरील दागिने व काही नगदी रक्कम हिसकावून घेतली.

बीड विभागीय कार्यालय : आदर्शनगर गणपती मंदिरासमोर पांगरी रोड, बीड मो.९४०३२६४९३०, E-Mail - jagannathdeshmukh2020@gmail.com

CMYK

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

### इंधन सुरक्षा आणि पर्यावरण रक्षण ही लोकचळवळ व्हावी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १७ मार्च :** राजयोग ब्रह्माकुमारीसद्वारा भवन येथे सक्षम-२०२६ जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आले. यावेळी जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर घुगे प्रमखु पाहूण्या म्हणून उपस्थित होत्या. इंधनाची बचत ही केवळ गरज नसून ती एक देशसेवा आहे. ऊर्जा सुरक्षा आणि पर्यावरण रक्षण ही आता एक लोकचळवळ झाली पाहिजे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर यांनी केले. ऊर्जा बचत करणे हे केवळ सरकारचे काम नाही तर प्रत्येक नागरिकाचे वैयक्तिक कर्तव्य आहे. केंद्रीय पेट्रोलियम मंत्रालयाद्वारे प्रेरित 'सक्षम' हे जनजागृती मोहिमांचे मुख्य घोषवाक्य आहे, जे हा संदेश देते की चालणे, सायकल वापरणे आणि ट्रॅफिक सिग्नलवर इंजिन बंद करणे यासारखे छोटे वैयक्तिक प्रयत्न पर्यावरण वाचवण्यात आणि इंधनाचा वापर कमी करण्यात मोठी भूमिका बजावतात. ऊर्जा संवर्धन जनजागृती ऊर्जा दूत अभियानाचे उद्घाटन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर यांच्याद्वारे करण्यात आले.






# लातूर महसूल क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धेचे जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर घुगे यांच्या हस्ते उद्घाटन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १७ मार्च :** महसूल विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांमध्ये सांघिक भावना वृद्धिंगत व्हावी, या उद्देशाने आयोजित 'लातूर जिल्हा महसूल क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धा २०२५-२६' चे उद्घाटन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या हस्ते झाले. जिल्हा क्रीडा संकुलात आयोजित या सोहळ्यात ध्वजारोहण व दीपप्रज्वलन करून स्पर्धेला सुरुवात झाली.





याप्रसंगी जिल्हा पोलीस अधीक्षक अमोल तांबे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहूल कुमार मीना, अपर जिल्हाधिकारी शिल्पा करमरकर, निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, जिल्हा नियोजन अधिकारी सोमनाथ रेड्डी आणि जिल्हा क्रीडा अधिकारी महादेव कसगावडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला विविध उपविभागातील खेळाडूंनी शिस्तबद्ध पथसंचलन (परेड) केले. संबंधित उपविभागीय अधिकाऱ्यांनी आपापल्या पथकाचे नेतृत्व केले. यावेळी सर्व स्पर्धकांना क्रीडा नियमांचे पालन करण्याची शपथ देण्यात आली. उद्घाटनानंतर झालेल्या झुंबा डान्समध्ये जिल्हाधिकारी आणि मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी स्वतः सहभागी होऊन कर्मचाऱ्यांचा उत्साह द्विगुणित केला.

कोतवाल ते अपर जिल्हाधिकारी, उपजिल्हाधिकारी अशा सर्व संवर्गातील कर्मचारी-अधिकारी यांचा या स्पर्धेतील उत्स्फूर्त सहभाग कौतुकास्पद आहे. लातूर जिल्हा महसूल क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धेत सहभागी सर्व खेळाडूंनी सांघिक भावनेने आणि चिकाटीने आपल्या खेळाचे प्रदर्शन करावे. लातूर जिल्ह्याला राज्यस्तरीय स्पर्धेत जास्तीत जास्त प्रतिनिधित्व मिळवावे, यासाठी सर्वांनी मनपासून प्रयत्न करावेत, असे आवाहन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी केले. अतिशय कमी कालावधीत स्पर्धेचे उत्कृष्ट नियोजन करण्यात आल्याबद्दल जिल्हाधिकाऱ्यांनी आयोजकांचे अभिनंदन केले.

या स्पर्धा म्हणजे केवळ क्रिडा व सांस्कृतिक कार्यक्रम नसून सतत कामाच्या तणावात राहणाऱ्या कर्मचाऱ्यांना नवी ऊर्जा देणारा उपक्रम आहे. स्पर्धेत सहभागी खेळाडूंनी पूर्ण सचोटीने सहभाग नोंदवून चांगली कामगिरी करावी. दैनंदिन जबाबदाऱ्या पार पाडताना आपले आरोग्य, शारीरिक स्वास्थाकडे लक्ष द्यावे. एखाद्या मैदानी खेळाची आवड जोपासून त्यासाठी नियमितपणे वेळ द्यावा, असे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल कुमार मीना यांनी सांगितले.

महसूल विभागाच्या क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धेत सहभागी झालेल्या सर्व खेळाडूंची परेड अतिशय उत्स्फूर्त झाली. सर्वांनी दोन दिवसीय स्पर्धा काळात कामाचा ताण विसरून खेळांमध्ये सहभागी होवून चांगली कामगिरी करावी. या स्पर्धेतील सहभागाचा आनंद अनुभवा, मनापासून खेळा. खेळ असो की दैनंदिन जबाबदाऱ्या, जिंकल्यावर जल्लोष करणे, पराभवानंतर खिलाडूवृत्तीने पराभव स्वीकारणे आवश्यक असते. महसूल, पोलीस विभागाच्या जिल्हा, विभागीय व राज्यस्तरीय स्पर्धा होतात. मात्र लातूर जिल्ह्यातील महसूल, पोलीस आणि इतर विभागांच्या एकत्रित स्पर्धांचे आयोजन व्हावे. विविध विभागांच्या एकत्रित स्पर्धा झाल्यास विविध विभागातील अधिकारी, कर्मचारी यांच्यातील बाँडिंग वाढण्यासाठी मदत होईल, असे जिल्हा पोलीस अधीक्षक अमोल तांबे म्हणाले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी उपस्थित मान्यवरांचे स्वागत पुष्पगुच्छांऐवजी ग्रंथ देऊन करण्यात आले. तसेच विविध महसूल अधिकारी आणि कर्मचारी संघटनांच्या प्रतिनिधींचाही यावेळी गौरव करण्यात आला. सूत्रसंचालन उद्धव फड यांनी केले. या दोन दिवसीय स्पर्धेत विविध मैदानी खेळ आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

### समाधान नळेगावात शिबिरास प्रतिसाद

**नळेगाव :** महाराष्ट्र शासनाद्वारेराबविण्यात येत असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत नळेगाव येथे दि. १४ मार्च रोजी नळेगाव ग्रामपंचायत सभागृहात समाधान शिबीर घेण्यात आले.

शिबिरास उपजिल्हाधिकारी अहिल्या गाठाळ, उपविभागीय अधिकारी डॉ मंजुषा लटपटे, तहसीलदार नरसिंग जाधव, नायब तहसीलदार दिगंबर स्वामी, संतोष धाराशिवकर, शैलेश निकम, तालुका कृषी अधिकारी शिवचंद्रपाल जाधव, सरपंच सूर्यकांत चव्हाण, पंचायत समिती सदस्य शिवम देवशेटवार, संतोष कलवले, अनिकेत शेंडगे, रामेश्र्वर स्वामी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### 'महिला तंत्रनिकेतन' मध्ये महिला दिन उत्साहात साजरा

**लातूर :** शहरातील बार्शी रोड येथील शासकीय निवासी तंत्रनिकेतनमध्ये जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून भारतातील कर्तृत्ववान महिलांच्या प्रतिमांचे अनावरण करण्यात आले. यामध्ये तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी, भारतरत्न लता मंगेशकर, राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, अंतराळवीर कल्पना चावला, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, डॉ. आनंदीबाई जोशी आणि राजमाता जिजाऊ यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.कार्यक्रमाचे उद्घाटन प्रमुख पाहुण्या डॉ. उमा कडगे यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी 'बेटी बचाव, बेटी पढाओ' या विषयावर भव्य रांगोळी स्पर्धा घेण्यात आली. ॲड. लक्ष्मिकांत कमलजकर यांनी 'भक्कम कुटुंब व्यवस्था' यावर, तर नाबार्डचे जिल्हा प्रबंधक श्रीराम वाघमारे यांनी 'आर्थिक साक्षरता व सक्षमीकरण' या विषयावर विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले. प्रास्ताविक प्रा. रंजिता कोताळकर यांनी केले. सूत्रसंचालन वैष्णवी शेळके यांनी केले. तर आभार श्रावणी गायकवाड यांनी मानले. प्राचार्य एस.डी. राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम यशस्वी करण्यात आला झाला. यावेळी प्रा. गिरगावकर, प्रा. आवले, प्रा. ऐतवाडे, प्रा. श्रीमती बिडवे यांच्यासह विद्यार्थ्यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रम नियोजनासाठी पंकज स्वामी यांनी साथ दिली.

### दयानंद विज्ञान महाविद्यालयातील रोबोटिक्स एक्स्पो प्रदर्शनाला प्रतिसाद

**लातूर :** दयानंद महाविद्यालयातील विज्ञान संगणकशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांच्या रोबोटिक्स एक्स्पो व त्यांच्या स्किल डेव्हलपमेंटचे भव्य प्रदर्शन भरविण्यात आलेले होते. त्यात ८ रोबोटिक्स व विद्यार्थ्यांच्या स्किल डेव्हलपमेंटचे अनेक प्रोजेक्ट वस्तू आकर्षणाच्या केंद्रबिंदू होत्या. अनेक विद्यार्थ्यांनी या प्रदर्शनात उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदविला.

सदरील प्रदर्शनात संगणकशास्त्र विभागातील बी.एस्सी. तृतीय वर्षांच्या विद्यार्थ्यांनी ॲग्रीकल्चर संदर्भात काही रोबोट तयार केलेले होते, ज्याच्यामध्ये शेतीमध्ये बिया पेरण्याचा रोबोट, शेतीमध्ये औषधे फवारणीसाठीचा रोबोट, नांगरणीसाठीचा रोबोट आणि काही रोबोट स्मार्ट क्लासरूमसाठी होते. ज्यांच्यामध्ये एनर्जी सेव्ह करता येते, अशा रोबोटचे प्रदर्शन भरविण्यात आलेले होते.ॲग्रो रोबोट प्रदर्शन, रोबोटची थेट प्रात्यक्षिके आणि विद्यार्थ्यांच्या प्रकल्पांचे प्रदर्शन हे त्यांच्या स्किल, इनोव्हेशन, संशोधनाला चालना देणारी कौतुकास्पद बाब होती. प्रत्येक विद्यार्थ्यांनी भविष्यात असेच नावीन्यपूर्ण संशोधन करावे, असे रोबोटिक्स एक्स्पोचे आयोजन महाविद्यालयात करण्यात आलेले होते. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून शिक्षणाधिकारी तृप्ती अंधारे, संस्थेचे शैक्षणिक विकास अधिकारी डॉ. जयप्रकाश दरगड, प्राचार्य डॉ. सिद्धेश्वर बेल्लाळे, उपप्राचार्य प्रा. भाऊसाहेब सरवदे, डॉ. संध्या कोल्हे, डॉ. हेमंत वरुडकर, प्राचार्य अनिलकुमार माळी, डॉ. जमन, अंगुलवार, डॉ. रोहिणी शिंदे, डॉ. युवराज सारणीकर, डॉ. श्याम इबाते, डॉ. संगीता जाजू, प्रा. सुजाता काळे, प्रा. बळवंत सूर्यवंशी यांच्यासह विभागातील प्राध्यापक, शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी भेट दिली असता, या भेटी दरम्यान सर्वांनी विचारलेल्या सर्व प्रश्नांची उत्तरे विद्यार्थ्यांनी दिली.

# माजी खासदार, शिक्षणतज्ञ डॉ. जनार्दन वाघमारे यांची शुक्रवारी श्रद्धांजली सभा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १७ मार्च :** लातूर पॅटर्नचे शिल्पकार, माजी खासदार, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे संस्थापक व पहिले कुलगुरू, लातूरचे माजी नगराध्यक्ष, ज्येष्ठ विचारवंत, ख्यातनाम साहित्यिक, डॉ. जनार्दन वाघमारे यांचे २ मार्च रोजी सकाळी ८.३० वाजता निधन झाले. त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी श्रद्धांजली सभेचे आयोजन करण्यात आले आहे. ही श्रद्धांजली सभा शुक्रवारी (दि २०) सायंकाळी ४.३० वाजता दयानंद सभागृह येथे होणार आहे.



साहित्य, शिक्षण, सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात डॉ. जनार्दन वाघमारे यांनी आपला ठसा उमटवला आहे. डॉ. वाघमारे यांनी मराठी, हिंदी आणि इंग्रजी भाषेत ७५ पेक्षा अधिक पुस्तकांचे लेखन केले आहे. फक्त ज्ञानाच्या बळावर सर्वोच्च पदावर पोहोचलेले अखंडपणे ज्ञानयज्ञ चालवणारे ज्ञानर्षी म्हणजे डॉ. जनार्दन वाघमारे सर. त्यांनी आयुष्यभर शिक्षण आणि सामाजिक परिवर्तनाच्या कार्यासाठी स्वतःला वाहून घेतले होते. लातूरच्या राजर्षी शाहू महाविद्यालयाच्या उभारणीमध्ये डॉ. वाघमारे सरांचा सिंहाचा वाटा आहे. इंग्रजी साहित्याचे प्राध्यापक म्हणून त्यांनी दीर्घकाळ अध्यापन केले. निग्रो साहित्य, दलित साहित्य आणि पुरोगामी साहित्य चळवळीवर त्यांनी सखोल लेखन व संशोधन केले. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडचे कुलगुरू झाले. विद्यापीठाच्या स्थापनेपासून शैक्षणिक पायाभूत रचना उभारणीपर्यंत त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. राष्ट्रवादी काँग्रेस तर्फे त्यांची राज्यसभेवर खासदार म्हणून निवड झाली होती. मराठवाड्याच्या विकासासह अनेक सामाजिक प्रश्नांना त्यांनी राज्यसभेत वाचा फोडली. डॉक्टर वाघमारे यांची लातूर नगरीचे पहिले लोकनियुक्त नगराध्यक्ष म्हणून कारकीर्द कौतुकास्पद राहिली आहे. डॉ.जनार्दन वाघमारे यांचे निधनामुळे शिक्षण, राजकारण आणि समाजकारण यांना जोडणारा मार्गदर्शक दुवा निखळला आहे.

त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी शुक्रवारी सायंकाळी ४.३० वाजता दयानंद सभागृह येथे श्रद्धांजली सभेचे आयोजन समस्त लातूरकरांच्यावतीने करण्यात आले आहे. या श्रद्धांजली सभेस मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याची विनंती माजी प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार, डॉ. दिगंबर नेटके, डॉ. विनायक कलमे, प्राचार्य संजय वाघमारे, प्रा. सुधीर साळुंखे, प्रा.डॉ. विनोद चव्हाण, प्राचार्य डॉ. हरिदास फेरे, विवेक सौताडेकर आदींनी केली आहे.

### सैनिक कल्याण विभागाच्या लिपिक-टंकलेखक (गट-क) पदभरती परीक्षेच्या तारखेत बदल; आता २३ मार्च रोजी होणार ऑनलाईन परीक्षा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १७ मार्च :** सैनिक कल्याण विभाग व त्यांच्या अधिपत्याखालील जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयातील लिपिक-टंकलेखक (गट-क) एकूण ७२ पदांसाठी टीसीएस-आयओएन यांच्यामार्फत घेण्यात येणाऱ्या ऑनलाईन परीक्षेच्या तारखेपेक्षा बदल करण्यात आला आहे. ही परीक्षा आता २३ मार्च २०२६ रोजी दुपारी १ ते ३ या कालावधीत घेण्यात येणार आहे. पोलीस भरतीमुळे या परीक्षेची तारीख बदलण्यात आल्याचे जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी ले. कर्नल शरद पांढरे (निवृत्त) यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले आहे.

## लातूरच्या संकेत मिलनाचा या नाटकाला तिन पुरस्कार

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १७ मार्च :** छत्रपती संभाजी नगर येथे महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळामार्फत आयोजित विभागीय नाट्य स्पर्धेत लातूरच्या अजय गोजमगुंडे प्रस्तुत संकेत मिलनाचा या नाटकास तिन पुरस्कार प्राप्त झाले आहेत.

महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या ७१ व्या विभागीय नाट्य महोत्सवात संकेत मिलनाचा हे नाटक सादर करण्यात आले. सादरीकरणानंतर या नाटकातील कलाकारांची वृत्तपत्रांनी दखल घेवून कौतुक केले होते. या नाट्यस्पर्धेत एकूण वीस नाट्य संघांनी सहभाग नोंदविला.त्यात संकेत मिलनाचा या नाटकाला उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले आहे. तर या नाटकातील कलाकार सुवर्णा बुरांडे यांना महिला अभिनयातील प्रथम क्रमांकाचा पुरस्कार प्राप्त झाला आहे.तर पुरुष अभिनयातील तृतीय पुरस्कार अजय गोजमगुंडे यांना मिळाला आहे. संकेत मिलनाचा या नाटकाचे दिग्दर्शन बुरांडे,प्रकाश योजना अनिल कांबळे,नेपथ्य नंदकुमार वाकडे,रंगभूषा भारत थोरात यांनी केली असून संगीत मंदाकिनी घोरपडे व प्रकाश गंगणे यांनी दिले आहे.



### सावधान! लातूर जिल्हाधिकारी कार्यालय शिपाई पदभरतीची ती जाहिरात बनावट !

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १७ मार्च :** सोशल मीडियावर सध्या लातूर जिल्हाधिकारी कार्यालयांतर्गत २९ शिपाई (महसूल सेवक) पदांच्या भरतीची जाहिरात व्हायरल झाली आहे. सदर जाहिरात पूर्णपणे फेक आहे, नागरिकांनी अशा फसव्या माहितीला बळी पडू नये आणि कोणत्याही प्रकारचे पैसे भरू नयेत किंवा अर्ज करू नयेत.

भरतीसाठी अर्ज करण्यापूर्वी किंवा पैसे भरण्यापूर्वी लातूर जिल्हाधिकारी कार्यालयाच्या https://latur.gov.in या अधिकृत संकेतस्थळाला भेट द्या. तेथे उपलब्ध असलेल्या अधिकृत जाहिरात/जाहीरनाम्याची खात्री करा.

अफवा पसरवू नका, स्वतःची आणि इतरांची फसवणूक टाळा!

वस्तुस्थिती : लातूर जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत महसूल सेवक संवर्गातील शिपाई पदासाठी परिक्षा जाहीर करण्यात आली आहे. पण ही प्रक्रिया फक्त महसूल सेवक/कोतवाल संवर्गात सलग १० वर्षे सेवा पूर्ण केलेल्या उमेदवारांसाठी आहे. खुली भरती प्रक्रिया नाही. २९ पदांची ही व्हायरल जाहिरात ही अधिकृत नसून बनावट आहे.

अधिकृत माहितीसाठी https://latur.gov.in या संकेतस्थळाला भेट द्या !

# दयानंद कला महाविद्यालयात 'पेटंट फिलींग प्रक्रिया, संशोधन-त्यातील अडथळे' विषयावर एक दिवसीय कार्यशाळा संपन्न

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १७ मार्च :** दयानंद कला महाविद्यालयातील समाजशास्त्र विभागातर्फे आज दिनांक १३ मार्च २०२६ रोजी 'पेटंट फिलींग प्रक्रिया, संशोधन आणि त्यातील अडथळे' या विषयावर एक दिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली. दयानंद वाणिज्य महाविद्यालयातील मॅनेजमेंट सायन्सचे विभाग प्रमुख डॉ. बालाजी कळंबे हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड होते.

मानव्यविज्ञान शाखेतील विद्यार्थी आणि प्राध्यापकांनी पेटंट फिलिंग करण्याकडे लक्ष दिल्यास अवघड काही नाही असे मत डॉ. बालाजी कळंबे यांनी व्यक्त केले. प्राध्यापक आपल्या विद्यार्थ्यांना शिकवण्यासाठी व्हिडिओ बनवतात किंवा विशिष्ट पद्धतीचा वापर करून विद्यार्थ्यांना शिकवतात. अशावेळी त्यांनी बनवलेले व्हिडिओ किंवा वापरलेली पॅडागॉजी यावर पेटंट फाईल करता येते.याविषयी अधिक मार्गदर्शन करताना त्यांनी पेटंट फिलींग करण्याचे वेगवेगळे प्रकार सांगितले. त्यात मानव्यविज्ञान शाखेतील प्राध्यापकांशी संबंधित असणाऱ्या डिझायनर पेटंट बाबत विस्तृत माहिती दिली. प्राध्यापकांनी विचारलेल्या प्रश्नांना त्यांनी समाधानकारक उत्तरे दिली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मांडताना डॉ. अंजली जोशी यांनी कला महाविद्यालयातील प्राध्यापकांची पेटंट फिलिंग बाबतची उदासीनता व्यक्त केली. प्राध्यापकांना या संदर्भात अधिकाधिक माहिती मिळावी यासाठी १० पेटंट ज्यांनी मिळवले आहेत अशा डॉ. बालाजी कळंबे यांचे प्रमुख मार्गदर्शन आयोजित केल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमासाठी डॉ. संतोष पाटील समन्वयक अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन एम ए चा विद्यार्थी सुरज गोरे यांनी केले. तर आभार प्रदर्शन प्रा ज्योती कदम यांनी केले. कार्यक्रमासाठी डॉ संजय स्वामी यांनी मेहनत घेतली.

या कार्यशाळेत वरिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापक उपस्थित होते.



# जिल्हा परिषदेच्या २३ कोटी २६ लक्ष रुपयांच्या अर्थसंकल्पास मंजूरी

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १७ मार्च-**

नांदेड जिल्हा परिषदेचा अर्थसंकल्पला आज सादर करण्यात आला. जिल्हा परिषदेच्या स्वः उत्पन्नातून तयार करण्यात आलेल्या सन २०२५-२६ च्या सुधारित व सन २०२६-२७ च्या मूळ अर्थसंकल्पास जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक मेघना कावली यांनी मान्यता दिली. यशवंतराव चव्हाण सभागृहात झालेल्या बैठकीत हा अर्थसंकल्प मंजूर करण्यात आला.

मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक मेघना कावली यांनी हा अर्थसंकल्प सादर केला. यावेळी मंचावर अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप माळोदे, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक डॉ. संजय तुबाकले, सामान्य प्रशासन विभागाचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी राजकुमार मुक्कावार, मुख्य लेखा व वित्त अधिकारी शिवप्रकाश चन्ना, उपमुख्य



लेखा व वित्त अधिकारी महेश देशमुख, लेखाधिकारी विशाल हिवरे यांची उपस्थिती होती.

जिल्हा परिषदेच्या सन २०२६-२७ ची अपेक्षित जमा २३ कोटी २६ लक्ष तर अपेक्षित खर्च २३ कोटी १९ लक्ष असून सदर अर्थसंकल्प ७ लक्ष ८ हजार रुपये शिल्लकेचा आहे. अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकात शिक्षण विभागासाठी १ कोटी १६ लक्षची तरतूद करण्यात आली असून खेळाचे मैदान विकसीत करणे व क्रिडा साहित्य पुरविण्या करिता २५ लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. करिअर मार्गदर्शन व अकरावी-बारावीतील प्रज्ञावंत विद्यार्थ्यांना अर्थसहाय्य करण्यासाठी प्रज्ञा प्रकल्प राबविण्यात येणार असून यासाठी ३२ लक्ष रू. ची तरतूद करण्यात आली आहे.

माळेगावसह इतर यात्रेसाठी ७५ लाख रुपयाची तरतूद आहे. ग्रामीण भागात होणारे श्वानदंश व साप चावून होणारे मृत्यु रोखण्यासाठी आवश्यक इंजेक्शन करिता २० लक्ष, प्राथमिक आरोय केंद्रातील अत्याधुनिक प्रसूती कक्षा करिता २० लक्ष ची तरतूद करण्यात आली आहे. या शिवाय आरोग्य केंद्र छटड करणे, आरोग्य दूत योजना राबविणे, क्षयरोग मूक्त गाव अशा वैशिष्टपूर्ण योजना राबविणे करिता एकूण ४५ लक्ष रू. ची तरतूद करण्यात आली आहे.

अनुसूचित जाती-जमाती व दुर्बल घटकांसाठी १ कोटी ५६ लक्ष रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. यामध्ये व्यवसायासाठी आर्थिक सहाय्य, चारचाकी वाहन खरेदीसाठी अनुदान, विद्यार्थ्यांना लॅपटॉपसाठी मदत तसेच गर्भवती माता व बालकांच्या सुरक्षेसाठी ॲनोमली स्कॅनसाठी ४० लक्ष रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. दिव्यांगांसाठीही १ कोटी १६ लक्ष रुपयांचा निधी राखीव ठेवण्यात आला आहे.

शेती क्षेत्रात ड्रोन खरेदीसाठी १२ लक्ष, जैविक कीटकनाशक प्रयोगशाळेसाठी १२ लक्ष, सूक्ष्म प्रक्रिया उद्योगांसाठी १६ लक्ष तसेच आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांना १८ लक्ष रुपयांची मदत देण्यात येणार आहे. प्रिसीजन फार्मिंग योजनेसाठी ११ लक्ष रुपयांची तरतूद आहे. पशुधन विभागाकरिता ९० लक्ष रुपये तरतूद ठेवण्यात आली आहे. यामध्ये औषधी, ईमारत दुरुस्ती, लस वाहतुक याचा समावेश आहे. लघु पाटबंधारे विभागासाठी ४५ लक्ष तरतूद करण्यात आली आहे.

महिला व बाल विकासासाठी ७८ लक्ष रुपयांची तरतूद करण्यात आली असून अंगणवाडीतील विद्यार्थ्यांना गणवेश, ड्युअल डेस्क व भांडी पुरविणे तसेच घटस्फोटित व विधवा महिलांच्या पाल्यांना सहाय्य देण्यात येणार आहे. घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन तसेच प्लास्टिक प्रक्रिया प्रकल्पांसाठी ५७ लक्ष रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. पाणीपुरवठा विभागासाठी तब्बल ४ कोटी ६५ लक्ष रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. तर मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानाला गती देण्यासाठी ७८ लक्ष रुपयांचा निधी देण्यात आला असून ग्रामविकासाला चालना मिळणार आहे.

हा अर्थसंकल्प महिला सक्षमीकरण, आधुनिक शेती, दर्जेदार शिक्षण व सक्षम आरोग्य सेवा यावर आधारित असून ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकासाला गती देणारा ठरणार आहे. यावेळी जिल्हा परिषदेचे सर्व खाते प्रमुख व सर्व गट विकास अधिकारी यांची उपस्थिती होती.

## आदमपूर जामा-मस्जिदमध्ये 'शब-ए-कद्र' साजरी

**आदमपूर**-पवित्र रमजान महिन्याचे अंतिम पर्व सुरू असून,सोमवारी दि.१६ मार्च रोजी बिलोली तालुक्यातील आदमपूर ग्रामीण परिसरातील सर्वच मशिदींमध्ये 'शब-ए-कद्र' ची विशेष नमाज आणि अखंड प्रार्थना,विशेष दुआँ करण्यात आली. पवित्र रमजान महिन्यात २६ व्या रोजाच्या रात्री शब-ए-कद्र ची 'बडी रात' अर्थात 'विशेष महान रात्र' असते.



शब-ए-कद्रसाठी नमाज पठण झाल्यानंतर मानवतेसाठी, नकळत झालेल्या मानवी चुकांबद्दल व कुटुंबातील दिवंगत आप्तेष्टांना सामुहिक भावभिनी विशेष दुआँ केली गेली. रमजान महिना तीन खंडात विभागला असून,तिसरा खंड अर्थात शेवटच्या दहा दिवसांना 'तिसरा अशरा' संबोधले गेले आहे.याला धार्मिकदृष्ट्या प्रचंड महत्त्व असून,या दिवसांतील दहा रात्रिंना 'ताक राते',असेही संबोधले आहे. आपल्याकडून झालेल्या चुका,धर्माचरणातील खंड किंवा कुठल्याही सजीवाचे मन दुखावले,त्रास दिला असल्यास किंवा शरीरास नुकसान पोहोचविले असल्यास,कुणाचा अपप्रचार,अशा कृत्याला इस्लाम धर्मात गुन्हा संबोधले आहे.अशा गुन्ह्यांसाठी माफी मागण्याची रात्र म्हणजेच 'शब-ए-कद्र' होय.मुस्लिम बांधवांची या रात्रीसाठी प्रार्थनेसाठी मशिदींमध्ये सोबतच कब्रस्थानात प्रचंड गर्दी असते. त्यानंतर जामा-मस्जिद परिसरातील उर्दू,अरबी शिकण्यासाठी नियमित येत असलेल्या मुला,मुलींनी हज़रत मोहम्मद पैगंबर,इस्लाम धर्म,हदीस ग्रंथ,कुराण ग्रंथ,हजरत प्रेषित,नमाज,दान धर्म,रोजा,आचरण आदि बांबीची खडान् खडा सभाधीटपणे माहिती दिली.त्यांना रोखबक्षीसही देण्यात आले. या विशेष प्रार्थना रात्रीत आदमपूर जामा-मस्जिदचे हाफिज आदमसाब शेख मुतन्याळकर,जामा-मस्जिद अध्यक्ष अहेमदसाब पठाण,उपाध्यक्ष आमिरसाब शेख, महाराष्ट्र ग्रामीण बँक सहाय्यक महमदरफी मदार, पत्रकार जाफर आदमपूरकर,पप्पू शेख,मोहम्मद शेख, नयुम शेख,ऐनुल्ला शेख,आरिफ शेख,महमदरफी शेख, रफीक बकरखाटीक,उस्मान पिंजारी,सोहेल शेख,साहिल शेख,अश्फाक शेख,फरहान शेख,अरबाज शेख,समीर शेख,मुन्ना शेख,इस्माईल शेख, गौस शेख,अनवर शेख, सलीम शेख,अमान मदार,घुडूसाब शेख,बबलू शेख व मुस्लिम बांधवांसह मुलांचीही उल्लेखनीय उपस्थिती होती. या अभूतपूर्व यशामुळे संपूर्ण मराठवाड्यात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषद, अधिसभा सदस्य, विद्यार्थी विकास मंडळ यासह विद्यापीठ परिसरातील संचालक, प्राध्यापक, अधिकारी व कर्मचारी तसेच विविध स्तरांतून विजेत्या विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शकांचे अभिनंदन होत आहे.

## चैत्र नवरात्र महोत्सवानिमित्त श्रीरामकथा सोहळ्याचे आयोजन

**किनवट**-श्रीराम मंदिर संस्थान, किनवट यांच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही चैत्र नवरात्र महोत्सव आणि श्रीरामनवमी उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. यंदाच्या महोत्सवाचे मुख्य आकर्षण शुक्रवार दि. २० मार्च ते गुरुवार दि. २६ मार्च २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आलेला भव्य श्रीरामकथा सोहळा असणार आहे. किनवट येथील रामनगर परिसरातील श्रीराम मंदिरात दररोज सायंकाळी ७ ते रात्री ९ या वेळेत सुप्रसिद्ध कथावाचक प्रा. तपनकुमार मिश्रा आपल्या रसाळ वाणीतून श्रीरामचरितमानसावर आधारित प्रभू श्रीरामांच्या पावन जीवनचरित्राचे निरूपण करणार आहेत. भक्ती, अध्यात्म आणि सत्संगाचा संगम असलेल्या या सोहळ्याचा लाभ भाविकांनी घ्यावा, असे आवाहन संस्थानतर्फे करण्यात आले आहे. महोत्सवाचा मुख्य सोहळा गुरुवार दि. २६ मार्च २०२६ रोजी रामनवमीच्या दिवशी होणार आहे. पहाटे ५ वाजता महाअभिषेक व पूजनाने कार्यक्रमांची सुरुवात होईल. त्यानंतर सकाळी ७ वाजता सामूहिक आरती होणार आहे. सकाळी ९ वाजता शहरातून भव्य बाईक रॅली काढण्यात येईल. दुपारी १२ वाजता प्रभू श्रीरामांचा जन्मोत्सव सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणार असून दुपारी १ वाजता सर्व भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच दुपारी ४ वाजता प्रभू श्रीरामांची भव्य मिरवणूक काढण्यात येणार आहे. मर्यादा पुरुषोत्तम प्रभू श्रीरामांच्या या आध्यात्मिक उत्सवात भाविक भक्तांनी सहकुटुंब उपस्थित राहून दर्शन व श्रीरामकथेचा अमृतमय लाभ घ्यावा, असे आवाहन श्रीराम मंदिर संस्थानच्या वतीने करण्यात आले आहे.

## प्रसिद्ध मेकअप आर्टिस्ट अस्मिता साबळे यांना महाराष्ट्र नायक राज्यस्तरीय

**नवीन नांदेड**-स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ येथील परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक हुशारसिंग साबळे यांची सुकन्या तथा



मेकअप आर्टिस्ट अस्मिता साबळे यांच्या मेकअप आर्टिस्ट क्षेत्रातील कामाचे दखल घेऊन त्यांना महाराष्ट्र नायक राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. समाज प्रतिबिंब बहुउद्देशीय संस्था संस्था व बीएसएफ बहुउद्देशीय संस्था आणि उपेक्षित नायक न्यूज व संत कबीर बहुउद्देशीय संस्था बुलढाणा यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्र नायक राज्यस्तरीय पुरस्कार सोहळ्याचे आयोजन नाशिक मध्ये करण्यात आले आहे सामाजिक कृषी क्रीडा उद्योग शैक्षणिक संस्था प्रशासकीय कला व अनेक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केलेल्या सत्तर लोकांना हा महाराष्ट्र नायक राज्यस्तरीय पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे चित्रपट संस्कृती कलाकारांच्या उपस्थितीमध्ये हा पुरस्कार सोहळा मे महिन्यात नाशिक येथे पार पडणार आहे अशी माहिती कार्यक्रम आयोजक भूषण सरदार यांनी दिली पुरस्कार प्रस्ताव अधिक माहितीसाठी १४२०६२१९९४ संपर्क करावा असे आवाहन आयोजन समितीने केले आहे.

## मुक्ता कदम प्रकरणी मुदखेड पत्रकार संघाचा निषेध; गुन्हा मागे घेण्याची मागणी



**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि. १७ मार्च-**

नांदेड महानगरपालिका निवडणुकीत ग्राउंड रिपोर्टींग केल्याबद्दल पत्रकार मुक्ता कदम यांच्यावर दाखल करण्यात आलेल्या आचारसंहिता भंगाच्या गुन्ह्याविरोधात मुदखेड तालुक्यातील पत्रकार संघ आक्रमक झाला आहे. जिल्हा मुख्य निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी यांना तहसीलदारामार्फत निवेदन देत हा गुन्हा तात्काळ मागे घेण्याची मागणी करण्यात आली.

नांदेड महानगरपालिका - २०२६ निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शहरातील पाणीटंचाई, अस्वच्छता, आरोग्य, शिक्षण व रस्त्यांचा प्रश्न इ. मुलभूत प्रश्नांवर बोट ठेवत वृतांकन केल्यानंतर दोन महिन्यांनीच मुक्ता कदम यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई म्हणजे अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर घाला असल्याचे म्हणत खा. अशोक चव्हाण यांच्या प्रभाव क्षेत्रातील भोकर मतदार संघातील पत्रकारांनी तीव्र निषेध व्यक्त केला.

यावेळी तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष सिद्धार्थ चौदंते, माजी जिल्हा संघटक प्रतापराव देशमुख, संदीपकुमार देशमुख, रुकमाजी शिंदे, दिनेश शर्मा, अतिक अहमद, उत्तम हनुमंते, गंगाधर डांगे, जयराम वने, साहेबराव गागलवाड, साहेबराव हौसरे, संतोष सावंत, हाफिज खुरेशी, व्यंकटी मुंगल, मोहम्मद हकीम,संतोष दर्शनवाड, इत्यादी पत्रकार उपस्थित होते.

# दारूच्या नशेत स्कूल बस चालक; बुरकुलवाडी नाल्यावर बसची धडक

**तभा वृतसेवा**
**इस्लापूर, दि. १७ मार्च-**

राष्ट्रसाधना पब्लिक स्कूल, हिमायतनगर या शाळेची बस दारूच्या नशेत चालविल्याने बुरकुलवाडी नाल्यावर सुरक्षा कठड्याला धडकली. सुदैवाने मोठा अपघात टळला असून बसमधील सुमारे ४० विद्यार्थ्यांना कोणतीही गंभीर दुखापत झाली नाही. या प्रकरणी चालकास ईस्लापूर पोलिसांनी ताब्यात घेत गुन्हा दाखल केला आहे.

आज दिफ १६ रोजी सकाळी सुमारे आठ वाजण्याच्या सुमारास ईस्लापूरहून हिमायतनगरकडे राष्ट्रसाधना पब्लिक स्कूलची एम.एच. २६ एच ००८५ क्रमांकाची बस सुमारे ४० शाळकरी



विद्यार्थ्यांना घेऊन जात होती. बस बुरकुलवाडी येथील नाल्यावर पोहोचताच चालकाने दारूच्या नशेत वाहन चालवत असताना नियंत्रण गमावल्याने बस नाल्याच्या सुरक्षा कठड्याला धडकली. कठड्यामुळे बस नाल्यात कोसळण्याचा मोठा अनर्थ टळला.

या घटनेनंतर चालक दत्ता मारुती मिराशे (वय ३६, रा. हुडी) याला ईस्लापूर पोलिसांनी ताब्यात घेऊन त्याचे वैद्यकीय परीक्षण केले. या प्रकरणी संदीप संभाजी वानखेडे यांच्या फिर्यादीवरून ईस्लापूर पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजिस्टर क्रमांक १५ नुसार कलम २८५ तसेच मोटार वाहन अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबतची माहिती सहाय्यक पोलीस निरीक्षक उमेश भोसले यांनी दिली असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक कोमल कांगणे करीत आहेत.

## प्राचार्य डॉ.गणेश जोशी यांना मातृ शोक



**नांदेड-** एमजीएम वृत्तपत्र महाविद्यालयाचे प्राचार्य तथा दैनिक लोकपत्र वृत्तपत्राचे आवृत्ती संपादक डॉ. गणेश जोशी यांच्या मातोश्री वनमालाबाई मुरलीधर जोशी यांचे वयाच्या ६५ व्या वर्षी रा. धनगर टाकळी ता. पूर्णा येथे दि. १७ मार्च रोजी सकाळी निधन झाले. त्यांच्या पार्थिवदेहावर त्यांचे राहते घर धनगर टाकळी ता.पूर्णा येथे आज दुपारी ४. वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले आहे. त्यांच्या पश्चात पती, दोन मुले, एक मुलगी, सुना, नातू असा परिवार आहे.

## हिमायतनगर तालुक्यात जलजीवनचे रुपये कागदावरच

**तभा वृतसेवा**
**हिमायतनगर, दि. १७ मार्च-**

हिमायतनगर तालुक्यातील अनेक ग्रामपचायती मध्ये जल जीवन मिशन अंतर्गत नळ योजनेची कामे मंजुर झाली आहेत.काही ठीकाणी पाईप लाईन टाकुन झाली आहे.तर काही ठीकाणी टाक्याचे बांधकाम अर्धवट स्थीतीत आहे. काही गावांमध्ये कागदोपत्री कामे पूर्ण झाल्याचा दावा केला जात असला तरी प्रत्यक्षात मात्र एका थेंबा साठी ग्रामस्थांना पायपीट करावी लागत आहे.

प्रत्येक घरामध्ये नळाद्वारे शुध्द पाणी पोहोचवण्याच्या उद्देशाने केंद्र आणि राज्य सरकारने जलजीवन मीशन : अंतर्गत कोट्यावधी रूपयांचा निधी मंजूर केला आहे.मात्र हिमायतनगर तालुक्यात या योजनेचा बोजवारा उडाल्याचे चीत्र दिसत असून ऐन उन्हाळाच्या तोंडावर ग्रामीण भागातील जनतेला पाण्यासाठी संघर्ष करावा लागत आहे.

तालुक्यातील डोंगराळ आणि दुर्गम भागात विहीरीनी तळ गाठला आहे .काही गावामध्ये महीलाना पहाटे पासुन शेतातल्या विहीरी किंवा लांब अंतर असलेल्या जलस्त्रोता कडे धाव घ्यावी लागते .अनेक ठीकाणी पाईप लाईन झाल्याच्या तक्रारी ग्रामस्थांनी केल्या आहे . निकृष्ट दर्जाच्या कामामुळे पाणीपुरवठा सुरू होण्यापूर्वीच गळतीचे प्रकार समोर येत आहे.कत्राटदार आणि संबंधीत विभागाच्या समन्वय अभावी कोट्यावधी रूपये खर्च होऊनही जनतेची तहान भागलेली नाही .सरकारने कोट्यावधी रूपये मंजूर केले पण आमच्या नळाला पाणी कधी येणार ? असा सवाल सामान्य नागरीक विचारत आहेत .लोकप्रतीनिधीनी याकडे लक्ष देऊन रखडलेली कामे तातडीने पूर्ण करावीत अशी मागणी जोर धरत आहे.

हिमायतनगर तालुक्यात जलजीवन मीशन ही योजना केवळ कंत्राटदाराचे खीसे भरण्याचे साधन ठरले की काय असे बोलल्या जात आहे.कारण कामे तर झाली सिमेंट रोड फोडून ठेवले परंतू नळातून पाणी बाहेर आलेच नाही .त्यामुळे प्रशासनाने या कामाची सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई करावी आणि उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर ग्रामीण भागातील पाणी पुरवठा सुरळीत करावा अशी मागणी हिमायतनगर तालुक्यातील नागरीकाची आहे.

## सावरगाव (न) ग्रामपंचायतीत निधी गैरव्यवहाराचा आरोप

**तभा वृतसेवा**
**लोहा, दि. १६ मार्च-**

तालुक्यातील सावरगाव (न) येथील ग्रामपंचायतीत विविध विकास योजनांच्या निधीचा गैरव्यवहार झाल्याचा गंभीर आरोप समोर आला आहे. ग्रामसेवकाने काम न करता लाखो रुपयांचा निधी उचलल्याचा आरोप करण्यात आला असून, याबाबत सखोल चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

सावरगाव (न) ग्रामपंचायतीची मुदत फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यात संपल्यानंतर प्रशासक नियुक्तीबाबत सुरुवातीला विस्तार अधिकाऱ्यांची नियुक्ती होणार असल्याची चर्चा होती. मात्र, न्यायालयीन प्रक्रियेनंतर हा आदेश रद्द करून विद्यमान सरपंचालाच प्रशासक म्हणून नियुक्त करण्यात आले. अनुसूचित जाती महिला सरपंच पद राखीव असल्याने मागासवर्गीय महिला सरपंच यांचीच प्रशासक म्हणून नियुक्ती करण्यात आली.

दरम्यान, ग्रामसेवकाने सरपंचांना अंधारात ठेवून गटविकास अधिकारी व विस्तार अधिकाऱ्यांच्या संगनमताने ग्रामपंचायतीचे डिजिटल स्वाक्षरी प्रमाणपत्र (डीएससी) वापरून निधी उचलल्याचा आरोप आहे. विशेष म्हणजे राज्यभर डीएससी प्रणाली बंद असताना सावरगाव (न) येथील ग्रामपंचायतीचे खाते सुरू ठेवून



त्यातून निधी काढण्यात आल्याचे सांगितले जात आहे.

महिला सरपंचांच्या मुलाने पंचायत समिती कार्यालयात जाऊन काम व निधीची माहिती घेतली असता, खात्यातून विविध व्यक्तींच्या नावे रक्कम वर्ग करण्यात आल्याचे उघड झाले. कोणतेही प्रत्यक्ष काम न करता अभियंत्यांनी मोजमाप पुस्तिका (एम.बी.) तयार केल्याचाही आरोप करण्यात आला आहे.

यामध्ये हुलेयवाडी रस्त्यालगत वाल्मिकी ऋषी देवस्थान परिसरात पेवर ब्लॉक बसविण्याचे काम मंजूर झाले होते. त्यासाठी निधीही ग्रामपंचायतीच्या खात्यात जमा झाला होता. मात्र प्रत्यक्षात काम न करता निधी उचलल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले असून, संबंधित पुरावेही सादर करण्यात आले आहेत.

फक्त दोन दिवसांच्या प्रशासकीय कार्यकाळातच हा निधी काढण्यात आल्याचा आरोप असून, महिला प्रशासक सरपंचांना कोणतीही माहिती न देता व्यवहार करण्यात आल्याचे सांगण्यात आले आहे. या प्रकरणी संबंधित विस्तार अधिकारी आणि ग्रामसेवक यांची मिलीभगत असल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे.

या प्रकाराचा भांडाफोड करत प्रशासक महिला सरपंचांच्या मुलाने नांदेड येथील मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे लेखी तक्रार दाखल करून चौकशी पथक नेमण्याची मागणी केली आहे. तसेच, योग्य कारवाई न झाल्यास आमरण उपोषणाचा इशाराही देण्यात आला आहे.

दरम्यान, संबंधित ग्रामसेवकावर यापूर्वीही ग्रामपंचायत सुगाव ता.लोहा मागासवर्गीय महिला सरपंच आसल्याने या ग्रामसेवक महाशयांनी बोगस कामे दाखवून निधी लागला होता या संरपचबाईनी निवेदन देऊन चौकशी लावली असता या चौकशी प्रकरणाचा तपास अधिकारी विस्तार अधिकारी होते त्यांनी निर्दोष सिद्ध केले.हाच विस्तार अधिकारी डिजिटल पेंमेट इलेक्ट्रॉनिक मशिन सही करुन पेमेंट उचलून हाडप करण्याचा ईरादा असल्याचा संरपचबाईनी आरोप आहे.त्या प्रकरणातही चौकशी होऊनही कोणतीही ठोस कार्यवाही झाली नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कार्यवाही करण्याची मागणी संरपचबाई व नागरिकांकडून होत आहे.

# 'स्वारातीम' विद्यापीठाची २६ वर्षांनंतर सुवर्णझेप; राष्ट्रीय युवक महोत्सवात ऐतिहासिक यश

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १७ मार्च-**

चेन्नई येथे पार पडलेल्या राष्ट्रीय युवक महोत्सवात स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाने तब्बल २६ वर्षांनंतर ऐतिहासिक यश संपादन केले आहे. देशातील आठ झोनमधील १४२ नामांकित विद्यापीठांमध्ये झालेल्या चुरशीच्या स्पर्धेत विद्यापीठाने लोक/आदिवासी नृत्य प्रकारात प्रथम क्रमांक पटकावत सुवर्णपदक मिळवले.

या स्पर्धेत विद्यापीठाने सहभाग घेतलेल्या सर्व सात कलाप्रकारांत पारितोषिके मिळवत १०० टक्के यशाची नोंद केली. यात लोक/आदिवासी नृत्य (दंडार नृत्य) आणि रॅली/मिरवणूक या प्रकारांत



प्रथम क्रमांक, माईम (मूक अभिनय), लोक वाद्यवृंद, शास्त्रीय वाद्य एकल आणि लघुनाटिका (स्किट) या प्रकारांत द्वितीय क्रमांक, तर संकल्पना नृत्य प्रकारात पाचवा क्रमांक मिळाला.

या उल्लेखनीय यशामुळे विद्यापीठाचा संघ आता आंतरराष्ट्रीय युवक महोत्सवात भारताचे प्रतिनिधित्व करण्यासाठी पात्र ठरला आहे. विशेष म्हणजे, २६ वर्षांपूर्वी लोकनृत्यात मिळवलेल्या सुवर्णयशाची परंपरा नव्या पिढीने पुन्हा जिवंत केली आहे.

विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. राजपालसिंह चिखलीकर यांच्या नेतृत्वाखाली संघाने अल्पावधीत मोठे आव्हान पेलत हे यश मिळवले. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. तसेच प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन, कुलसचिव डॉ. डी. डी. पवार, वित्त व लेखाधिकारी डॉ. राजेश शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक हुशारसिंह साबळे, अधिष्ठाता डॉ. एम. के. पाटील, डॉ. चंद्रकांत बाविस्कर, आय.आय.एल.चे संचालक डॉ. शैलेश वाढेर, ज्ञानस्त्रोत केंद्राचे संचालक डॉ. जगदीश कुलकर्णी, एन.एन.एस.चे संचालक डॉ. मारोती गायकवाड, आय.क्यू.ए.सी.चे संचालक डॉ. सुरेन्द्रनाथ रेड्डी, कार्यकारी अभियंता तानाजी हुस्सेकर, जनसंपर्क अधिकारी डॉ. अशोक कदम आदी मान्यवरांनी संघाचे कौतुक केले.

संघाचे व्यवस्थापन डॉ. संदीप काळे व सिद्धार्थ नागठाणकर यांनी सांभाळले. लोकनृत्यासाठी संदेश हटकर, तर रॅली व लघुनाटिकेसाठी दिग्दर्शक दिलीप डोम्बे यांनी प्रशिक्षण दिले. डॉ. शिवराज शिंदे यांनी लोकसंगीतासाठी मार्गदर्शन केले. तसेच संकेत गाडेकर आणि संभा कांबळे यांनीही यशासाठी विशेष योगदान दिले.

# गोरेगाव पोलिसांनी केली गांजाची झाडे जप्त




**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १७ मार्च**
सेनगाव तालुक्यातील गुगुळपिंपरी शिवारात कांद्याच्या पिकात लावलेली गांजाची ८० झाडे गोरेगाव पोलिसांनी जप्त केली असून या झाडांची किंमत अंदाजे ८० हजार रूपये आहे. याप्रकरणी एका शेतकऱ्याविरूध्द गोरेगाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
पोलिसांनी दिलेल्या माहीतीनुसार सेनगाव तालुक्यातील गुगुळपिंपरी शिवारात एका शेतकऱ्याच्या शेतात कांद्याच्या पिकात गांजाची झाडे लावल्याची माहीती गोरेगाव पोलिसांना मिळाली होती. त्यावरून सहाय्यक पोलिस निरीक्षक विनोद झळके, उपनिरीक्षक नितेश लेनगुळे, जमादार अनिल भारती, राहुल मैंदकर, नवले यांच्यासह पोलिसांच्या पथकाने सोमवारी दुपारपासूनच शोध मोहीम हाती घेतली. तब्बल तीन तासानंतर पोलिसांनी गुगुळपिंपरी शिवारात शोध घेतला. यावेळी विठ्ठल ढोक यांच्या शेतात गांजाची झाडे लावल्याचे आढळून आले.
पोलिसांच्या पथकाने पाहणी केली असता काही झाडे तीन ते चार फुट तर काही दोन फुटापर्यंत वाढली होती. पोलिसांनी घटनास्थळावरून एकूण ८० झाडे जप्त केली आहेत. या झाडांचे वजन साडेआठ किलो भरले असून त्याची अंदाजे किंमत ८० हजाराच्या जवळपास आहे. याप्रकरणी उपनिरीक्षक नितीन लेनगुळे यांच्या तक्रारीवरून गोरेगाव पोलिसांनी विठ्ठल ढोक रा माहेरखेडा ता सेनगाव यांच्याविरूध्द गुन्हा दाखल केला आहे. पोलिस उपअधीक्षक कुंदनकुमार वाघमारे, सपोनि झळके पुढील तपास करीत आहेत.

# सामाजिक न्याय विभागाच्या कल्याणकारी योजनांच्या चित्ररथाला हिरवी झेंडी



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १७ मार्च**
जिल्हा वार्षिक योजना (अनुसूचित जाती उपयोजना) सन २०२५-२०२६ अंतर्गत सामाजिक न्याय विभागाच्या विविध कल्याणकारी योजनांची जिल्ह्यातील लाभार्थ्यांना माहिती व जनजागृती होण्यासाठी जिल्हा माहिती कार्यालयाच्यावतीने आयोजित चित्ररथाला आज येथील जिल्हाधिकारी कार्यालयाच्या परिसरात समाज कल्याण विभागाचे प्रादेशिक उपायुक्त अविनाश देवसटवार यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून प्रचार-प्रसिद्धी मोहिमेचा प्रारंभ करण्यात आला. हे चित्ररथ जिल्ह्यातील शहरी आणि ग्रामीण भागात जाऊन प्रचार-प्रसिध्दी करणार असल्याने नागरिकांना तसेच लाभार्थ्यांना या चित्ररथाच्या माध्यमातून विविध योजनांची माहिती मिळण्यास मदत होणार आहे.
जिल्हा वार्षिक योजना (अनुसूचित जाती उपयोजना) अंतर्गत सामाजिक न्याय विभागाच्या कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण व स्वाभिमान योजना, डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजना, अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या स्वयंसहाय्यता बचत गटांना मिनी ट्रॅक्टर व त्याची उपसाधने यांचा पुरवठा करण्याची योजना, मागासवर्गीय मुला - मुलींसाठी शासकीय वसतिगृह, अनुसूचित जातींच्या मुलींसाठी शासकीय निवासी शाळा, सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना आणि राजर्षि शाहु महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती योजना यासह विविध योजनांचा समावेश आहे.
तसेच मागासवर्गीय मुला/मुलींसाठी शासकीय वसतिगृह योजना, अनुसूचित जातींच्या मुलींसाठी शासकीय निवासी शाळा, सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना, राजर्षी छत्रपती शाहु महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती योजना, कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण व स्वाभिमान योजना, डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना, अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या स्वयंसहाय्यता बचत गटांना मिनी ट्रॅक्टर व त्याची उपसाधने यांचा पुरवठा करण्याची योजना या कल्याणकारी योजनांवर आधारित तयार करण्यात आलेल्या भित्तीपत्रिकाचे देखील मान्यवरांच्या हस्ते यावेळी विमोचन करण्यात आले.
हिंगोली जिल्ह्यातील अनुसचित जाती व मागास प्रवर्गातील सर्वसामान्य जनतेला शासनाच्या कल्याणकारी योजनांची माहिती व्हावी आणि त्यांना या योजनेचा लाभ घेता यावा, यासाठी चित्ररथ आणि भित्तीपत्रिकाच्या माध्यमातून व्यापक जनजागृती करण्यात येणार आहे. यावेळी समाज कल्याणच्या सहायक आयुक्त गिता गुठ्ठे, कार्यालयीन अधीक्षक आत्माराम वागदकर, जिल्हा माहिती अधिकारी प्रभाकर बारहाते, उपसंपादक चंद्रकांत कारभारी आदींची उपस्थिती होती.

# हिंगोलीत उद्यापासून प.पू. रमेशभाई ओझा यांच्या श्रीमद् भागवत कथेला सुरूवात होणार, जय्यत तयारी





**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १७ मार्च**
गुढीपाडव्याच्या शुभ मुहूर्तावर गजराज बाल गणेश मंडळाच्या पुढाकारातून येथील रामलीला मैदानावर अंतरराष्ट्रीय कथाकार प. पू. भाईश्री रमेशभाई ओझा यांची श्रीमद भागवत कथा होणार असल्याची माहीती पंकज अग्रवाल यांनी पत्रकार परिषदेत दिली.
यावेळी श्री रमेश भाई ओझा यांचे शिष्य प्रफुल्ल दवे, प्रवीण दवे, गजराज बाल गणेश मंडळाचे पदाधिकारी यांची उपस्थिती होती. येथील रामलीला मैदानावर गुढीपाडव्याच्या शुभ मुहूर्तावार १९ मार्च पासून ते २५ मार्च पर्यंत श्रीमद भागवत कथेचे आयोजन करण्यात आले असून यासाठी मुख्य यजमान म्हणून स्व. मखनलाल शंकरलालजी गौड यांच्या स्मृती प्रित्यर्थ नंदकिशोर शर्मा म्हाळसा पुरवाले हे राहणार आहेत. दरम्यान, सात दिवस भरगच्च कार्यक्रमात भावीकांना कथेची मेजवानी ऐकावयास मिळणार आहे. तत्पूर्वी गुरुवारी १९ मार्च रोजी शहरातून भव्य शोभा यात्रा गणपती मंदिरापासून काढली जाणार आहे. त्यानंतर पोस्ट ऑफिस,भारतीय विद्या मंदिर, गांधी चौक, त्यानंतर इंदिरा चौक मार्गे निघून परत रामलीला मैदानावर आगमन होईल. त्यानंतर गुरुवारी दुपारी चार ते साडे सात यावेळेत श्रीमद भागवत कथेला सुरुवात होणार आहे. शुक्रवारी आणि शनिवार नित्य कथा, रविवारी कृष्ण जन्म, सोमवारी गोवर्धन पूजा, तर मंगळवारी रुखीमिनी विवाह तर बुधवारी २५ मार्च रोजी सकाळी साडे नऊ ते दुपारी एक या वेळेत पूर्णाहुती त्यानंतर कथा समाप्ती नंतर लगेच महाप्रसाद सुरु होणार आहे. या कथेसाठी आमदार तानाजी मुटकुळे यांचे विशेष सहकार्य लाभले आहे.
दरम्यान, श्रीमद भागवत कथेसाठी सात दिवस वेगवेगळे यजमान पूजेसाठी उपलब्ध राहणार असून त्यानुसार गुरुवारी १९ मार्च रोजी स्व. कुसुमदेवी बगडिया यांच्या स्मृती प्रित्यर्थ गणेश बगडिया तर स्व. बद्रीनारायणजी चितलांगे यांच्या स्मृती प्रित्यर्थ राजेंद्र आणि विनोद चितलांगे, स्व. गोविंदप्रसादजी सोनी यांच्या स्मृती प्रित्यर्थ रमेश कुमार सोनी हे यजमान राहतील. तर शुक्रवारी २० मार्च रोजी स्व. मल्लिकार्जुन अप्पा सैंदाने यांच्या स्मृती प्रित्यर्थ सुनिताताई सैंदाणे, सीमा प्रशांत निलावार पुणे, स्व. घेवरचंदजी धूत यांच्या स्मृती प्रित्यर्थ ताराचंद घेवरचंद धूत हे यजमान राहतील. याशिवाय शनिवारी २१मार्च रोजी स्व. चुन्नीदेवी प्रेमराज जांगीड यांच्या स्मृती प्रित्यर्थ नानुराम प्रेमराज जंगीड, स्व. सुभद्रा साहू यांच्या स्मृती प्रित्यर्थ मीना रमेश गुप्ता हे यजमान असतील तसेच याच दिवशी स्व. काशिबाई सोमाणी यांच्या स्मृती प्रित्यर्थ डॉ. निलेश सोमाणी हे पण यजमान म्हणून राहतील.
तर रविवारी २२ मार्च रोजी स्व. गंगाबाई चतुरभूज बगडिया यांच्या स्मृती प्रित्यर्थ रमेशचंद्र सावरमल बगडिया, स्व. दत्तराव शिंदे यांच्या स्मृती प्रित्यर्थ पदमाबाई शिंदे, तर स्व. अनिता राठोर यांच्या स्मृती प्रित्यर्थ नवनीत राठोर हे तिघे यजमान असतील तसेच सोमवारी २३ मार्च रोजी स्व. हनुमानदास अग्रवाल यांच्या स्मृती प्रित्यर्थ लक्ष्मी लाईफ केअर हॉस्पिटल, स्व. मोहनलालजी गोमतीबाई राधेश्याम हेडा यांच्या स्मृती प्रित्यर्थ अमित हेडा, तर स्व. कलावतीबाई बांगर यांच्या स्मृती प्रित्यर्थ इंदुमती चंद्रकांत बांगर यजमान असतील. मंगळवारी २४ मार्च रोजी होणाऱ्या भागवत कथेसाठी यजमान म्हणून स्व. सावित्री दुबे यांच्या स्मृती प्रित्यर्थ योगेश दुबे, स्व. रमेशचंद्र अग्रवाल यांच्या स्मृती प्रित्यर्थ पंकज अग्रवाल, स्व. अन्नपूर्णा बाई हेडा तथा स्व. सुरज हेडा यांच्या स्मृती प्रित्यर्थ मुरली हेडा हे असतील. बुधवारी २५मार्च रोजी होणाऱ्या भागवत कथेसाठी स्व. रमेशचंद्र अग्रवाल गांजापुरवाले यांच्या स्मृती प्रित्यर्थ रितेश अग्रवाल आणि निकुंज अग्रवाल, स्व. प्रभुदास कालावडिया यांच्या स्मृती प्रित्यर्थ कालावडिया परिवार, स्व. सत्यनारायण खंडेलवाल यांच्या स्मृती प्रित्यर्थ कैलाशचंद्र खंडेलवाल हे तिघे जण यजमान राहणार आहे. सात दिवस पूर्ण कथा होई पर्यंत दैनंदिन यजमान म्हणून यांची सेवा राहणार आहे.



**हिंगोली- हिंगोलीचे सुपूत्र अथर्व मुकुंद घन यांची भारतीय सेनेत लेफ्टनंट म्हणून नुकतीच नियुक्ती झाली आहे. या यशाबद्दल त्यांचा हिंगोली येथे गौरव सोहळा पार पडला. यावेळी आई सौ राधिका घन, वडील मुकुंद घन यांच्यासह नातेवाईक, मित्र पवार मोठ्या संख्येने उपस्थित होता. छाया- विजय गुंडेकर**

# अ.भा. महात्मा फुले समता परिषदेच्या तालुकाध्यक्षांची निवड



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १७ मार्च**
अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषद राज्यकार्य कारिणीची बैठक एम.इ.टी कॉलेज बांद्रा येथे पुरवठत्त मंत्री आ. छगन भुजबळ यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली.
यावेळी पंकज भुजबळ, समीर भुजबळ, बापूसाहेब भुजबळ उपस्थित होते. या बैठकीत महात्मा फुले समता परिषद हिंगोली जिल्ह्यातील तालुका अध्यक्षाची निवड करण्यात आली. ज्यामध्ये औंढा नागनाथ तालुकाध्यक्ष पदी रमेश सानप, हिंगोली तालुकाध्यक्षपदी चंद्रशेखर उबाळे, वसमत तालुका अध्यक्षपदी नवनाथ राऊत यांची तर सेनगाव तालुका अध्यक्षपदी ज्ञानेश्वर नागुलकर आणि कळमनुरी तालुका अध्यक्षपदी, अनिल मस्के यांची निवड करण्यात आली. यावेळी समता परिषद जिल्हाध्यक्ष चंदू लव्हाळे, समता परिषद महिला जिल्हाध्यक्ष वनिताताई गुंजकर, जयश्रीताई सातव ज्योतीताई दिघडे, भागवत बोधने यांच्यासह इतरांची उपस्थिती होती.

# वसमतमध्ये ६ हॉटेल्समधून १० घरगुती गॅस सिलेंडर जप्त, तहसील प्रशासनाची कार्यवाही, एजन्सीची चौकशी करा



**तभा वृत्तसेवा**
**वसमत, १७ मार्च**
शहरात घरगुती गॅस सिलेंडरचा मोठ्या प्रमाणात गैरवापर होत असल्याचा गंभीर प्रकार समोर आला असून, शहरातील एकमेव गॅस एजन्सीकडूनच घरगुती सिलेंडरचा काळाबाजार होत असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. त्यामुळे गॅस वितरण व्यवस्थेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.
जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्या आदेशानुसार व तहसीलदार शारदा दळवी यांच्या मार्गदर्शनाखाली तहसील कार्यालयाच्या पथकाने सोमवारी वसमत शहरातील हॉटेलांवर अचानक तपासणी मोहीम राबवली. या कारवाईदरम्यान सहा हॉटेलमधून घरगुती वापरासाठी असलेले तब्बल १० गॅस सिलेंडर जप्त करण्यात आले. घरगुती वापरासाठी असलेले गॅस सिलेंडर व्यावसायिक वापरासाठी वापरणे नियमबाह्य असतानाही शहरातील अनेक हॉटेलमध्ये मोठ्या चुलींना घरगुती गॅस सिलेंडर जोडलेले आढळून आले. विशेष म्हणजे काही वाहनांमध्येही पेट्रोल-डिझेलऐवजी घरगुती गॅस सिलेंडरचा वापर होत असल्याचे जोरदार चर्चा आहे.
दरम्यान, वसमत शहरात गॅस एजन्सी कार्यरत असल्याने जप्त करण्यात आलेले सिलेंडर स्थानिक गॅस एजन्सी कडूनच पुरवले गेले आहे का? हा प्रश्न अधिकच गंभीर ठरत आहे. शहरात हॉटेल चालक व वाहन चालकांकडे मोठ्या प्रमाणात घरगुती सिलेंडर कसे पोहोचतात, यामुळे संबंधित एजन्सीच्या भूमिकेवर संशयाचे सावट निर्माण झाले आहे.
सामान्य नागरिकांना घरगुती गॅस मिळवण्यासाठी ऑनलाइन नोंदणी करून प्रतीक्षा करावी लागत असताना, हॉटेल चालकांना आणि वाहन चालकांना मात्र हे सिलेंडर सहज उपलब्ध होत असल्याने नागरिकांत संताप व्यक्त होत आहे.
जप्त करण्यात आलेले सिलेंडर कोणत्या एजन्सीकडून आणि कोणाच्या माध्यमातून पुरवले गेले, याची सखोल चौकशी करून दोषींवर कडक कारवाई करावी, तसेच दोषी आढळल्यास संबंधित गॅस एजन्सीचा परवाना रद्द करावा, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे. वसमत शहरात घरगुती गॅसचा असा खुलेआम होत असलेला काळाबाजार थांबवण्यासाठी प्रशासनाने गॅस एजन्सीच्या कामकाजाचीही चौकशी करावी, अशी मागणी जोरधरत आहे.

# महारेशीम अभियानास शेतकऱ्यांचा उत्तम प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १७ मार्च**
रेशीम संचालनालय, नागपूर अंतर्गत जिल्हा रेशीम कार्यालय, हिंगोली यांच्या मार्फत जिल्ह्यात दि. ४ फेब्रुवारी २०२६ पासून महारेशीम अभियान राबविण्यात येत असून या अभियानास जिल्ह्यातील शेतकऱ्यांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. या अभियानाची सुरुवात जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्या हस्ते रेशीम रथास हिरवी झेंडी दाखवून करण्यात आली.
अभियान सुरू झाल्यापासून जिल्ह्यातील पाचही तालुक्यातील १२० शेतकऱ्यांनी नोंदणी फी भरून रेशीम उद्योग सुरू करण्यासाठी जिल्हा रेशीम कार्यालयाकडे नोंदणी केली आहे. त्यामुळे जिल्ह्यात रेशीम उद्योगाबाबत शेतकऱ्यांमध्ये वाढता उत्साह दिसून येत आहे. सद्यस्थितीत जिल्ह्यातील ७८ गावांमध्ये एकूण ४४७ शेतकऱ्यांनी सुमारे ४५४ एकर क्षेत्रावर तुती लागवड केलेली आहे. यापैकी अनेक शेतकरी वर्षाला ४ ते ५ किटक संगोपनाच्या बॅच घेऊन त्यातून दरवर्षी एक लाख रुपयांपेक्षा अधिक उत्पादन घेऊन चांगले उत्पन्न मिळवत आहेत. त्यामुळे इतर शेतकऱ्यांनीही किमान एक एकर तुती लागवड करून आपले वार्षिक उत्पन्न वाढवावे, असे आवाहन जिल्हा रेशीम विकास अधिकारी, हिंगोली यांनी केले आहे. शेतकऱ्यांनी जिल्हा रेशीम कार्यालयाकडे आपले सरकार पोर्टल मार्फत किंवा काही अडचण असल्यास ऑफलाईन पद्धतीने जिल्हा रेशीम कार्यालयात नोंदणी करून तुती लागवड करावी. नोंदणी केलेल्या पात्र शेतकऱ्यांना तुती लागवड, किटक संगोपन गृह, साहित्य आदी बाबींसाठी शासनाच्या महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (म.न.रे.गा.), सिल्क समग्र व पोकरा योजनेंतर्गत लाभ देण्यात येत आहे.
म.न.रे.गा. योजनेअंतर्गत सन २०२५-२६ मध्ये तुती लागवड करून यशस्वीपणे कोष उत्पादन करणाऱ्या शेतकऱ्यांना एकरी सुमारे ४.३२ लाख रुपये अनुदान देय आहे. तसेच इतर योजनांमधूनही या उद्योगासाठी अनुदानाची तरतूद करण्यात आली आहे.
जिल्ह्यातील इच्छुक शेतकऱ्यांनी तात्काळ नोंदणी करून या योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा रेशीम कार्यालय, हिंगोली यांच्या वतीने करण्यात आले आहे.